जमखंडी संस्थान

प्रांतिक कायदे नं. ३६.

अधिवेशन ७ वे.

१९४०.

V23115,32r

V23115.32r
n0
049524

87

Dhananjayarao Gadgil Library

GIPE-PUNE-049524

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ.

अधिवेशन सातवें.

१९४०

# अहवाल

१९४१

# अनुक्रमणिका

गुरुवार ता. २२-८-१९४० इ.


| विषय | पान |
|---|---|
| १ अधिवेशनाचा कार्यक्रम ... ... ... | १—२ |
| २ कायदेमंडळाच्या सभासदांची यादी ... ... | ३—४ |
| ३ नवीन सभासदांचा शपथविधि ... ... ... | ५ |
| ४ श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांचें भाषण ... | ५-१२ |
| ५ मे. रा. ब. अध्यक्ष यांचें प्रास्ताविक भाषण ... ... | १३ |
| ६ स. स. देवधर यांचे प्रश्न, त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न ... | १४ |
| ७ स. स. मंडी यांचे प्रश्न, त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न ... | १५-१६ |
| ८ सन्मान्य सभासदांपैकीं कांहीं सभासदांनीं मे. रा. ब. अध्यक्ष यांचे-कडे समक्ष दिलेली यादी ... ... ... | १६-१७ |
| ९ स. स. गो. द. आपटे यांचे प्रश्न व त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न ... | १७-२० |
| १० स. स. पंचापा कोरी यांचे प्रश्न, व त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न | २०-२१ |
| ११ स. स. बाळण्णवर यांचे प्रश्न, व त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न ... | २१ |
| १२ स. स. शि. गं. कुलकर्णी यांचे प्रश्न व त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न | २२-२३ |
| १३ स. स. नाडगीर यांचे प्रश्न व त्यांचीं उत्तरें व उपप्रश्न ... | २३-२५ |
| १४ मे. रा. ब. अध्यक्ष यांचा जागतिक महायुद्धाबाबत साम्राज्य सरकारांस विजय मिळण्याबाबतचा ठराव ... ... | २५ |
| १५ स. स. देवधर यांचा श्रीमंत राजासाहेब यांना नरेंद्र मंडळांत वैयक्तिक जागा मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव ... | २५-२६ |
| १६ स. स. देवधर यांचा दरबारनें फर्स्ट ग्रेड व सेकंड ग्रेड नोकरांव्यतिरिक्त इतर नोकरांचें टाइमस्केल पुन्हां सुरू केलेबद्दलच्या अभिनंदनाचा ठराव ... ... ... | २६-२७ |
| १७ रा. ब. भागवत दिवाण व फिनॅन्स मेंबर यांचें मंडळापुढें बजेट मांडणें व त्याबाबतचें भाषण ... ... ... | २७-३३ |
| १८ रा. सा. महाबळ यांचें पुरुषाकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदू विधवाचे हक्काबाबत जमखंडी संस्थानचा ॲक्ट नं. १ सन १९३७ चा दुरुस्त करण्याबद्दलचें बिलाचें पहिलें, दुसरें व तिसरें वाचन व त्यांवरील भाषणें ... | ३३-३५ |

१९ स. स. देवधर यांचें वेश्या–व्यवसाय–निवासस्थान केंद्रीकरण बिलाचें दुसरें वाचन व त्यावरील चर्चा ... ... ३५–३८
२० स. स. नाडगीर यांचा 'पिकांच्या रोगनिवारणार्थ उपाययोजना करणेबाबतचा' ठराव व त्यावरील चर्चा ... ... ३८–३९
२१ स. स. देवधर यांचा 'सर्व कचेऱ्यांतून तक्रारी–बुक ठेवणेबाबत' चा ठराव मांडणें व तो परत घेणें ... ... ... ३९–४१
२२ स. स. मंडी यांचा 'बन्हट्टीच्या टोलनाक्याची जागा बदलणे'बाबतचा ठराव व त्यावरील चर्चा ... ... ... ४१–४२
२३ परिशिष्ट नं. १ स. स. देवधर यांनीं विचारलेल्या प्रश्न नं. २ चे बाबत पत्रक ... ... ... ४३
२४ परिशिष्ट नं. २ स. स. शि. गं. कुलकर्णी यांच्या प्रश्न नं. २ चें बाबत पत्रक ... ... ... ४४–४५

## शुक्रवार ता. २३-८-४० इ.

विषय पान
२५ स. स. देवधर यांचें बजेटवरील भाषण ... ... ४६–४९
२६ स. स. मंडी यांचें बजेटवरील भाषण ... ... ४९–५०
२७ रा. ब. भागवत यांचें बजेटवरील भाषणांस उत्तर ... ५०–५१
२८ स. स. रा. सा. महाबळ यांचा इं. पिनल कोड कलम १७६ सुधारणेबाबत व क्रि. प्रो. को. कलम ५६५ सुधारण्याबाबतचा कायदा संस्थानमजकुरीं जरूर त्या फेरफारांसह लागू करणेबाबतचा ठराव नं. २ व त्यावरील भाषणें ... ... ५१
२९ रा. सा. महाबळ यांचा शपथा घेणेबाबतचा इ. स. १८७३ च्या ॲक्टाचें कलम ५ सुधारण्याबाबतचा कायदा जरूर त्या फेरफारांसह लागू करणे बाबतचा ठराव नं. १ व त्यावरील भाषणें ... ५२
३० स. स. देवधर यांचें भाग लावणी कायद्याचें बिल मांडण्यास परवानगी मागणें व त्यावरील भाषणें ... ... ... ५२–५५
३१ स. स. देवधर यांचें गहाण–ऋणको संरक्षण बिल मांडण्यास परवानगी मागणें व त्यावरील भाषणें ... ... ... ५५–५८
३२ श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांचेकडोन आलेल्या आभारप्रदर्शक पत्रांचें सेक्रेटरीकडोन वाचन. (परिशिष्ट नं. ३ व ४ पहा.) ५८
३३ स. स. देवधर यांचें शेतकी कायदा दुरुस्ती बिल मांडण्यास परवानगी मागणें व त्यावरील भाषणें ... ... ... ५८–५९

३४ स. स. नाडगीर यांचा 'ग्रामोद्धार योजनेबाबतचा' ठराव नं.२ व त्यावरील भाषणें ... ... ... ५९–६०

३५ स. स. देवधर यांचा ठराव नं. २ काढून घेतल्यानें त्यांचा 'कुंद्गोळ तालुक्यांतील पिण्याच्या पाण्याची व इतर सांडपाण्याची टंचाई दूर करणे' बाबतचा ठराव नं. ४ व त्यावरील भाषणें ... ६०

३६ स. स. मंडी यांचा 'दुर्मरणाचें प्रेत संशय नसतांना पोस्ट मार्टेम करण्यांत येऊ नये' याबद्दलचा ठराव नं. २ व त्यावरील भाषणें ... ६०–६१

३७ स. स. नाडगीर यांचा 'नवीन गांवनकाशे तयार करण्याबाबत'चा ठराव नं. ३ व त्यावरील भाषणें. ... ... ... ६२

३८ स. स. देवधर यांचा 'बजेटमध्यें झाड–लागवडीसाठीं स्पेशल १०००' रुपयांची तरतूद करणेबाबत'चा ठराव नं. ५ व त्यावरील भाषणें ६२

३९ स. स. मंडी यांचा ' बन्हट्टी गांवच्या पाण्याची अडचण दूर होण्याबाबत'चा ठराव नं. ३ व त्यावरील भाषणें ... ... ६२–६३

४० स. स. नाडगीर यांचा 'कुंदगोळ येथील पिण्याच्या पाण्याच्या हौंडांतील पाणी फिल्टर करून देणें बाबत'चा ठराव नं. ४ व त्यावर चर्चा होऊन तो परत घेणें. ... ... ... ६३

४१ स. स. देवधर यांचा जमखंडी येथील Prince of Wales Hospital च्या कामाची वेळ ठरविण्याबद्दलचा ठराव नं. ७ व त्यावरील भाषणें ६३–६४

४२ परिशिष्ट नं. ३ श्रीमंत राजासाहेब यांचेकडोन आलेलें पत्र ... ६५

४३ परिशिष्ट नं. ४ श्रीमंत राजासाहेब यांचेकडोन अभिनंदनपर ठरावाबाबत आलेलें आभारप्रदर्शक पत्र. ... ... ... ६५

४४ परिशिष्ट नं. ५ मे. रा. ब. अध्यक्ष यांनीं प्रसिद्ध केलेली प्रेस नोट ६६–६८

**शनवार ता. २४–८–४० इ.**

विषय पान

४५ बजेटवरील बाबवार चर्चा ... ... ... ६९–७१

४६ स. स. देवधर यांचे ' हुजूर रेकॉर्डमधील कागद पहाणेसंबंधीं नियम मांडणेस परवानगी मागणें व त्यावर चर्चा ' ... ... ७२–७४

४७ स. स. देवधर यांच्या ठराव नं. ४ वरील चर्चा पुढें चालू ... ७४–७५

४८ स. स. मंडी यांचा ठराव नं. ६ 'बन्हट्टी, होसूर व होसूर-रामपूर यांचे दरम्यान रहदारीला योग्य असा रस्ता दुरस्त करणेबाबत'चा ठराव व त्यावरील चर्चा ... ... ... ७५

४९ स. स. देवधर यांचा 'जमखंडी जेलकडील जेलरची व ऑफिसची टाइम निश्चितपणें ठरविणेबाबत'चा ठराव नं. ८ व त्यावरील चर्चा ७५

५० मे. रा. ब. अध्यक्ष यांचे समारोपाचें भाषण ... ... ७५–७६
५१ स. स. देवघर यांचें लोकपक्षातर्फे मे. अध्यक्षांचें आभारप्रदर्शनाचें भाषण ... ... ... ... ७६
५२ रा. सा. महाबळ यांचें आभारप्रदर्शनाचें भाषण ... ७६–७७
५३ परिशिष्ट ६ दप्तरी हुकूम ... ... ... ७८–८४
५४ परिशिष्ट ७ १९४०-४१ चें जमखंडी संस्थानच्या जमाखर्चाचें बजेट व खातेवार बेरीज. ... ... ... ८५
५५ परिशिष्ट नंबर–७ सन १९४०।४१ सालचें बजेट ... १–६४

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ

## अधिवेशन ७ वें

### ता. २२, २३ व २४ माहे ऑगस्ट सन १९४० इ.

### कार्यक्रम

गुरुवार ता. २२।८।१९४० इसवी

| | | |
|---|---|---|
| सकाळीं | ९। | नवीन सभासदांचा शपथविधि. |
| ,, | ९॥ ते १० | श्रीमंत राजासाहेब यांचें भाषण. |
| दुपारीं | १ ते २ | मे. अध्यक्ष यांचें प्रास्ताविक भाषण व प्रश्न. |
| ,, | २ ते २॥ | मे. फिनॅन्स–मेंबर यांनीं मंडळापुढें बजेट मांडणें व जरूर तर भाषण करणें. |
| ,, | २॥ ते ३॥ | सुट्टी. |
| ,, | ३॥ ते ४॥ | सरकारी कामें ( बिलें व ठराव ).<br>बिलः–१ रा. सा. न्यायमंत्री यांचें बिल.<br>‘ पुरुषांकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांच्या हक्काबाबत जमखंडी संस्थानचा ॲक्ट नं. १ सन १९३७ इ. चा दुरुस्त करणेबद्दलचें बिल.’ |
| ,, | ४॥ ते ५ | बिन-सरकारी ( बिलें व ठराव ).<br>बिलः–( १ ) स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांचें ‘ वेश्याव्यवसाय – निवासस्थान – केंद्रीकरण बिल लोकमत अजमावण्याकरितां चार महिन्यांच्या मुदतीनें प्रसिद्ध केलेलें. ’ |

शुक्रवार ता. २३।८।१९४० इसवी

| | | |
|---|---|---|
| दुपारीं | १२॥ ते १॥ | प्रश्न. |
| ,, | १॥ ते २॥ | बजेटावर सर्वसाधारण चर्चा व मे. फिनॅन्स मेंबर यांचें उत्तर. |
| ,, | २॥ ते ३॥ | सुट्टी. |
| ,, | ३॥ ते ४ | सरकारी काम ( बिलें व ठराव ) |
| ,, | ४ ते ५॥ | बिनसरकारी बिलें व ठराव. |

स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांचीं बिलें:–( १ ) भागलावणी कायद्याचें बिल. ( २ ) गहाणऋणको–संरक्षण बिल. ( ३ ) संस्थानमजकुरीं लागूं असलेला शेतकी कायदा–दुरुस्ती बिल.

स. स. गोविंद दत्तात्रय आपटे यांचें जमखंडी संस्थानांतील कर्जबाजारी शेतकऱ्यांचे संरक्षणाची तरतूद करण्याबाबतच्या कायद्याच्या (ॲक्ट नं. १ सन १९३९ इ. च्या) दुरुस्तीचें बिल.

**शनिवार ता. २४।८।१९४० इसवी**

| | | |
|---|---|---|
| दुपारीं | १२ ते १२॥ | प्रश्न |
| ,, | १२॥ ते २॥ | बजेटमधील बाबींची चर्चा. |
| ,, | २॥ ते ३॥ | सुट्टी. |
| ,, | ३॥ ते ४ | सरकारी कामें. ( बिले व ठराव ) |
| ,, | ४ ते ५ | बिनसरकारी बिलें व ठराव.<br>स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांचें हुजूर रेकॉर्डमधील कागद पहाणेसंबंधीं नियम. |
| ,, | ५ ते ५॥ | समारोप. |

ता. क. :— कार्यक्रमांत अगर कार्यक्रमाचे वेळेंत जरूर पडल्यास मे. रावबहादूर अध्यक्षसाहेब यांच्या हुकुमानें फेरफार करण्यांत येईल.

तारीख १४।८।१९४० }

**W. T. Apte,**
सेक्रेटरी ज. सं. प्रा. का. मंडळ.

१

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या सभासदांची यादी सन १९४० इसवी

| सरकारनियुक्त अधिकारी | सरकारनियुक्त बिन अधिकारी |
| --- | --- |
| १ मे. रावबहादूर रामचंद्र केशव भागवत, दिवाण, जमखंडी ( अध्यक्ष ). | ८ रावसाहेब हरी चिंतामण पटवर्धन, बी. ए., रिटायर्ड रेव्हेन्यु ऑफिसर, जमखंडी. |
| २ रावसाहेब भास्कर बहिरव महाबळ, बी. ए., एल्एल्. बी., न्यायमंत्री. | ८ (अ) रावसाहेब शंकर अनंत आपटे, बी. ए., एल्एल्. बी., सरकारी वकील, जमखंडी. |
| ३ रावसाहेब अमृतराव वेंकटराव घारेश्वर, एम्. ए., एल्एल्. बी., विद्याधिकारी. | ९ स. स. वेंकटेश श्रीनिवास आनिखिंडी, जमखंडी. |
| ४ रावसाहेब भालचंद्र रामचंद्र पटवर्धन, एम्. ए., एल्एल्. बी., सरन्यायाधीश. | १० स. स. नागेश बिष्टो देसाई, जमेदार, कुंदगोळ. |
| ५ रावसाहेब भालचंद्र चिंतामण पटवर्धन, एम्. बी., बी. एस्., चीफ मेडिकल ऑफिसर. | ११ स. स. रुकनोद्दीनसाहेब शिराजसाहेब काजी, जमखंडी. |
| ६ रावसाहेब रामचंद्र गोविंद पुराणिक, बी. ई. (सिव्हिल), स्टेट इंजिनियर. | १२ स. स. विनायक गंगाधर गोखले, जमखंडी. |
| ७ रावसाहेब अप्पासाहेब मुरारराव घोरपडे, स्टेट मेकॅनिकल इंजिनियर. | १३ स. स. सत्याप्पा हणमाप्पा जमखंडी, जमखंडी. |
| | १४ स. स. खंडेराव गोविंदराव घोरपडे, जमखंडी. |

## लोकनियुक्त समासद्

### जमखंडी नागर संघ

१५ स. स. पांडुरंग बळवंत वाटवे, वकील, जमखंडी.

१६ „ आडवय्या दुंडय्या मुधोळ. जमखंडी.

### हुन्नूर नागर संघ

१७ „ शिवलिंगापा शिद्रामापा सावळगी, हुन्नूर.

### बन्हट्टी नागर संघ

१८ „ वीरभद्रापा आल्लापा मंडी, बन्हट्टी.

### कुंदगोळ नागर संघ

१९ „ नारायण गुरुनाथ तिमाजी बाळण्णवर, कुंदगोळ.

### सांवशी व कमडोळी नागर संघ

२० „ पंचाप्पा बसलिंगाप्पा कोरी, सांवशी

### जमखंडी ग्रामिक मतदार संघ

२१ „ पावाड्याप्पा मल्लाप्पा बंगी वकील, जमखंडी.

२२ „ गिरमल्लाप्पा आल्लाप्पा होसूर, जमखंडी.

### सावळगी ग्रामिक संघ

२३ स. स. हणमंताप्पा भीमाप्पा सावकार, जमखंडी.

### कुंदगोळ ग्रामिक संघ

२४ „ गोविंद दत्तात्रय आपटे वकील, कुंदगोळ.

२५ „ शिवाजी गंगाधर कुलकर्णी, कुंदगोळ.

### वाठार ग्रामिक संघ

२६ „ पांडू भाऊ जगदाळे, शिरवडें.

### पाठकळ ग्रामिक संघ

२७ „ कृष्णाजी गंगाराम शिवपूजे, मुढवी.

### शैक्षणिक मतदार संघ

२८ „ वेंकटेश राजाराम देवधर वकील, जमखंडी.

### व्यापारी मतदार संघ

२९ „ तिलोकचंद केसरचंद लाहोटी, जमखंडी.

### तैनातदार मतदार संघ

३० „ केंचणगौडा रंगणगौडा नाडगीर, कुंदगोळ.

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ

## गुरुवार, ता. २२-८-४० इ.

### दिवस पहिला—वेळ सकाळीं ९॥ वाजतां

आगाऊ जाहीर झाल्याप्रमाणें ता. २२-८-४० इ. रोजीं जमखंडी येथील परशुरामभाऊ हायस्कूलच्या इमारतींत जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या सातव्या अधिवेशनास सुरुवात झाली. सकाळीं ९। वाजतां कायदेमंडळाचे सभासद हायस्कूलमध्यें आल्यावर स. स. रावसाहेब बाबूराव पटवर्धन, डिस्ट्रिक्ट जज्ज व स. स. रावसाहेब शंकरराव आपटे, सरकारी वकील या नवीन सभासदांचा शपथविधि अध्यक्षांचेपुढें झाला. या अधिवेशनापुरते अध्यक्ष म्हणून संस्थानचे माजी दिवाण व कायदेमंडळाचे गेलीं सहा वर्षें अध्यक्ष असलेले रा. ब. बाळ यांचीच योजना करण्यांत आली होती, त्यांचा शपथविधि अगोदर ९ वाजतां कायदेमंडळाचे कायमचे अध्यक्ष रा. ब. दिवाणसाहेब यांचेपुढें झाला होता. सकाळीं साडेनऊ वाजतां श्रीमंत राजेसाहेब हे अधिवेशनाचे जागीं अश्वरथांतून दरबारी पोषाखांत प्रायव्हेट सेक्रेटरीसह हजर झाले. त्यावेळीं असेंब्लीच्या हॉलपाशीं त्यांना गार्ड ऑफ आनर्सची सलामी झाली, व मेहेरबान रावबहादूर अध्यक्ष व रा. ब. दिवाण यांनीं श्रीमंत राजेसाहेब यांचें स्वागत केल्यावर खास तयार केलेल्या उच्चासनावर श्रीमंत राजेसाहेब आरूढ झाले. सर्व सभासदांनीं उत्थापन देऊन श्रीमंतांना अभिवादन केल्यावर श्रीमंत राजेसाहेब यांनीं मंडळाला उद्देशून खालील प्रकारचें भाषण केलें.

### श्रीमंत राजासाहेब यांचें भाषण

कायदेमंडळाचे सन्मान्य अध्यक्ष व सन्मान्य सभासदहो,

संस्थानच्या निरनिराळ्या भागांतून आपण या अधिवेशनासाठीं या ठिकाणीं उपस्थित झाला आहां. आपणां सर्वांचें आम्ही अत्यंत आनंदानें व अंतःकरणपूर्वक स्वागत करून आपलें हें अधिवेशन पूर्णपणें यशस्वी व्हावें असें चिंतितों.

गेल्या अधिवेशनांतील आमच्या प्रास्ताविक भाषणांत, आम्हीं, मंडळाची मुदत वाढविणें आम्हांस जरूरीचें न वाटल्यास हें मंडळ आपोआपच बरखास्त होईल, असें म्हटलें होतें. तें अधिवेशन झाल्यानंतर आम्हांस या मंडळाची मुदत एक वर्ष वाढविणें जरूरीचें वाटल्यानें आम्हीं तसा हुकूम काढला. त्यामुळें याच मंडळाचें हें अधिवेशन भरविणेंत येत आहे. या प्रसंगीं आपणांपुढें दोन शब्द बोलण्याची आम्हांस यामुळ संधि मिळत आहे, याबद्दलही आम्हांस आनंद वाटतो.

अगदीं पहिली गोष्ट म्हटली म्हणजे मालिक-मा-आझम कैसर-ई-हिंद बादशहा सहावे जॉर्ज यांचे व्यक्तीबद्दल व गादीबद्दल राजनिष्ठा व्यक्त करणें ही होय. व ही गोष्ट आम्ही मोठ्या आनंदानें करीत आहों. तसेंच साम्राज्य सरकाराशीं व इतर संस्थानिकांशीं आमचे संबंध अत्यंत प्रेमाचे व सलोख्याचे आहेत ही गोष्टही नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटत आहे.

यानंतर इतर गोष्टींकडे वळण्यापूर्वी, आमच्या व आपल्या सर्वांच्या चित्तास व्यग्र करून टाकणाऱ्या एका गोष्टीचा उल्लेख करणें भाग आहे. ती गोष्ट म्हणजे सांप्रत युरोप खंडांत चालूं असलेलें महायुद्ध ही होय. हा भीषण संग्राम टाळावा म्हणून इंग्लंडनें व बादशहांच्या प्रधान मंडळानें आटोकाट प्रयत्न केले. परंतु त्या प्रयत्नांस यश न येतां, केवळ लोकशाहीच्या उच्च तत्त्वाच्या पुरस्कारासाठीं आणि लहान लहान स्वतंत्र राष्ट्रांच्या रक्षणासाठींच साम्राज्य सरकाराला जर्मनीचे विरुद्ध शस्त्र उपसावें लागलें आहे. हें युद्ध चालविण्यांत इंग्लंडचा कांहीं स्वार्थ नाहीं, अगर त्यास दुसऱ्याच्या प्रदेशावर आक्रमणही करावयाचें नाहीं; तर केवळ हिटलरशाहीचा नायनाट व्हावा आणि जगांत सुव्यवस्था नांदावी याचसाठीं आमच्या सम्राटांना या संग्रामांत भाग घ्यावा लागला आहे. "यतो धर्मस्ततो जयः" या न्यायानें सत्याचा विजय होऊन, जयश्रीची माळ साम्राज्य सरकारच्याच गळयांत पडेल याबद्दल आम्हांस तरी शंका वाटत नाहीं. तथापि तूर्त तरी आणीबाणीची वेळ प्राप्त झाली असून संकट मोठें आलें आहे, ही गोष्ट खरी आहे. या वेळीं या युद्धांत साम्राज्य सरकारला विजय मिळावा अशी अनन्य-भावानें परमेश्वराची प्रार्थना करून सर्व प्रकारांनीं आपण सरकारांस मदत करण्यास पुढें आलें पाहिजे हें आम्ही सांगावयास नकोच. माणसें पुरवून, द्रव्य पुरवून आणि अन्य रीतीनें अशी मदत आपणांस करतां येण्याजोगी आहे व आपण करीतही आहां; असें असलें तरी प्रसंगाचें महत्त्व ध्यानांत घेऊन, आणि या युद्धाचे निर्णयावर केवळ इंग्लंडचेंच नव्हे तर हिंदुस्थानचें देखील भवितव्य अवलंबून आहे, ही गोष्ट चित्तांत बाळगून, आमच्या प्रजेनें, या युद्धाचे कामीं मदत करण्याची पराकाष्ठा करावी असें आमचें आग्रहाचें सांगणें आहे.

यानंतर राज्यकारभाराच्या बाबींकडे वळण्यापूर्वी दुसऱ्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. पहिली महत्त्वाची आणि आनंदाची गोष्ट ही कीं, आमचे संस्थानास नरेंद्रमंडळाच्या सभासदत्वाचा वैयक्तिक हक्क मिळाला आहे. आम्हीं गेलीं दहा वर्षे जमखंडी, मिरज सीनियर, मिरज ज्यूनियर, कुरुंदवाड सीनियर, रामदुर्ग, सोंडूर व सावनूर अशा सात संस्थानांतर्फे निवडलेले प्रतिनिधि म्हणून नरेंद्रमंडळांत काम करीत होतों, ही गोष्ट आपणांस विदितच आहे. आतां आम्हांला व्यक्तिशः सभासदत्वाचा मान मिळाला आहे. ही गोष्ट साध्य होणेबद्दल सन १९२१ सालीं नरेंद्रमंडळाची स्थापना झाली त्या वेळेपासून आमचे परमपूज्य वडील तीर्थरूप कै. सर परशुरामराव भाऊसाहेब यांचे व आम्हीं गादीवर आल्यापासून आमचे प्रयत्न चालूं होते. हा प्रश्न आम्ही नरेंद्रमंडळांतही उपस्थित केला होता. आणि याबद्दल नेक नामदार व्हाइसरॉयसाहेब यांचेकडे मेमोरियलसही करण्यांत आलीं होतीं. आमच्या प्रयत्नास परमेश्वरकृपेनें आतां यश आलें आहे ही मोठ्या

आनंदाची गोष्ट होय. आम्ही याबद्दल नेक नामदार व्हाइसरॉयसाहेब यांचे आभारी आहों. यामुळें आमचा व्यक्तिशः मान तर झालाच आहे, पण आमच्या संस्थानचा दर्जाही वाढला आहे ही मोठ्या अभिमानाची गोष्ट होय.

दुसरी आनंदाची गोष्ट सांगावयाची ती ही कीं, आमचे प्रायव्हेट सेक्रेटरी रावसाहेब महादेव भास्कर महाजन यांना नेक नामदार व्हाइसरॉयसाहेब यांचेकडून "रावसाहेब" हा बहुमानाचा किताब मिळाला ही होय. यामुळें साम्राज्य सरकारनें रावसाहेब महाजन यांच्या व्यक्तिनिष्ठ गुणांचा आणि संस्थानी नोकरीचा गौरव तर केला आहेच; परंतु आमच्या एका प्रमुख अधिकाऱ्याच्या या गौरवामुळें आमच्या संस्थानच्या राज्यकारभाराचाही गौरव झाला आहे, ही गोष्ट आनंदाची व अभिमानाची आहे. या बहुमानाबद्दल आम्ही रावसाहेब महाजन यांचें पुन्हां अभिनंदन करण्याची यावेळीं संधि घेतों.

संयुक्त राज्यघटनेची पुढील व्यवस्था तूर्त स्थगित झाली आहे. कोणत्या अटीवर आम्ही या घटनेंत सामील होण्यास कबूल आहों, ही विचारणा साम्राज्य सरकारकडून करण्यांत येऊन सामीलनाम्याचा अखेरचा मसुदाही आमचेकडे विचारासाठीं धाडण्यांत आला होता, ही गोष्ट आम्हीं या मंडळाच्या गेल्या अधिवेशनांतील आमच्या भाषणांत उल्लेखिली आहेच. त्यानंतर सर्व गोष्टींचा विचार करून संयुक्त राज्यघटनेंत सामील होण्यापासून आमच्या प्रजेचें व आमच्या संस्थानचें हितच होईल अशी खात्री झाल्यानें, आम्हीं या घटनेंत सामील होण्याबद्दलची आमची मान्यता साम्राज्य सरकारास कळविली. परंतु त्यानंतर अगदीं थोड्या दिवसांतच युरोपखंडांत युद्धाच्या ज्वाला भडकल्यामुळें संयुक्त राज्यघटनेचा विचार साम्राज्य सरकारास तहकूब करावा लागला. हें महायुद्ध उद्भवलें नसतें तर या भरतखंडांत संयुक्त राज्यघटनेची पद्धति आतांपर्यंत चालू झाली असती आणि आमच्या संस्थानास या घटनेंतील एक घटक म्हणून स्थान मिळालें असतें, असें मानण्यास जागा आहे. परमेश्वरकृपेनें या महायुद्धांत साम्राज्य सरकार विजयी झाल्यानंतर या प्रश्नाचा समाधानकारक निकाळ त्वरित लागावा असें आम्ही इच्छितों.

या मंडळाचें गेलें अधिवेशन पांच दिवस भरविण्यांत आलें होतें. त्या अधिवेशनांत आपण जे ठराव मंजूर केले होते त्यांतील बहुतेकांस आम्हीं मान्यता दिली असून, त्यांची अंमलबजावणी होणेसाठीं जरूर ते हुकूमही देण्यांत आले आहेत. गेल्या अधिवेशनांत कायद्याचीं कांहीं महत्त्वाचीं बिलेंही मंजूर झालीं आहेत त्यापैकीं मान्यता देतां येण्याजोग्या बिलांना आम्हीं मान्यता दिल्यामुळें त्यांना कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. अशा बिलांपैकीं 'शेतकरी-संरक्षक कायद्याचें बिल' हें विशेष महत्त्वाचें आहे. त्यास आतां कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें असून या कायद्यानें शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यास मदत होईल आणि सावकार व शेतकरी यांचे दरम्यान दुजाभाव उत्पन्न न होतां, हे दोन्ही परस्परांना उपकारकच ठरतील, अशी आम्ही आशा बाळगतों. प्रजेच्या कल्याणाचा ठराव

अगर बिल आपण पास केलें तर त्यास मान्यता देण्यास आमचेकडून सहसा नकार मिळत नाहीं, ही गोष्ट आपल्या निदर्शनाला आलीच असेल.

गेल्या सालीं, पाऊस पुरेसा व वेळेवर पडल्यानें पिकांची स्थिति समाधानकारक होती. यामुळें शेतकरी वर्गास गेलें वर्ष सामान्यपणें सुखाचें गेलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्वच पिकें चांगलीं आलीं. त्यांतल्या त्यांत ज्वारीचे पिकानें तर रयतवर्गास चांगलाच हात दिला. ज्वारीचा पूर्वीचा सांठाही भरपूर होता. गुजराथ व इतर कांहीं ठिकाणीं ज्वारीचा तुटवडा पडल्यानें तिकडील ज्वारीची मागणी विशेष आली व रयतांचे जवळ पुरेसा सांठा असल्यानें ही संधि त्यांना चांगलीच मिळाली. बऱ्याच तेजीच्या भावानें ज्वारी बाहेरगांवीं पाठवितां आल्यानें, रयत वर्गास व व्यापाऱ्यांना विशेषच फायदा झाला. आमचा देश कृषिप्रधान असल्यानें, 'शेतकरी सुखी तर सर्व प्रजा सुखी' हें सूत्र आम्हीं आमचे चित्तांत सदैव जागृत ठेविलें आहे. आम्हीं दिलेल्या पंचवीस टक्याच्या सारासुटीमुळें शेतकऱ्यांवरील साऱ्याचा बोजा बराच हलका झाला आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. पंचवीस टक्के सूट चालू साऱ्यांत देऊन साऱ्याच्या बाकीबद्दलही पूर्वीच हप्तेबंदी ठरविणेंत आली होती. तथापि ही हप्तेबंदी देखील रयत वर्गास आणि विशेषतः कुंदगोळ तालुक्यांतील रयतवर्गास जाचक होऊं लागल्याचें आमचे निदर्शनास येतांच, कांहीं विविक्षित मुदतींत बाकीपैकीं निम्मी रक्कम दिल्यास बाकीच्या निम्म्या रकमेची सूट देणेंत येईल अशीही घोषणा आम्हीं केली. या घोषणेचा फायदा बऱ्याच जणांनीं घेतला ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय.

त्याचप्रमाणें व्यापारी वर्गाच्या विनंतीस मान देऊन आम्ही प्राप्तीवरील कराची किमान मर्यादा रुपये ५०० होती, ती एक हजार रुपये केल्याचें आपणांस माहीतच आहे. यामुळें आमच्या व्यापारी वर्गाचें हित झालें असून, त्यांचे तक्रारीस आतां जागा राहिलेली नाहीं.

आतांच सांगितल्याप्रमाणें सर्वसामान्यपणें रयतवर्गास सूट दिली तरी जमखंडी तालुक्यांतील टकळगी या खेड्यांतील रयतांची साऱ्याचे बाबतींत विशिष्ट तक्रार होती. आपल्या जमिनी कमी प्रतीच्या असून आकार मात्र ज्यास्त प्रमाणांत बसविला गेला आहे, अशी त्यांची तक्रार होती. ही तक्रार दूर व्हावी म्हणून आम्हीं या खेड्यांत साऱ्याचे बाबतींत आणखी दोन आण्यांची जादा सूट दिलेली आहे.

तसेंच खर्चात काटकसर करण्याचे धोरणास अनुसरून, आमच्या नोकरवर्गास कालमर्यादेप्रमाणें मिळावयाचा इजाफा आम्हीं तहकूब केला होता. लढाईमुळें जीवनास अवश्य लागणाऱ्या पदार्थांचे भाव वाढल्यामुळें नोकरवर्गास आर्थिक अडचण तीव्रपणें भासूं लागल्याचें आमचे नजरेस येतांच, ती अडचण दूर व्हावी म्हणून, फर्स्ट ग्रेड व सेकंड ग्रेड ऑफिसर्स व ग्रॅज्युएट नोकर सोडून बाकीच्या सर्व नोकरांच्या बाबतींत इजाफ्याच्या तहकुबीचा हुकूम रहित करून त्यांना नियमाप्रमाणें इजाफा मिळत जाणेबद्दल हुकूम दिला आहे. इतर बाबतींतील गुदस्त सालापासून सुरू केलेल्या काटकसरीच्या योजना अंमलांत आहेतच.

आमचे फडणीस रावबहादूर दिवाण हें चालू सालचें बजेट आपणांपुढें मांडतीलच. हें बजेट गेल्या वर्षीच्या बजेटाप्रमाणें तुटीचेंच बजेट आहे ही गोष्ट आपणांस दिसून आलीच असेल. खर्चांत शक्यतों काटकसर करून देखील तुटीचें बजेट असणें ही गोष्ट टाळतां येणें शक्य झालें नाहीं, याबद्दल आम्हांस खेद वाटतो. आपण निःशंकपणें चर्चा करून सूचना कराव्यात व काटकसरीचे मार्ग सुचवावेत. आपल्या सूचना विधायक स्वरूपाच्या आणि व्यवहार्य असाव्यात हें सांगणें नकोच. गेल्या वर्षीचें बजेट आणि चालू सालचें बजेट हीं दोन्हीं ताडून पाहिलीं असतां रयतवर्गाच्या कल्याणासाठीं कांहीं नवीन बाबी चालू सालच्या बजेटांत योजल्या असून, त्यासाठीं कांहीं खर्चाच्या रकमाही धरण्यांत आल्या आहेत ही गोष्ट ध्यानांत घेतली तर, चालू बजेट हें तुटीचें असलें तरी स्वीकारार्ह आहे असें म्हणावें लागतें. आपण सर्व गोष्टी ध्यानीं घेऊन विधायक सूचना निःशंकपणें कराव्या. उत्पन्नाच्या बाबी अगदींच मोजक्या आहेत. साऱ्यांत दिलेली सूट जाणवण्याजोगी आहे. खर्चाच्या बाबी व खातीं वाढतीं आहेत.

प्रजेच्या आकांक्षा पुरविण्याचे दृष्टीनें उत्पन्न वाढल्याशिवाय मार्ग नाहीं, असें असूनही, चालू सालीं कोणताही नवीन कर न बसवितां, किंवा असलेल्या करांत वाढ न करितां बजेटाची तोंड मिळवणी करण्यांत आली आहे, हें आपल्या ध्यानीं आलें असेलच.

आतां आम्ही एका महत्त्वाच्या बाबीकडे वळतों. आमच्या राज्यकारभाराचें धोरण कसें आहे व कसें राहील याचा पुनरुच्चार आम्हीं करीत नाहीं. आमच्या प्रजेनें राज्यकारभाराचे बाबतींत अंशभागी व्हावें आणि क्रमानें आमचा राज्यकारभार लोकमतानुवर्ती व्हावा, हें आमचें ध्येय आम्हीं पूर्वींच जाहीर केलें आहे. आणि याचाच उपक्रम म्हणून आम्हीं सन १९३२ सालींच या कायदेमंडळाची स्थापना केली. क्रमाक्रमानें आमच्या प्रजेच्या आकांक्षा वाढूं लागल्या आणि त्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीं, पहिला हप्ता म्हणून अधिकारदानाचे बाबतींत कसा उपक्रम करावा याबद्दल सूचना करणेसाठीं आम्हीं गेल्या वर्षीच सरकारी अधिकारी व प्रजेचे प्रतिनिधि अशा आठ जणांची समिती नेमिली होती, हें आपणांस माहितच आहे. सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन राजकीय सुधारणेचा पहिला हप्ता काय असावा आणि हल्लींच्या कायदे-मंडळाची घटना त्या अनुरोधानें कशी असावी या दोन मुख्य गोष्टींबद्दल सूचना करण्याचें काम सदर समितीकडे सोंपविलें होतें. आणि सरकारी दप्तर हल्लीं मराठींत आहे त्या बाबतींत, आमच्या संस्थानांतील बहुसंख्य लोकांची भाषा कानडी असल्यानें त्यांच्या अडचणी लक्षांत घेऊन काय फरक करावा याबद्दलही सूचना करण्याचें काम सदर समितीकडे सोंपविले होतें. त्याप्रमाणें सदर समितीनें सद्रहू तीन्ही बाबींबद्दलचे सूचनांचा रिपोर्ट सादर केला आहे. तो रिपोर्ट छापविणेंत आला असून त्याच्या प्रतीही आपणांस मिळाल्या असतील अगर मिळतील. या रिपोर्टावरून सद्रहू महत्त्वाच्या बाबतींत समितीच्या शिफारसी काय आहेत हें आपणांस कळून येतच आहे. आतां याबद्दलचें आमचें म्हणणें काय आहे हें समजून घेण्यास आपण अत्यंत उत्सुक असाल, हें अगदीं स्वाभाविकच आहे. राजकीय सुधारणांची आपण अत्यंत आतुरतेनें वाट पहात आहांत आणि या बाबतींत

आम्ही काय घोषणा करतों, इकडे आपलें लक्ष लागलेलें आहे हें आम्ही जाणतों. असें असलें तरी, या महत्त्वाच्या बाबीबद्दल आज या प्रसंगीं आम्हांस आमचा अभिप्राय व्यक्त करतां येत नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. राजकीय सुधारणा देणेसाठीं आम्ही स्वतःही अत्यंत उत्सुक आहोंत, आणि आम्हीं मनांत योजल्याप्रमाणें या अधिवेशनांत आम्हांस या बाबतींत घोषणा करतां येत नाहीं याबद्दल आम्हां स्वतःलाही आपल्याप्रमाणेंच निराशेचें दुःख सोसावें लागत आहे. असें असलें तरी, याबद्दलचें कारण मात्र अगदीं योग्यच आहे ही गोष्ट आपण ध्यानीं घ्यावी. तें कारण असें. समितीचा रिपोर्ट गेल्या महिन्यांत आमचेकडे आल्यानंतर आम्ही त्याबद्दल विचार करून आमचा स्वतःचा निर्णयही ठरविला. परंतु हा निर्णय जाहीर करण्यापूर्वी, तो नेक नामदार व्हाइसरॉयसाहेब यांचेकडून मान्य होऊन येणेची जरूरी व इष्टता उत्पन्न झाल्यानें तो त्यांचेकडे पाठविणेंत आला आहे. नेक नामदार व्हाइसरॉयसाहेब यांची पसंति अद्यापि हातीं आली नसल्यानें केवळ नाइलाजानें आमचा निर्णय आम्हास या ठिकाणीं व्यक्त करतां येत नाहीं. या गोष्टीस इलाजच नसल्यानें आपणांस कांहीं दिवस थांबलें पाहिजे. थोड्याच दिवसांत आम्हीं योजलेल्या सुधारणांना साम्राज्य सरकारांची मान्यता मिळेल आणि आम्ही त्या सुधारणा शक्यतों लौकर, योग्य प्रसंग पाहून जाहीर करूं शकूं असा आम्हांस भरंवसा वाटतो.

मात्र आम्हीं आतांच उल्लेखिलेली अडचण, दप्तर कानडी करण्याचे प्रश्नाचे बाबतींत आड येणारी नसल्यानें तेवढ्यापुरता आमचा निर्णय जाहीर करण्याची ही संधि आम्हीं आनंदानें घेत आहों. आम्हांस सांगण्यास संतोष वाटतो कीं या बाबीबद्दल समितीच्या सर्व सभासदांचा रिपोर्ट बहुतांशीं एकमताचा आहे. अगदीं एकाच वाक्यांत आमचा निर्णय सांगायचा तर, आम्ही असें सांगतों कीं, आम्हांसही हा समितीचा एकमताचा निर्णय मान्य आहे. या बाबतींत मुख्य सूत्र हें आहे कीं आमच्या संस्थानांत कानडी व मराठी या दोन्हीं भाषा सरकारी भाषा म्हणून नांदाव्यात आणि सरकार दप्तरही सोईप्रमाणें दोन्हीं भाषांत संमिश्र रीतीनें ठेविलें जावें. याबद्दलचें विस्तृत विवेचन समितीच्या रिपोर्टांत केलेलेंच आहे. या सर्व गोष्टींचा निर्देश या ठिकाणीं करण्याची जरूरी नाहीं. तथापि मुख्य मुख्य गोष्टींबद्दल आम्हीं पुढीलप्रमाणें तजवीज करण्याचें ठरविलें आहे.

( १ ) गांव-कामगारांचीं दप्तरें जरूरीप्रमाणें व सोईप्रमाणें मराठी व कानडी अशा दोन्ही भाषांत मिश्र स्वरूपांत राहतील.

( २ ) मामलेदार कचेरींचें दप्तरही त्याचप्रमाणें मिश्र स्वरूपांत राहील.

( ३ ) सब-जज्ज कोर्टाची भाषा कानडी व मराठी अशा दोन्ही मान्य केल्या जातील.

( ४ ) सब-रजिस्टर कचेरींतील नोंदणीचे संबंधानें मराठी अगर कानडी अशा ज्या भाषेंत दस्तऐवज असेल, त्या भाषेंतच तो नोंदण्याची तजवीज केली जाईल.

( ५ ) सरकारी गॅझेटांत लोकांच्या विशेष माहितीसाठीं प्रसिद्ध करावयाचा मजकूर जाहीरनामे, नोटिसा वगैरे जरूरीप्रमाणें दोन्ही भाषांत प्रसिद्ध केल्या जातील.

( ६ ) सबजज्ज कोर्टापेक्षां वरिष्ठ कोर्टाच्या कामकाजांत आणि मामलेदार ऑफिसचे वरिष्ठ ऑफिसांतील कामकाजाचे बाबतींत हल्लीं असले पद्धतींत कांहीं फरक करण्याचें कारण दिसत नाहीं. तथापि या कचेऱ्यांतून देखील जरूरी प्रमाणें अर्ज व जबाब कानडींतून आल्यास त्याचा स्वीकार करणेंत येईल.

( ७ ) संस्थानांतील खेड्यामधील प्राथमिक शाळा हल्लीं कानडींतूनच शिक्षण देणाऱ्या आहेत. जमखंडी शहरीं व कुंदगोळ येथें कानडी व मराठी दोन्ही भाषेच्या निरनिराळ्या शाळा आहेत. पाठखळ व वाठार हीं ठाणीं मराठीच असल्यानें तेथील शाळा मराठी शिक्षण देणाऱ्याच आहेत. ही सर्व व्यवस्था चालू राहणेची आहे. प्राथमिक शाळेंत, दुसऱ्या इयत्तेचे पासून लिहिण्यावाचण्यापुरतें दोन्हीं भाषांचें ज्ञान मिळावें, असें इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे बाबतींत तशी सोय करणेंत येईल.

( ८ ) अल्पसंख्याक वर्गाची, मग तो मराठी असो किंवा कानडी असो, भाषाविषयक शिक्षणाची अडचण जरूर व शक्य त्या प्रमाणांत दूर करण्याची तजवीज केली जाईल.

( ९ ) सर्व सुपीरियर वर्गातील नोकर लोकांना कानडी व मराठी या दोन्ही भाषा चांगल्याप्रकारें लिहीतां वाचतां आल्या पाहिजेत अशी सक्ति नोकरीचा नियम म्हणून त्यांचेवर करणेंत येईल.

( १० ) अर्जदारास उत्तर देणेचें झाल्यास तें त्याच्या अर्जाचे भाषेंत दिलें जाण्याची पद्धति सुरू केली जाईल.

स्थूलमानानें आम्हीं मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या त्या व समितीनें सुचविलेल्या इतर गोष्टींच्या अनुरोधानें आम्हीं सर्व व्यवस्था करण्याचें ठरविलें आहे. ही सर्व व्यवस्था पुरी करण्याची मुदत आतांपासून पांच वर्षांची असावी असें समितीनें सुचविलें आहे. ही कालमर्यादा आम्हांसही मान्य आहे. या अवधींत ही योजना पूर्णपणें अंमलांत आणण्याचें आम्हीं ठरविलें असून, त्याबद्दल जरूर ते हुकूमही देण्यांत येत आहेत.

कानडी मराठी प्रश्नाबद्दल एकमुखी रिपोर्ट करण्याचें श्रेय समितींतील सभासदांनीं मिळविलें याबद्दल आम्हांस संतोष वाटत असून, आम्ही या यशाबद्दल समितींतील सर्व सभासदांचें अभिनंदन करतों. हा भाषावाद केव्हांही विकोपास जाऊं नये, आणि दोन्ही भाषा बोलणाऱ्या आमच्या प्रजेनें परस्परांशीं सहानुभूतीनें आणि प्रेमानें वागावें, अशी आमची उत्कट इच्छा असून आमचे प्रयत्न केव्हांही त्या दिशेनें चालू राहतीलच. आतां समितीनें सुचविल्याप्रमाणें सर्व गोष्टी अंमलांत येतील. अशा रीतीनें आमच्या संस्थानांतील हा कानडी मराठी भाषेचा प्रश्न फार समाधानकारक रीतीनें संपला हें पाहून आमचेप्रमाणें आपणासही संतोष होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

घटना समितीनें परिश्रमपूर्वक सर्व गोष्टींची चर्चा करून व काळजीपूर्वक रिपोर्ट लिहून आम्हांकडे सादर केला, याबद्दल समितींतील सभासदांचे जाहीर रीतीनें आभार मानण्याची संधि आम्ही या प्रसंगीं घेऊं इच्छितों.

या अधिवेशनांत, आपण योग्य कामगिरी कराल, असा आम्हांस भरंवसा वाटतो. होतां होईतों मतैक्य साधावें; तथापि मतभेद उत्पन्न झाल्यास तो स्पष्टपणें व्यक्त करण्यासही हरकत नाहीं. मात्र मतभेद व्यक्त करण्याचा मार्ग उपहासात्मक नसावा.

सन्मान्य अध्यक्ष व सभासदहो आम्ही आतां आपला फार वेळ घेऊं इच्छित नाहीं. एकाच गोष्टीचा आणखी उल्लेख करून आम्ही आगचें भाषण संपवितों. ती गोष्ट म्हणजे या अधिवेशनाचे अध्यक्ष रावबहादूर रामचंद्र केशव बाळ यांचे आभार मानणें, ही होय. आपले असेंब्लीचे सुरवातीपासून रावबहादूर बाळ हेच अध्यक्ष आहेत, आणि अध्यक्ष नात्यानें त्यांनीं आपलें काम किती चोख आणि समाधानकारक रीतीनें बजाविलें आहे हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. चालू सालीं देखील अध्यक्षस्थान स्वीकारून अधिवेशनाचें काम पार पाडावें, या आमच्या विनंतीस मान देऊन या उतारवयांत दगदग सोसून आणि आपल्या अडचणी बाजूस ठेवून, त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों.

या मंडळाची मुदत आतां पुरी होत आहे. पुढील निवडणुकींत आपण यशस्वी व्हावें आणि आपणां सर्वांचें स्वागत करण्याची संधि आम्हांस पुढील अधिवेशनाचे प्रसंगीं मिळावी, असें आम्ही इच्छितों.

आपलें हें अधिवेशन श्रीगणपतीच्या कृपेनें पूर्ण यशस्वी व्हावें अशी त्याची प्रार्थना करून आणि आमचे चार शब्द आपण शांत चित्तानें ऐकून घेतले, ह्याबद्दल आपणां सर्वांचे आभार मानून, आम्हीं आपली रजा घेतों.

याप्रमाणें श्रीमंत राजेसाहेबांचें भाषण झाल्यावर सकाळचा कार्यक्रम समाप्त झाला.

### दुपारची बैठक

## हजर असले सभासदांची यादी

स. स. मे. रा. ब. रामचंद्र केशव भागवत, दिवाण जमखंडी; स. स. रा. सा. भास्कर बहिरव महाबळ, B. A., LL. B.; स. स. रा. सा. अमृतराव व्यंकटराव धारेश्वर, M. A., LL. B.; स. स. रा. सा. भालचंद्र रामचंद्र पटवर्धन, M. A., LL. B.; स. स. रा. सा. रामचंद्र व्यंकटेश पुराणिक, B. E. (Civil); स. स. रा. सा. भालचंद्र चिंतामण पटवर्धन, M. B., B. S.; स. स. रा. सा. अप्पासाहेब मुरारराव घोरपडे; स. स. रा. सा. हरि चिंतामण पटवर्धन, B. A.; स. स. रा. सा. शंकर अनंत आपटे, B. A., LL. B.; स. स. व्यंकटेश श्रीनिवास आनिखिंडी; स. स. नागेश बिष्टो देसाई जमेदार; स. स. रुकनोद्दीन सिराजसाहेब काजी; स. स. रा. सा. विनायक गंगाधर गोखले; रा. सा. सत्यापा हणमपा जमखंडी; स. स. खंडेराव गोविंदराव घोरपडे; स. स. पांडू भाऊ जगदाळे; स. स. कृष्णाजी गंगाधर

शिवपूजे; स. स. व्यंकटेश राजाराम देवधर, B. A., LL. B.; स. स. वीरभद्रापा आल्लापा मंढी, B. A., LL. B.; स. स. कंचनगौडा रंगनगौडा नाडगीर.

दुपारीं एक वाजतां अधिवेशनाच्या कामास सुरवात झाली. प्रथमतः मे. अध्यक्ष रा. ब. बाळ यांनीं सभासदांचें स्वागत करतांना पुढीलप्रमाणें भाषण केलें:——

## मे. अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण

" सन्मान्य सभासदहो, श्रीमंत राजेसाहेब सरकारांनीं आज सकाळीं सर्वांचें स्वागत केलेंच आहे. मीही पण आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. हें काम करण्यांत मला स्वतःला फार आनंद वाटत आहे. मला येथें पुन्हां पाहून कदाचित् आपल्यापैकीं कांहीं मंडळींना थोडें आश्चर्य वाटेल व निराळया भावना उत्पन्न होतील. गेल्या वर्षी अधिवेशन संपवून मीं आपला जवळ जवळ निरोप घेतला होता. परंतु श्रीमंत सरकारनीं निश्चित केलेली जी योजना तिला विलंब झाला व त्यामुळें श्रीमंत सरकारनीं याच मंडळाची एक वर्ष मुदत वाढविल्यामुळें मी आज रोजीं येथें आपले समोर आहें. माझी कांहींही इच्छा असली तरी श्रीमंत सरकारांची इच्छा ही प्रभावी असल्यामुळें श्रीमंत सरकारांच्या इच्छेस मान देणें हें माझें कर्तव्य समजतों व त्याप्रमाणें मी येथें आलों आहे. आतां आजचे कामाकडे वळूं.

यंदाचा कार्यक्रम पाहूं गेलों तर प्रश्न बरेचसे सुटसुटीत व योग्य असेच आहेत. बिलांच्या संबंधानें बोलावयाचें तर मला असें वाटतें कीं, बिलें सध्यां ज्या स्वरूपांत मांडलीं आहेत त्याच्यापेक्षां व्यवस्थित मांडलीं जावीं. त्याचप्रमाणें त्यांचा आकार योग्य तऱ्हेनें आहे किंवा नाहीं हेंही पाहाणें जरूर आहे. यापुढें बिलें मंडळापुढें आणतांना सन्मान्य सभासद विशेष काळजी घेतील अशी आशा वाटते. ठराव पाहूं गेलों असतां तेही व्यवस्थित व सुटसुटीत आहेत असें वाटतें. असो. आपण सर्व मंडळी सूज्ञ व समयज्ञ आहांत. तेव्हां नेहमींप्रमाणें हें अधिवेशन—शेवटचें आहे तेव्हां—सर्वांच्या सहकार्यानें व सलोख्यानें पार पडेल अशी आशा आहे. राज्यतंत्र चांगलें चालवावयाचें म्हणजे पुष्कळशा त्यांत अडचणी असतात. नुसतें ध्येयवादी असून भागत नाहीं. प्रत्यक्ष व्यवहारांत, ज्या ध्येयवादी गोष्टी असतात त्या अमलांत येतातच असें नाहीं. एकंदर वातावरणावरून आपल्यापैकीं कांहींना राज्यकारभाराच्या तंत्राचा लवकरच अनुभव येणार आहे असें मला वाटतें. असो. माझी आपणां सर्वांना अशी विनंति आहे कीं, पक्षभेद न करतां व कांहींही अडचणी न आणतां सलोख्यानें हें कार्य यशस्वी पार पाडलें तर दोघांनाही सुखावह होईल व तशा तऱ्हेनें तें पार पडेल असें मला वाटतें. आपण प्रथम प्रश्नाला आरंभ करूं. प्रश्न झाल्यानंतर कांहीं अभिनंदनाचे ठराव येतील. तरी आपण आपल्या कामास सुरवात करूं या. येवढें सांगून मी माझें भाषण संपवितों. "

नंतर सेक्रेटरींनीं स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांना आपले प्रश्न विचारण्यास सांगितलें.

### स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांचे प्रश्न

**प्रश्न १ (अ)** आलबाळ गांवचे रयतांकडून, आपले गांवांत चालू असलेल्या प्राथमिक शाळेस सरकारकडून ग्रँट (मदत) मिळणेबद्दल अर्ज आला आहे काय ?

रा. सा. विद्याधिकारी:—होय.

स. स. देवधर:—असे अर्ज किती आले आहेत.

रा. सा. विद्याधिकारी:—असे अर्ज शिलकींत नाहींत.

स. स. देवधर:—दुसऱ्या कुठल्या गांवचा अर्ज आला आहे काय ?

रा. सा. विद्याधिकारी:—नाहीं.

**(ब)** असल्यास, सदर अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल अशा प्रकारची समज त्यांना देणेंत आली आहे काय ?

रा. सा. विद्याधिकारी:—होय.

**(क)** असल्यास ग्रँट केव्हां सुरू करणेंत येईल ?

रा. सा. विद्याधिकारी:—मदत देणेसंबंधीं श्रीमंत राजेसाहेब यांचा हुजूर हुकूमही झाला आहे. H. E. No $\frac{171}{12-8-40}$

**प्रश्न २ (अ)** प्राथमिक शाळेकडील हेडमास्तरांचे जागेवर काम करीत असलेले नोकर एकाच शाळेवर–उदाहरणार्थ बनहट्टी, सावळगी, कमडोळी, फेरीसस्कूल वगैरेंवर प्रत्येकीं किती वर्षांपासून आहेत ?

रा. सा. विद्याधिकारी:—सदरहूप्रमाणें मोठ्या शाळापुरते म्हणजे जमखंडी, फेरीस स्कूल, बनहट्टी कानडी शाळा, सावळगी कानडी शाळा, कमडोळी शाळा, कुंदगोळ शाळा, सावशी हुन्नूर, गोटे, कवटगी, बिद्री व कडपट्टी, अशा शाळांच्या माहितीचें पत्रक टेबलावर ठेवतों.

[ सेक्रेटरी पत्रक वाचून दाखवितात. ]

( परिशिष्ट नं. १ पहा )

**(ब)** तीन वर्षांपेक्षां जास्त दिवस असल्यास तसें करणेचें कारण काय ?

रा. सा. विद्याधिकारी:—शाळांच्या जरुरीप्रमाणें व शिक्षकांच्या शैक्षणिक व इतर योग्यतेप्रमाणें शिक्षक ज्या त्या शाळांवर ठेवणेंत आले असून जरुरीशिवाय आणि योग्य कारणांशिवाय वर्गावर्गी करण्याची वहिवाट नाहीं.

**(क)** कारण कांहींही असो, त्यांच्या बदल्या निरनिराळया शाळेवर करणें व सर्वांना प्रत्येक शाळेचा चान्स देणें इष्ट नाहीं काय ?

रा. सा. विद्याधिकारी:—यांत चान्स देण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं असा वरील उत्तरावरून खुलासा होईल. आणि निष्कारण वर्गावर्गी करणें इष्ट नाहीं असा खात्याचा अनुभव आहे.

## स. स. वीरभद्राप्पा आल्लाप्पा मंडी यांचे प्रश्न

**प्रश्न १.** शेगुणशी, होसूर व आसंगी या गांवच्या सॅनिटेशन कमिट्या अद्यापि अस्तित्वांत आहेत किंवा कसें ? असल्यास त्यांची दहा वर्षाच्या कामाची माहिती देणेंत यावी. त्या त्या गांवच्यां आलेल्या सूचनेप्रमाणें ३।४ वर्षांत त्यांनीं कांहींतरी काम केलें आहे कीं काय ? होसूरहून पाण्याच्या व्यवस्थेसाठीं अर्ज गेल्या वर्षी आला होता काय ? आला असल्यास त्यास काय उत्तर देणेंत आलें आहे ? आतां या कमिट्यांचे मागील १० वर्षांचे हिशेब असेंब्लीपुढें ठेवण्यांत यावे.

रा. ब. दिवाण:—अवधी फारसा नसल्यामुळें दहा वर्षांची माहिती काढण्याचें शक्य झालें नाहीं.

आसंगी सॅनिटेशन कमिटीच्या शिलकेंतून रक्कम रु. ८८१ काढून जमखंडी, बनहट्टी, रोडवर जेथें आसंगीचा रस्ता फुटतो तेथून गांवठाणापर्यंत रस्ता करण्यांत आला आहे. होसूरहून पाण्याच्या व्यवस्थेसाठीं अर्ज आलेला नाहीं.

स. स. मंडी:—वरील दहा वर्षांची माहिती केव्हां मिळूं शकेल ?

रा. ब. दिवाण:—तें मला आतां सांगतां येणार नाहीं. मात्र इतक्या लवकर ती माहिती देतां येणार नाहीं हें खरें.

स. स. मंडी:—गेल्या वर्षीच्या अधिवेशनांत मीं हाच प्रश्न विचारला होता व त्यावेळीं सुद्धां ही माहिती देण्यांत आली नाहीं. त्यावेळीं सुद्धां वेळेचीच सबब सांगणेंत आली होती. म्हणून या वर्षी पुन्हा हा प्रश्न विचारला. तेव्हां आतां सुद्धां वेळेचीच सबब पुढें करण्यांत आली आहे. मग ती माहिती मिळणार तरी केव्हां ?

स. स. देवधर:—ती माहिती केव्हां मिळेल त्याची नक्की तारीख सांगावी.

रा. ब. दिवाण:—तशी मला कशी सांगतां येईल ? तो प्रश्न अकाऊंटचा आहे व ते अकाऊंट मामलेदाराकडे आहेत.

स. स. मंडी:—मामलेदाराकडे माहिती मागितली तर ते सांगतात संस्थानकडे जा.

रा. ब. दिवाण:—आपण त्यांना कधीं लेखी विचारलें आहे काय ? इतकें करूनही जर आपणांस माहिती मिळाली नसेल तर मी त्याबद्दल योग्य ती तजवीज करीन.

स. स. मंडी:—ती माहिती मला असेंब्लीकरितां पाहिजे. वैयक्तिक नको.

रा. ब. दिवाण:—तशी इतक्यांत देतां येणार नाहीं.

स. स. मंडी:—होसूरहून पाण्याच्या व्यवस्थेसाठीं अर्ज आला होता काय ?

रा. ब. दिवाण:—होसूरहून पाण्याच्या व्यवस्थेसंबंधीं अर्ज आलेला नाहीं.

**प्रश्न २.** बनहट्टी म्युनिसिपल कमिटीच्या हद्दींत जमखंडी–रामपूर रस्त्याचा टोलनाका आहे. त्या टोलनाक्याकडून गांवच्या लोकांकडून आसंगीचे नदीस रंगीत सूत धुण्यासाठीं नेलें असतां टोल वसूल केला जात आहे. याबद्दल २।३ वर्षांपासून बनहट्टीचे लोकांकडून अर्ज व तक्रार चालू आहे किंवा कसें? सदर तक्रार दूर करण्यासाठीं सरकारांनीं काय निर्णय केला आहे? यापुढें तरी ती तक्रार दूर करण्यांत येईल काय?

रा. ब. दिवाण:—एकदोन अर्ज आले होते. टोलनाकेवाल्याकडून अर्जदारांस पैसे परत देवविले आहेत. व टोलनाकेवाल्यांस ताकीदही देण्यांत आली आहे. त्यानंतर अशा स्वरूपाच्या तक्रारी पुन्हां आल्या नाहींत. जर अनधिकारानें पैसे वसूल करीत असले तर ती गोष्ट आपण माझ्या नजरेस आणली तर त्याबद्दल मी योग्य ती तजवीज करीन.

**प्रश्न ३.** रा. रा. V. G. Kale, Professor, Poona यांनीं केलेल्या शिफारसीप्रमाणें संस्थानांतील विणण्याच्या उद्योगधंद्याचें पुनरुज्जीवन होणेसाठीं सरकारांकडून तीव्रोपाय करण्यांत येतील काय? येत असल्यास ते कोणते उपाय?

रा. ब. दिवाण:—सदरबद्दल विचार चालू आहे. याबद्दल मीं आपणाला मागेंच सांगितलें आहे. येथें आतां बँक स्थापन झालेली आहे व एक महिन्यानंतर प्रत्यक्ष व्यवहारास सुरवातही होईल.

याच सुमारास आतांपर्यंत गैरहजर राहिलेले सन्मान्य सभासद आले व त्यांच्यातर्फें स. स. वाटवे यांनीं आम्हांस या अधिवेशनाचे कामीं भाग घेणेचा नाहीं असें सांगून मे. रा. ब. अध्यक्ष यांचेकडे यादी दिली. मे. रा. ब. अध्यक्ष यांचे सांगणेवरून सेक्रेटरींनीं यादी वाचून दाखविली.

मेहेरबान रावबहादूर अध्यक्ष, जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ, अधिवेशन ७ वें यांजकडेः–

यादी खालीं सही करणार कायदेमंडळाचे सभासद यांची येणेंप्रमाणेंः–

सन १९३८ सालीं सांवशी प्रजापरिषदेच्या अधिवेशनांत सध्यांचें कायदेमंडळ प्रजेस जबाबदार नसून, त्यायोगें प्रजाहित कांहींही साधतां येत नाहीं असें दिसून आल्यामुळें त्याबरहुकूम ठरावांस अनुसरून बऱ्याच सभासदांनीं आपले राजीनामे दिले होते. परंतु लवकरच दरबारनें घटना-समिति नेमून पुढील सुधारणादान सत्वर अंमलांत आणण्याची तजवीज करण्याचें आश्वासन दिल्यामुळें, त्यावेळीं सदर राजीनामे परत घेण्यांत आले होते. त्या गोष्टीसही आज दोन वर्षांचा काळ लोटला तरी, व आज सकाळीं श्रीमंत राजासाहेब सरकार यांनींही आपले भाषणाचे वेळीं अद्यापि पुढील सुधारणा-दानाची घोषणा न केल्यामुळें व विद्यमान कायदेमंडळांत राहून लोकहित साधतां येत नाहीं असें आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसून आल्यामुळें, नाइलाजानें आम्हांस त्यावेळचा निर्णय अत्यंत जड मनानें पुन्हां

अंमलांत आणणें भाग पडत आहे, व त्याप्रमाणें चालू अधिवेशनांत आम्हांस कोणताही भाग घेतां येत नाहीं हें कळविणेस आम्हांस अत्यंत वाईट वाटत आहे.

मे. कळावें, ता. २२-८-४० इ.

( १ ) पांडुरंग बळवंत वाटवे
( २ ) पावड्याप्पा मल्लाप्पा बंगी
( ३ ) तिलोकचंद केसरचंद लाहोटी
( ४ ) गिरमल्लाप्पा आल्लाप्पा होसूर
( ५ ) शिवलिंगप्पा सिद्रामप्पा सावळगी
( ६ ) आडवय्या दुंडय्या मुधोळ
( ७ ) गोविंद दत्तात्रय आपटे
( ८ ) शिवाजी गंगाधर कुलकर्णी
( ९ ) पंचाप्पा बसलिंगप्पा कोरी
(१०) नारायण गुरुनाथ तिमाजी बाळण्णवर

मे. अध्यक्षः—( स. स. वाटवे प्रभृतींस उद्देशून )— सकाळीं श्रीमंतांनीं सांगितलेलें कारण आपणांस योग्य नाहीं असें वाटतें काय ?

स. स. वाटवेः—आतां आमची चर्चा करण्याची इच्छा नाहीं.

( स. स. वाटवे प्रभृति दहा सभासद सभागृहाचा त्याग करतात )

नंतर रा. सा. महाबळ असेंब्लीच्या कामकाजासंबंधींचा नियम २७ वाचून दाखवितात व त्याप्रमाणें पुढील कामास सुरवात होते.

रा. सा. महाबळः—सर्व प्रश्न सार्वजनिक हिताचे दृष्टीनें महत्त्वाचे असल्यानें वाचणेंत यावेत.

[ सेक्रेटरी प्रश्न वाचतात ]

### स. स. गोविंद दत्तात्रय आपटे यांचे प्रश्न

प्रश्न १ ( अ ) गांवकामगारांनीं प्रत्येक वर्षीं जुलईअखेरचे आंत आपल्या गांवांतील नवीन हिस्से ( The formation of new Hissas ) पाडणेसंबंधीं रेव्हेन्यू अकौंट म्यॅन्युअलमध्यें सांगितल्याप्रमाणें, मामलेदाराकडे अगर डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस यांचेकडे कायद्यानें समज पाठविणें जरूर असतां तशी कां पाठविण्यांत येत नाहीं ?

रा. ब. दिवाणसाहेबः—तशी वहिवाट नाहीं.

( ब ) लँड रेव्हेन्यू कोडप्रमाणें व रुढीप्रमाणें प्रत्येक वर्षीं पोटमोजणी होऊन फील्डबुकें तयार होतात किंवा कसें ?

रा. ब. दिवाणसाहेबः—वर्षाच्या वर्षास कांहीं पोटमोजणी होत नाहीं. कारण तशी वहिवाट संस्थानांत नाहीं.

( क ) नसल्यास, कुंदगोळ तालुक्यांत गेल्या दहा वर्षांत अशी पोटमोजणी कां तयार करण्यांत आली नाहीं आणि फील्डबुकेंही कां तयार करण्यांत आलीं नाहींत ?

रा. ब. दिवाणसाहेबः—जरूर ती तजवीज यापुढें करण्याबाबत थोडी थोडी सुरवात नवीन सालापासून करण्यांत येत आहे. आतांपर्यंत संस्थानांत तशी वहिवाट नव्हती.

प्रश्न २ (अ) संस्थानमजकुरीं तपासणी व अपेलेट अधिकारी या नात्यानें हायकोर्ट जज्ज, डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व कलेक्टर आणि पोलिस इन्स्पेक्टर यांना असलेल्या अधिकारास अनुसरून त्यांचेकडून त्यांच्या अधिकारक्षेत्रांतील व हाताखालील न्याय, मुलकी व पोलीस अधिकाऱ्यांच्या न्यायदानविषयक कामांतील निर्णयांच्या बाबतींत, त्यांचे हातून झालेल्या निर्णयांचे प्रमाद, नियमाचें उल्लंघन व अधिकाराचा गैरउपयोग किंवा दुरुपयोग या बाबतींत त्यांना पुढें मार्गदर्शक होईल अशा रीतीनें त्यांच्या कामाची दरसाल तपासणी करण्यांत येते काय ?

रा. सा. महाबळ:—होय. तपासणी करण्यांत येते.

( ब ) असल्यास तपासणींत या बाबतींत दिसून येणाऱ्या चुका नमूद ( लेखी ) करून ठेवण्याची पद्धत अंमलांत आहे काय ?

रा. सा. महाबळ:—तपासणीच्या वेळीं आढळून येणाऱ्या चुकांबद्दल लेखी चूकपट्टी तयार करण्यांत येते.

( क ) या हाताखालील अधिकाऱ्यांना, तपासणींत दिसून आलेल्या त्यांच्या या बाबतींत त्या चुकांसंबंधानें दरसाल लेखी सूचना देण्याची पद्धत अंमलांत आहे काय ?

रा. सा. महाबळ:—होय. तयार केलेली चूकपट्टी खालच्या अधिकाऱ्यांना पाठविण्यांत येते.

( ड ) तपासणी व अपेलेट अधिकाऱ्यांकडून देण्यांत आलेल्या सूचना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व जमखंडी दरबारकडे पाठविण्याची पद्धत अंमलांत आहे काय ?

रा. सा. महाबळ:—वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व जमखंडी दरबारकडे अशा सूचना पाठविण्याची पद्धत अंमलांत आहे.

( इ ) या सूचनांमुळें पुढें या हाताखालील अधिकाऱ्यांच्या कामांत सुधारणा होते आहे किंवा नाहीं तें पाहाण्याची पद्धत अंमलांत आहे काय ?

रा. सा. महाबळ:—होय.

( फ ) या प्रश्नांतील ( अ ) ( ब ) ( क ) ( ड ) ( इ ) यांत विचारलेल्या सर्व उपप्रश्नांतील विषयांच्या बाबतींत हल्लीं पद्धत अंमलांत नसेल तर किंवा त्यापैकीं अंशतः अशी पद्धत अंमलांत असेल तर तशी पद्धत पूर्णतः अंमलांत आणण्यांत येईल काय ?

रा. सा. महाबळ:—कायद्याप्रमाणें जरूर ती सर्व तजवीज केली जाते.

स. स. देवधर:—लेखी सूचना चुकांबद्दल देणेंत येते काय ?

रा. सा. महाबळ:—होय. लेखी खुलासे मागविणेंत येतात व त्या त्या अंमलदारांना सूचना देणेंत येतात.

स. स. देवधर:—याहून कडक उपाय केले आहेत काय ? दंड वगैरेचा अम्मल केला आहे काय ? अशीं कांहीं उदाहरणें आहेत काय ?

रा. सा. महाबळ:—तसें कांहीं उदाहरण माझ्या पाहाण्यांत नाहीं.

प्रश्न ३ (अ) सिव्हिल प्रोसिजर कोड कलम ६८ प्रमाणें जमखंडी दरबारनें दरखास्तीबजावणीचें काम कलेक्टर यांचेकडे पाठविणेबाबत जाहीरनामा काढला आहे काय ?

रा. सा. महाबळ:—होय. सदरहूची प्रसिद्धि सन १९१७ सालाचे ७ ऑगस्टचें स्टेट गॅझेट पान २१ वर झाली आहे.

(ब) असल्यास हा जाहीरनामा कोणत्या प्रकारच्या हुकुमनाम्यांना लागू केलेला आहे ?

रा. सा. महाबळ:—जमीन-विक्रीबद्दलच्या दरखास्तीला.

(क) सिव्हिल प्रोसिजर कोड शेड्यूल ३ पॅरा १ (अ) आणि (ब) मध्यें सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें शक्यतोंवर कलेक्टरकडे पाठविण्यांत आलेल्या दरखास्तीची बजावणी करण्याचें सवलतीचें धोरण जमखंडी दरबारनें ठेवलें आहे काय ?

रा. सा. महाबळ:—होय. ठेवलें आहे.

(ड) अशा प्रकारें सवलतीचें धोरण कोणत्या प्रसंगीं व कां अंमलांत आणणेचें यासंबंधीं सदर धोरणाचें स्वरूप स्पष्ट करणारे असे कांहीं लिखित अगर अलिखित नियम जमखंडी दरबारनें किंवा कलेक्टर यांनीं केले आहेत काय ?

(इ) असल्यास ते नियम मंडळापुढें ठेवण्यांत येतील काय ?

(फ) नसल्यास असे नियम तयार करून ते अमलांत आणण्यांत येतील काय ?

रा. सा. महाबळ:—सिव्हिल प्रोसीजर कोड शेड्यूल क प्यारा १ (अ) (ब) च्या तजविजीनें हुकुम-नाम्यांत सांगितल्याप्रमाणें रकम येणेसारखी असेल त्यावेळीं त्या तजविजीनें हुकुमनामा बजावणीचें धोरण ठेविलेलें आहे व सदर बाबतीकडे लक्ष पुरविणेबद्दल इकडून ताबे अंमलदारास हुकूम दिले आहेत. सदरबद्दल येथें लागू असलेले दिवाणी हायकोर्ट सर्क्युलर-मधील सदरहू बद्दलचे नियमाव्यतिरिक्त निराळे नियम लागू करण्याचें कारण दिसून न आल्यानें लागू केले नाहींत. सदरहू बद्दलच्या तजविजी योग्य परिस्थिति पाहून कलेक्टरनीं आपल्या सारासार विचारानें अंमलांत आणणेच्या आहेत.

(ज) (क) मध्यें नमूद केलेलें धोरण ठरलें असल्यास, तें हल्लीं यावें तितक्या प्रमाणांत अंमलांत येत नाहीं इकडे दरबारचें लक्ष आहे काय ?

रा. सा. महाबळः--हुकुमनाम्यास अनुसरून पॅरा १ (ब) च्या पद्धतीनें ज्यावेळीं रकम वसूल होण्याजोगी परिस्थिति असेल त्यावेळीं ती पद्धति स्वीकारावी लागेल. तशी परिस्थिति नसल्यास ती पद्धति अंमलांत आणतां येणार नाहीं.

( एच् ) यापुढें शक्यतोंवर या धोरणाचा अम्मल करण्यांत येईल काय ?

रा. सा. महाबळः—सदरहू धोरण योग्य त्या प्रमाणांत अंमलांत आणण्याचे प्रयत्न हल्लीं केले जातात.

स. स. देवधरः--( क ) चे उत्तरांत नमूद केल्याप्रमाणें सवलत दिली आहे. अशा प्रकारच्या दरखास्ती किती आहेत ?

रा. सा. महाबळः—मला माहित नाहीं. हायकोर्ट सर्क्युलरप्रमाणें काम करतांना कोणाही रयतानें लावणी करणेबद्दल अर्ज केलेला नाहीं.

स. स. देवधरः--मग या लावणीबद्दल शेड्यूलचा उपयोग केला जात नाहीं. अर्जदार येत नाहीं म्हणून लागणीचा प्रकार अंमलांत येत नाहीं हें धोरण बरें काय ?

रा. सा. महाबळः--तशी परिस्थिति असेल तरच शेड्यूलचा उपयोग करणेचा आहे.

स. स. देवधरः—शेतकऱ्यांस सवलत देणेच्या दृष्टीनें हें करणेस नको काय ?

रा. सा. महाबळः—तें कलेक्टरचे डिस्क्रीशनवर ठेवलें आहे. The Collectors may असें म्हटलें आहे.

स. स. देवधरः--अशी लागणीची एक तरी केस आहे काय ?

रा. सा. महाबळः—नाहीं.

स. स. देवधरः—ही पद्धत अंमलांत आणल्यास बरें होईल.

रा. सा. महाबळः—आवश्यकता वाटत नाहीं.

## स. स. पंचाप्पा बसलिंगप्पा कोरी यांचे प्रश्न

**प्रश्न १.** कुंदगोळ तालुक्यांतील हल्लीं राहिलेल्या बाकीदार कुळाबद्दल काय तजवीज चालू आहे ? नित्राणिक कुळांसंबंधीं निम्मी बाकी सूट देऊन राहिलेली निम्मी बाकी पांच हप्त्यांनीं वसूल करणेबद्दल प्रजापरिषदेच्या ठरावानुसार सरकारनीं काय विचार केला आहे ? विचार केला असल्यास तालुक्यांत ३००।४०० फॉरफीट नोटिसा निघण्याचें कारण काय ?

रा. ब. दिवाणसाहेबः—संस्थानांतील निरनिराळ्या भागांतील परिस्थितीची पाहाणी करणेसंबंधीं जरूर त्या प्रमाणांत प्रयत्न चालू आहेत. प्रजापरिषदेच्या ठरावावर विचार चालू आहे. नोटिसा निघाल्या असल्या तरी अखेरीस एकही जमीन खालसा केलेली नाहीं.

**प्रश्न २.** सरकारांनीं पडीक काढिलेल्या जमिनींच्या बाबतींत सारासूट देणेसंबंधीं बाकीचे रयतेप्रमाणें दया दाखविणेंत आलेली नाहीं. दाखविली नसल्यास त्यांची स्थिति चांगली आहे असें गृहीत धरलें आहे कीं काय ? तसें गृहीत धरलें असल्यास, सदर कुळांबाबत पूर्ण चौकशी करून निम्मी रकम सूट देऊन बाकी निम्मी रकम पांच हप्त्यांनीं घेण्याचा विचार आहे किंवा कसें ?

रा. ब. दिवाणसाहेब:—यासंबंधींची ता. २४।६।३८ च्या गॅझेटमध्यें घोषणा आहे, व त्याप्रमाणें विचार चालू आहे.

**स. स. नारायण गुरुनाथ बाळण्णवर यांचे प्रश्न**

**प्रश्न १.** (अ) जमखंडी संस्थान घटना-समितीनें श्रीमंत राजासाहेब सरकार यांचेकडे सादर केलेला रिपोर्ट त्यांतील भिन्नमतपत्रिकांसह सर्व जनतेच्या माहितीकरितां पुस्तकरूपानें सरकारकडून प्रसिद्ध करण्यांत येईल काय ?

(ब) प्रसिद्ध करणेंत येणार नसल्यास त्याचें कारण कळेल काय ?

रा. ब. दिवाणसाहेब:—घटना-समितीचा रिपोर्ट पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

**प्रश्न २.** सन १९३२ इसवी सालापासून सरकारी सारा अगर जुडी याच्या बाकीकरितां फॉरफिट करून सरकार पडीककडे दाखल असलेल्या, कुंद्गोळ तालुक्यांतील जमिनी-बाकीदारांना परत सोडणेच्या बाबतींत हल्लीं जें धोरण ठेवणेंत आलें आहे, त्यापेक्षां अलीकडील स्थिति ध्यानांत घेऊन अधिक उदार धोरण ठेवून, ज्या त्या बाकीदारांना आपल्या जमिनी परत मिळण्याचे बाबतींत अधिक सहानुभूतीचें धोरण ठेवणेंत येईल काय ?

रा. ब. दिवाणसाहेब:—या बाबतींत प्रयत्न चालू आहेत.

स. स. मंडी:—या बाबतींत सरकारी घोषणा झालेली आहे.

रा. ब. दिवाणसाहेब:—घोषणेंत काय आहे ? " खालसा झालेल्या जमिनी कबजेदार परत घेण्यास तयार असतील तर "

स. स. देवधर:—आम्हांला घोषणेचें कलम नको आहे; दरबारचें सहानुभूतीचें धोरण पाहिजे आहे.

रा. ब. दिवाणसाहेब:—दरबारचें तर सहानुभूतीचेंच धोरण आहे.

**प्रश्न ३** (अ) कुंद्गोळ तालुक्यांत सॅनिटेशन कमिट्या कोणकोणत्या गांवीं आहेत व त्या कमिट्यांची प्रत्येकीं आज तारखेस किती रक्कम शिल्लक आहे ?

रा. ब. दिवाणसाहेब:—बेडदूर व यलिवाळ या दोन गांवीं आहेत. जुलई १९४० इ. अखेर शिल्लक अनुक्रमें ३१३-१७३२ रुपये आहे.

(ब) सन १९३३ ते १९३८ इ. अखेर या कमिट्यांची रक्कम कोणकोणत्या कामाकरितां किती खर्च करणेंत आली, याचें गांववार व सालवार पत्रक या वर्षी तरी मंडळापुढें मांडण्यांत येईल काय ?

रा. ब. दिवाणसाहेब:—यलिवाळ-तिरमळकोप रस्त्यासाठीं शिलकेंतून २०७० रु. मंजूर करण्यांत आले आहेत व हल्लीं काम चालू आहे. हल्लीं ५६८ रुपयांची कामगिरी झाली आहे. सन १९३३-३८ अखेर सालचें माहितीपत्रक अवधि पुरेसा नसल्यानें मंडळापुढें मांडण्यांत आलें नाहीं.

## स. स. शिवाजी गंगाधर कुळकर्णी यांचे प्रश्न

प्रश्न १ (अ) संस्थानमजकुरीं कोर्ट ऑफ वॉर्डसकडे असलेल्या इस्टेटीची व्यवस्था करणे- साठीं एस्टॅब्लिशमेंट व श्रमांश याकरितां अज्ञानाच्या इस्टेटीवर खर्च आकारणेबाबत कांहीं नियम अंमलांत आहेत कीं काय ?

रा. ब. दिवाण:—होय अंमलांत आहेत.

[ सेक्रेटरी नियम वाचून दाखवतात. ]

कोर्ट ऑफ वॉर्ड्स ॲक्ट ( सन १८९० चा ८ ) आणि गार्डियन आणि वॉर्ड्स ॲक्ट ( सन १९०५ चा १ ) प्रमाणें सरकारचे नजरेखालीं असलेल्या इस्टेटीबाबत देखरेखीसंबंधीं ज्या रकमा कापून देण्याच्या त्याजबद्दल श्रीमंत सरकार जमखंडी याजकडील हुजूर हुकूम नं. १२४९ ता. १९ माहे मार्च स. १९१८ चा झाल्या आधारें मंजूर झालेले नियम.

१ एकंदर ( निवळ नव्हे ) उत्पन्न या शब्दांत प्रत्येक बाबीचें उत्पन्न अगर रोख रकम जी वसूल येते त्याचा समावेश होतो. परंतु वार्डकरितां काढलेलें कर्ज वॉर्डची येणें असलेली मुद्दल रक्कम, तसेंच वार्डची स्थावर मिळकत अगर वॉर्डची ऐन जंगम मिळकत विक्री होऊन आलेली रक्कम यांचा समावेश एकंदर या शब्दांत होत नाहीं.

२ इस्टेटीचें एकंदर उत्पन्नावर शेंकडा पांच प्रमाणें वहिवाटदाराचा मेहनताना म्हणून आकारला जावा व त्यापैकीं सरकार हुकूम करील ती रकम वहिवाटदारानें घेत जावी. एक वेळ ज्या उत्पन्नावर मेहनताना मिळाला असेल त्यावर पुन्हां मिळण्याचा नाहीं. उदाहरणार्थ मागील वर्षाची शिल्लक पुढचे सालीं ओढली असल्यास त्यांवर एकवार मेहनताना मिळाला असल्यानें पुन्हां मिळणार नाहीं.

३ इस्टेटीचे व्यवस्थेकरितां जें एस्टॅब्लिशमेंट ठेवलें जाईल त्याचा खर्च इस्टेटींतून घेण्याचा आहे. एकापेक्षां जास्त इस्टेटीचे व्यवस्थेबद्दल म्हणून एस्टॅब्लिशमेंट ठेवलें असल्यास इस्टेटीचे उत्पन्नाचे हिस्सेरशीनें सर्व इस्टेटींतून मिळून खर्च देण्याचा आहे.

४ सादिलवार वगैरे खर्च ज्या त्या इस्टेटींतून करण्याचा आहे. एकापेक्षां जास्त इस्टेटी असल्यास एकंदर उत्पन्नाचे हिस्सेरशीनें ज्या त्या इस्टेटींतून खर्च घेण्याचा आहे.

५ सादिलवार बिलें महिनाअखेर करीत जावीं. मेहनतान्याचीं बिलें फसली सालअखेर करीत जावीं, व जरूर तर वर्षाचे उत्पन्नावरून महिन्याची सरासरी काढावी व तें महिन्याचें उत्पन्न समजावें. मात्र ठरीव पगारावर मॅनेजर नेमला असेल तेव्हां संस्थानचे इतर नोकरा- प्रमाणें दरमहा बिल करीत जावें.

६ सदरहु नियमाचा अम्मल इस्टेट कोर्ट ऑफ वॉर्डसचे नजरेखालीं आल्या तारखे- पासून होण्याचा परंतु सदरहु नियम लागूं होणे पूर्वीं ज्या इस्टेटी सरकारचे नजरेखाली आहेत त्यांच्या संबंधीं येणें झालेला मेहनताना कोणाला किती पोहोचण्याचा याबद्दल श्रीमंत सरकारचा हुकूम घेऊन नंतर अम्मल करणेचा.

स्टेट कारभारी ऑफीस जमखंडी
ता. २२।३।१९१८ इ.

D. S. SAPRE,
स्टेट कारभारी,
जमखंडी.

( ब ) असल्यास ते नियम मंडळापुढें ठेवण्यांत येतील काय ?

( क ) नसल्यास अशा अज्ञानाच्या इस्टेटीवर प्रत्येकीं कोणत्या प्रमाणांत हा खर्च आकारण्यांत येतो ?

( ड ) हा खर्च अशा अज्ञानाच्या इस्टेटीवर आकारण्यांत येतो कां, वार्षिक उत्पन्नावर आकारण्यांत येतो, कीं वार्षिक वसुलीवर आकारण्यांत येतो ?

( इ ) असे नियम नसल्यास ते सत्वर करून अंमलांत आणण्यांत येतील काय ?

रा. ब. दिवाणसाहेब:--(ब) स्टेट गॅझेट ता. ७।४।१९१८ चें वाचून दाखविलेंच आहे. (क) नियम असल्यानें प्रश्न उद्भवत नाहीं, (ड) नियमाप्रमाणें तजवीज करणेंत येते, (इ) नियम असल्यानें प्रश्न उद्भवत नाहीं.

प्रश्न २. कुंदगोळ येथील दिवाणी कोर्टातील माहे ऑगस्ट सन १९३६ इसवीपासून माहे जुलै सन १९४० अखेर संपणाऱ्या चार वर्षांत, जे फर्स्ट क्लास व सेकंड' क्लास दावे आणि दरखास्ती यांच्यांतील किरकोळ कामें यांचे जे निकाल झाले त्या निकालाविरुद्ध वरिष्ठ कोर्टाकडे किती अपिलें व तपासणी अर्ज झाले व त्यांतील सदर खालील कोर्टाचे किती निकाल कायम करण्यांत आले ? किती फिरले ? व कितीमध्यें रिमांड हुकूम झाले ? यांचें सालवार चारी सालचें पत्रक देण्यांत येईल काय ?

रा. सा. महाबळ:--( लेखी पत्रक सेक्रेटरींनीं वाचून दाखविलें ) परिशिष्ट नं. २ पहा.

स. स. देवधर:--निकाल फिरल्याचें प्रमाण जास्त आहे.

रा. सा. महाबळ:--त्याला काय करणार ?

### स. स. केंचनगौडा रंगनगौडा नाडगीर यांचे प्रश्न

प्रश्न १ ( अ ) कुंदगोळ येथील अगशी होंडाकरितां जो कालवा कांहीं जमिनींतून नेण्यांत आला आहे त्या कालव्याची जागा सरकारांत लँड ॲक्विझिशन ॲक्ट प्रमाणें घेण्यांत आली आहे. तरी अशा ज्या इसमांच्या जमिनी घेण्यांत आल्या आहेत त्यांच्यापैकीं किती जणांना त्यांच्या जमिनीबाबत नुकसानभरपाई अद्याप मिळणेची राहिली आहे ?

रा. ब. दिवाणसाहेब:--इरापा भेंडीवाड व रामापा देसाई या दोघा इसमांशिवाय बाकी सर्वांना कॉंपेनसेशन देण्यांत आलें आहे. या दोन इसमांचे बाबतींत कायद्याचे कांहीं प्रश्न उपस्थित झाले असल्यानें तीं कामें चालू आहेत.

( ब ) ज्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळाली नाहीं त्यांच्या जमिनी कोणत्या सालीं सरकारताब्यांत घेणेंत आल्या.

रा. ब. दिवाणसाहेब:--१९३४ सालीं ताब्यांत घेण्यांत आल्या आहेत.

( क ) अशांना अद्याप नुकसान-भरपाई कां देणेंत आली नाहीं ?

रा. ब. दिवाणसाहेब:--प्रश्न (अ) मध्यें त्याचें उत्तर देणेंत आलें आहे.

( ड ) आतां तरी नुकसान-भरपाई सत्वर देणेंत येईल काय ?

( ई ) आजपर्यंत अशा लोकांना नुकसान-भरपाई न दिल्यामुळें, झालेल्या नुकसानीस जमखंडी दरबार जबाबदार नाहीं काय ?

रा. ब. दिवाणसाहेब:—( ड ) कामाचा निकाल जसा होईल त्यावर ती गोष्ट अवलंबून आहे.

( इ ) नाहीं.

स. स. देवधर:—हा प्रश्न शक्य तों लवकर कां सोडविला जात नाहीं ?

रा. ब. दिवाणसाहेब:—प्रश्न intricate असल्याकारणानें वेळ लागतो.

स. स. देवधर:—किती दिवसांत निकाल लागेल ?

रा. ब. दिवाणसाहेब:—सांगता येत नाहीं.

स. स. देवधर:—५।६ महिन्यांत निकाल जाहाल्यास बरें. कांहीं बाबतींत मुदतीबाहेरही कांहीं गोष्टी यामुळें जाणेचा संभव आहे.

रा. ब. दिवाणसाहेब:—मी असें नक्की सांगूं शकत नाहीं.

**प्रश्न २.** कुंद्गोळहून हुबळीस जाणेचा शरेवाड-पशुपतीहाळ रस्ता भयंकर नादुरुस्त होऊन रहदारी आतां बंद झाली असल्यानें, सदर रस्ता या वर्षीं तरी पक्क्या रीतीनें दुरुस्त करून येथील जनतेची फार दिवसांची गैरसोय दूर करण्यांत येईल काय ?

रा. सा. पुराणिक:—रहदारी बंद झाली ह्या म्हणण्याचा अर्थ मला वाटतें आपला उद्देश हा point जोरकस मांडणेचा येवढाच दिसतो. मात्र रस्ता वाहतुकीस गैरसोईचा आहे. किरकोळ दुरुस्ती केल्यास काम भागण्यासारखें आहे.

स. स. देवधर:—हा रस्ता दुरुस्त करून किती वर्षें झालीं ?

रा. सा. पुराणिक:—रुटीनमध्यें केला जातो. कुंद्गोळहून हुबळीस जाणेचा रस्ता म्हणजे शरेवाड पशुपतीहाळ रस्ता हल्लीं रहदारीस बंद झाला आहे ही माहिती बरोबर नाहीं. पावसाळ्यांत चाकोऱ्या पडून मोटार-वाहतुकीस दरसाल हा रस्ता गैरसोईचा होतो ही गोष्ट खरी आहे. रिपेरीचीं कामें सतत चालू असतात, परंतु रस्त्यांची परिस्थिति अडचणीची असल्यानें सत्वर रिपेरी होण्यासारखी नाहीं. त्यास इलाज नाहीं. या रस्त्यावर सोइंग व मेटलिंग करून पक्क्या तऱ्हेनें दुरुस्त करणें फार खर्चाचें आहे तथापि बजेटरकमेंत सवड पाहून दरसाल १००० ते १२०० रुपयेपर्यंत रिपेरी व्यतिरिक्त नवीन कामाकडे खर्च होत असतो. अलिकडील तीन सालांत म्हणजे सन १९३७।३८ सालांत रुपये ११२८, सन १९३८।३९-सालांत रुपये १०२८ व १९३९।४० सालांत रुपये ११४९ खर्च झाला आहे.

स. स. नाडगीर:—दरसाल या रस्त्यासाठीं किती खर्च होतो ?

रा. सा. पुराणिक:—दरसाल हजार बाराशें रुपये खर्च होतात. हा रस्ता पक्का करावयाचा तर मेटल करावा लागेल व त्याला सातआठ हजार रुपये खर्च होईल.

स. स. नाडगीर:—लगतच्या ब्रिटिश हद्दींत रस्ता चांगला होतो व हाच कां होत नाहीं ?

रा. ब. दिवाणसाहेब:—यापुढें शक्य तों दुरुस्ती करणेबद्दल आम्हीं काळजी घेऊं. रस्ता दोघांच्या मालकीचा असल्याकारणानें एकट्या आमचेकडूनच खर्च करणें जड जातें. दुसऱ्याकडून रक्कम मिळत नाहीं. तरी पण या बाबतींत प्रयत्न करूं.

मे. अध्यक्ष:—आतां प्रश्न संपले. आतां माझेकडे एक ठराव मांडणेचें काम आलें आहे. हा ठराव म्हणजे सांप्रतच्या महायुद्धासंबंधींचा आहे. आपली सर्वांची सहानुभूति साम्राज्य सरकारकडेच आहे अशी माझी खात्री आहे.व ह्या प्रसंगीं सर्वांनीं साम्राज्य सरकारास साहाय्य करणें हें आपलें खरें कर्तव्य आहे. व त्याप्रमाणें आपण सर्व प्रकारें मदत करीत आहांतच. परंतु या संस्थेच्यामार्फत एक प्रकारचा नैतिक पाठिंबा दिला तर त्याचीही मोठी किंमत आहे. आतां मी आपणांपुढें त्याबाबत ठराव मांडतों. आपण सर्वांनीं पास करावा.

### ठराव

"सांप्रत जागतिक महायुद्ध चालू असून त्यांत ब्रिटिश सरकारनें झोटिंगशाहीचें उच्चाटण होऊन लोकशाही तत्त्वाचा जय व्हावा व लहान लहान राष्ट्रांचें संरक्षण व्हावें या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन जो निकराचा संग्राम चालविला आहे त्यांत ब्रिटिश सरकारास सत्वर विजय प्राप्त व्हावा अशी या मंडळाची जगन्नियंत्या परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

व सदर ठराव श्रीमंत राजासाहेब यांचे हुजूरकडे पाठविण्यांत यावा असें ठरविण्यांत येत आहे."

मे. अध्यक्ष:—ह्या ठरावाला कोणाचा विरोध नाहीं म्हणून मी हा ठराव एकमतानें पास झाल्याचें जाहीर करतों.

### स. स. देवधर यांचा श्रीमंत राजासाहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव

स. स. देवधर:—आज सकाळीं श्रीमंत राजासाहेब यांचें भाषण आपण सर्वांनीं ऐकलेंच आहे. श्रीमंत राजासाहेब यांना चेंबर ऑफ प्रिन्सेसमध्यें वैयक्तिक जागा मिळाली आहे. गेल्या दहाबारा वर्षांच्या कारकीर्दींत कांहीं अधिपतींच्यातर्फे चेंबर ऑफ प्रिन्सेसमध्यें ते निवडून जात होते. परंतु चेंबर ऑफ प्रिन्सेसमध्यें वैयक्तिक जागा मिळावी म्हणून श्रीमंत राजासाहेबांनीं बरीच चळवळ केली व तिचा परिणाम असा झाला कीं, साम्राज्य सरकारनें श्रीमंत राजासाहेब यांना व्यक्तिगत जागा चेंबर ऑफ प्रिन्सेसमध्यें कायम दिली आहे व ह्या गोष्टीमुळें संस्थानचा दर्जा वाढला आहे आणि म्हणून, मी श्रीमंत राजासाहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडणार आहें. प्रत्येक वर्षाच्या अधिवेशनाचा अहवाल वाचल्यास दरसाल आमच्या संस्थानच्या प्रगतीबद्दल साम्राज्य सरकारकडून गौरव होत आहे असें दिसून येतें. असे निरनिराळे प्रसंग दरसाल येतात याबद्दल मला आनंद होत आहे. आतां मी आपणांपुढें ठराव मांडतों.

## ठराव

" जमखंडी संस्थानचे अधिपतींना, चेंबर ऑफ प्रिन्सेसमध्यें, वैयक्तिक जागा मिळाल्यानें हें मंडळ श्रीमंत राजासाहेब शंकरराव अप्पासाहेब पटवर्धन यांचें अभिनंदन करीत आहे. सदर ठराव रा. ब. प्रेसिडेंटमार्फत श्रीमंत राजेसाहेब यांचे हुजूरकडे पाठविणेंत यावा अशी विनंति आहे. "

रा. सा. महाबळः—सद्रहू ठरावास मी अंतःकरणपूर्वक दुजोरा देतों. ह्याबद्दल फारसें विवेचन करणें योग्य होणार नाहीं व मीं तें स्वतः करावयास पाहिजे असें नाहीं. तरी पण एक दोन महत्त्वाच्या बाबी म्हणून सांगतों. १९२१ सालीं चेंबर ऑफ प्रिन्सेस स्थापन झाली. त्यावेळीं श्रीमंत राजेसाहेब यांचे वडील कै. श्रीमंत भाऊसाहेब यांनीं इकडील सर्व संस्थानांमार्फत आपली बाजू साम्राज्य सरकारपुढें मांडली. परंतु दुर्दैवानें साम्राज्य सरकारास त्यांचें म्हणणें पटलें नाहीं. त्यावेळीं सांगली, मुधोळ व कोल्हापूर यांनाच मात्र नरेंद्रमंडळांत स्थान मिळालें. घटनेच्या दृष्टीनें मात्र आमच्या संस्थानचे बाबतींत दर्जा कबूल करणेस प्रत्यवाय नव्हता व शेवटीं सात संस्थानिकांतर्फे एक जागा नरेंद्रमंडळांत देण्यांत आली. परंतु त्याचा प्रथम कांहीं उपयोग करण्यांत आला नाहीं. विद्यमान प्रभु गादीवर येईपर्यंत त्या जागेचा कोणीं उपयोग केला नाहीं. विद्यमान प्रभु गादीवर आल्यावर मात्र त्यांनीं या बाबतींत चळवळ केली व त्या चळवळीचा परिणाम असा झाला कीं, साम्राज्य सरकारकडून त्यांना नरेंद्रमंडळांत कायमचें स्थान दिलें गेलें.

आमच्या प्रभूंच्या गौरवाची सांगणेजोगी गोष्ट म्हणजे फक्त इकडील संस्थानांतर्फे दोनच प्रतिनिधि सभासद म्हणून नरेंद्रमंडळांत बसत असत. परंतु हल्लींच्या प्रभूंनीं या बाबतींत चळवळ केल्यानें बहुतेक संस्थानांस जागा मिळाल्या. मोठमोठ्यांच्या गांठीभेटींत, व्हाईसरॉयांच्या भेटींत ही गोष्ट त्यांनीं जोरदारपणें मांडून बहुतेकांना नरेंद्रमंडळांत स्थान मिळवून दिलें. आपली बाजू सुरक्षित असतांना सुद्धां इतर संस्थानांच्या बाबतींत जोरकस मागणी मांडून त्यांना नरेंद्रमंडळांत स्थान मिळवून दिलें हें विशेष आहे व ही गोष्ट मला स्वतःला सांगण्यास संतोष वाटतो. आतां राहिलेल्या संस्थानिकांनाही नरेंद्रमंडळांत स्थान मिळेल असें वाटतें तरी हा अभिनंदनाचा ठराव खरोखरच अत्यंत योग्य वेळीं आलेला आहे. नरेंद्रमंडळांत स्थान मिळाल्यानें संस्थानचा, संस्थानिकांचा व प्रजेचा गौरव झालेला आहे. तेव्हां हा अभिनंदनाचा ठराव एकमतानें पास व्हावा येवढें सांगून मी आपलें भाषण संपवितों.

मे. अध्यक्षः—सदरहू ठरावास कोणाचा विरोध नसल्याकारणानें तो एकमतानें पास झाल्याचें मी जाहीर करतों.

## स. स. देवधर यांचा दरबारच्या अभिनंदनाचा ठराव

स. स. देवधरः—मागील बजेटाच्या वेळीं नोकरवर्गाचें टाईमस्केल बंद करणेंत आलें होतें. परंतु आतां वॉरमुळें परिस्थिति बदलली असल्यामुळें व जीवनास आवश्यक अशा गोष्टीही महाग झाल्या असल्याकारणानें सेकंड ग्रेड व फर्स्ट ग्रेड नोकरांशिवाय इतर

नोकरांचें टाईमस्केल सुरू केलें याबद्दल दरबारचें अभिनंदन करण्यासाठीं हा ठराव मी मांडणार आहें. माझ्या मतें प्रत्येक नोकराला २५ रु. व प्यूनला पंधरा रु. कमींत कमी पगार मिळाला पाहिजे. नोकर कमी ठेवावे पण पगार मात्र कमी असूं नये. दहाबारा रुपये पगारावर कुटुंब चालविणें जड पडतें. नोकरी नीट व्हावी व कार्यक्षमता वाढावी अशी इच्छा असेल तर नोकरांना पगारही योग्य असाच दिला पाहिजे. कारकून २५ रु. वर स्टार्ट होईल व प्यून १५ रु. वर स्टार्ट होईल तर ह्या सध्यांच्या बिकट परिस्थितींत त्याला कांहींतरी तोंडमिळवणी करतां येईल. तरी पण दरबारनें बंद केलेलें टाईमस्केल सुरू केलें आहे ही अभिनंदनीय अशीच गोष्ट आहे. म्हणून मी हा अभिनंदनाचा ठराव आपणांपुढें मांडतों व आपण तो एकमतानें पास करावा अशी विनंति करतों.

### ठराव

"दरबारनें, सेकंडग्रेड व फर्स्टग्रेड नोकरांशिवाय इतर नोकरांचें जें टाईमस्केल पुन्हां सुरू केलें आहे त्याबद्दल हें मंडळ दरबारचें अभिनंदन करीत आहे. सदर ठराव श्रीमंत राजेसाहेब सरकार यांचे हुजूरकडे रा. ब. प्रेसिडेंट यांचेमार्फत पाठविणेंत यावा."

स. स. मंद्री:—या ठरावास माझा दुजोरा आहे. हल्लींची आर्थिक स्थिति लक्षांत घेऊन बंद केलेलें टाईमस्केल सुरू केलें ही अभिनंदनीय अशी गोष्ट आहे व म्हणून मी या ठरावास दुजोरा देत आहें.

मे. अध्यक्ष:—हा ठराव योग्यच आहे. यास कोणाचा विरोध नाहीं. असें समजून ठराव एकमतानें पास झाल्याचें मी जाहीर करतों. आतां रा. ब. दिवाण हे मंडळापुढें बजेट मांडतील.

### रा. ब. दिवाण यांचें बजेटवरील भाषण

रा. ब. दिवाणसाहेब यांनीं पुढीलप्रमाणें छापील बजेट-नोट १९४०-४१ ची वाचून दाखविली.

अध्यक्ष साहेब व इतर सन्मान्य सभासद्—

संस्थान मजकूरचें सन १९४०-४१ सालचें अंदाजी बजेट आपणांपुढें मांडणेची मी परवानगी घेतों. बजेटाच्या छापील प्रती सन्मान्य सभासदांकडे यापूर्वीच रवाना झाल्या असून त्यांचें त्यांनीं आतांपर्यंत मनन करून ठेविलें असेलच. अशा तयारीनें आल्यानंतर मी आतां जे खुलासे करणार आहें ते सहज रीतीनें सर्वांचे लक्षांत येऊन त्यापासून बजेटचे वाटाघाटींचें काम एकंदरीनें ज्यास्त सुलभ होईल अशी मी अपेक्षा करितों. बजेटाचे तपशीलांत शिरण्यापूर्वी ज्यास इंग्रजींत Budget at a glance म्हणतात असे एकंदरीचे बजेटाचे आंकडे संक्षिप्त रूपांत आपलेपुढें मांडतों.

# संक्षिप्त स्वरूपांत बजेट. १९४०–४१

| तपशील | प्रथमचें अंदाजी बजेट १९३९।४० | दुरुस्त अंदाजी बजेट (ऑगस्ट १९३९ ते जून १९४० नक्की व जुलै अंदाजी बजेट) १९३९।४० | प्रथमचें अंदाजी बजेट १९४०।४१ |
|---|---|---|---|
| १ प्रारंभीं शिल्लक... | २४६८६ | ३३८९८ | ३७८०९ |
| २ वर्षातील जमा... | १२७५८६३ | १४८७६०८ | १२५९९९८ |
| ३ एकूण ... | १३००५४९ | १५२१५०६ | १२९७८०७ |
| ४ वर्षातील खर्च... | १३२८७७८ | १४८३६९७ | १३३५४६४ |
| ५ सालअखेर शिल्लक ... | – २८२२९ (तूट) | ३७८०९ | — ३७६५७ (तूट) |

सन १९३८।३९ सालचे अखेरीस पुढील सालचें म्हणजे सन १९३९।४० सालचें प्रथमचें अंदाजी बजेट करणेंत आलें त्यावेळीं प्रारंभींची शिल्लक २४६८६ रुपये येईल, असा अंदाज बांधणेंत आला होता. परंतु सालअखेर १९३८।३९ चे सर्व हिशेब पुरे झाल्यानंतर प्रारंभींची शिल्लक नक्की रुपये ३३८९८ निघून ती पहिले अंदाजापेक्षां ९२१२ रुपायानें वाढली. त्याचप्रमाणें जमा आणि खर्च या दोन्हींतही प्रथम अंदाजापेक्षां दुरुस्त अंदाजाचे वेळीं वाढ दिसून आली. जमेंत आणि खर्चांत खालीं दाखविल्याप्रमाणें वाढ दिसून आलीः—

१९३९।४०

| | जमा | खर्च |
|---|---|---|
| दुरुस्त अंदाज | १४८७६०८ | १४८३६९७ |
| प्रथम अंदाज | १२७५८६३ | १३२८७७८ |
| | २११७४५ | १५४९१९ |

आतां या वाढी काय काय कारणानें झाल्या त्याबद्दल विचार करूं. जमेंत आणि खर्चांत दोहींत मुख्य वाढ आहे ती जमीनबाब खात्यांत मागील बाक्यांची ८० हजाराची सूट देणेंत आली त्यामुळें झालेली आहे. या सुटीची हिशेबी फक्त दुबेरजी करणेंत आली आहे. ती वाढ काढून टाकली असतां बाकी वाढ १,३१,७४५ रुपये जमेकडे आणि

७४,९१९ रुपये खर्चाकडे राहते. प्रथम जमेकडील वाढीबद्दल विचार करूं. जमेकडील वाढ मुख्यत्वेंकरून खालीं नमूद केलेल्या बजेट हेडखालीं आहे:—

| बजेटहेड | वाढीची रकम |
|---|---|
| २ सायरबाब खातें | ७४१४ |
| ४ अफू खातें | १७८४ |
| ५ जमीनबाब खातें | ४१४६१ |
| १० रेजिस्ट्रेशन खातें | १३०० |
| ११ कोर्ट ऑफ वॉर्ड्स | ११२१ |
| २३ गिरणी उद्योग व्यापार खातें | ४८०१ |
| २५ व्याज खातें | १७७६५ |
| २७ कर्ज खातें | १०६०९७ |

खातें नं. २ यांत वाढ आहे ती इंग्रज सरकाराकडून पेट्रोल फंडापैकीं नवीन रस्त्याकरितां ग्रँट मंजूर झाली त्यामुळें आहे. ही ग्रँट याच वर्षात मंजूर होईल अशी प्रथम अपेक्षा नव्हती, त्यामुळें ती हिशेबांत धरली नव्हती. या ग्रँटमधून हुल्याळ ते ब्रिटिश हद्दींतील कोण्णूर गांवापर्यंत नवीन रस्त्याचें काम करणेची योजना असून त्याप्रमाणें कामासही सुरवात झालेली आहे. अफू – विक्री अपेक्षेपेक्षां जास्त प्रमाणांत झाल्यानें अफूचे उत्पन्नांत वाढ दिसत आहे. जे कबजेदार त्यांजकडेस असलेल्या जमीनबाब मागील बाकीपैकीं निम्मा किंवा (८१०) दहा आणे वसूल विवक्षित मुदतींत देतील, त्यांस त्यांजकडून येणें राहिलेल्या सर्व बाकीची सूट देणेंत येईल अशा रीतीची सवलतीची घोषणा दरबारकडून करणेंत आली होती. त्यास अनुसरून बरेच कबजेदारांनीं आपणांकडील मागील बाकीपैकीं योग्य मुदतींत व प्रमाणांत वसूल देऊन बाकीची सूट पदरांत पाडून घेतली. त्याकारणानें व कांहीं नवीन सरकारी जमिनी लागवडीकरितां विकल्या गेल्या त्याकारणानें जमीनबाब खात्यांत वाढ दिसून येत आहे. रजिस्ट्रेशन खातीं वाढ दिसत आहे ती दस्तऐवज नोंदणीकरितां जास्त प्रमाणांत आल्यानें दिसत आहे. कोर्ट ऑफ वॉर्ड्स खातीं वाढ दिसत आहे ती मागील साल्ची रकम वसूल झाल्यानें दिसत आहे. गिरणी उद्योग खात्यांत वाढ आहे ती यंदा कापसाचें पीक सर्वसाधारण चांगलें झालें असल्यानें गांठी बांधण्याकरितां कापूस अपेक्षेपेक्षां जास्त प्रमाणांत आल्यानें वठाई व गठ्ठे बांधणें यांत उत्पन्नाची वाढ झाल्याचें दिसत आहे. व्याज-खात्यांत वाढ दिसत आहे ती स्टेट-बँकेकडील एकंदर व्यवहार वाढला असल्यानें व विशेषेंकरून कांहीं जुन्या मोठ्या खात्याचे हिशेब होऊन कांहीं जमाखर्च झाले त्यामुळें दिसत आहे; व त्याच कारणानें कर्ज खात्यांतही वाढ दिसत आहे.

जमेचे बाजूस एकंदर वाढ रु. २६३२५६ आणि तूट रु. ५१५११ म्हणजे निव्वळ वाढ रु. २११७४५ होत आहे. तूट विशेषेंकरून स्टँप खात्यांत ५२८५ रुपये आणि तसलमात खात्यांत ४० हजार अशी आहे. कोर्टांत नवीन दावे लागण्याचें प्रमाण अद्याप

पूर्वीचे प्रमाणांत आलें नसल्यानें स्टँप खात्यांत तूट असून, तसलमाती व्यवहार अपेक्षेपेक्षां कमी प्रमाणांत झाल्यानें त्या खात्यांत तूट आहे. याप्रमाणें एकंदर जमेकडील बाजूचें विवेचन झालें. आतां खर्चाकडेस वळूं.

खर्चाचे बाजूसही मागील बाकीसुटीबाबतची ८० हजार दुबेरजीची रक्कम वजा करितां १७०४९९ वाढ व ९५५८० तूट; एकूण निव्वळ वाढ ७४९१९ ची येत आहे. वाढीचे बाजूस मुख्य वाढ आहे ती कर्ज खात्यास १३२००० आहे. स्टेट-बँकेकडील कांहीं जुन्या खात्याचे हिशेब होऊन कांहीं जमा–खर्च करण्यांत आले त्याकारणानें कर्ज खात्यास जमा आणि खर्च या दोहींत वाढ दिसत आहे. बँकेचे व्यवहार वाढल्यानें नवीन कर्जे जास्त प्रमाणांत दिलीं गेलीं हेंही एक वाढीचें कारण आहे. खातें नं. २२ पी. डब्ल्यू. डी. यांतही सुमारें ३५ हजारांची वाढ आहे. वास्तविक ही खरी वाढ नसून पूर्वी तसलमात घेऊन रामचंद्र-प्रासाद पॅलेसकडे फर्निचर वगैरे घेणेंत आलें होतें त्याची दुबेरजीची यांत बहुतेक रक्कम आहे. खातें नं. ३० अ यांत युद्ध--मदत ही यंदा नवीनच अनपेक्षित अशी बाब असून त्याजबद्दल १० हजार खर्च झालेला आहे. नंबर ३२।३३ तसलमात आणि अमानत या दोन्ही खात्यास मिळून ८२००० कमी खर्च झाला आहे. तसलमात व अमानतींतील रकमा अपेक्षेपेक्षां कमी प्रमाणांत दिल्या गेल्यानें खर्च कमी झाला आहे. दुरुस्त अंदाजाप्रमाणें पाहूं गेलें असतां प्रथम अंदाजापेक्षां उत्पन्नांत वाढ झाली असल्यानें प्रथम अंदाजाप्रमाणें जमेपेक्षां खर्च जास्त न होतां उलट खर्चापेक्षां उत्पन्नच थोड्याच प्रमाणांत कां होईना जास्त झालें आहे. एकंदरीनें उत्पन्नापेक्षां खर्च कमी प्रमाणांत झाल्यानें प्रथम अंदाजांत सालअखेर सुमारें २८००० तूट पडेल अशी भीति वाटत होती ती जाऊन तुटीऐवजीं सालअखेर ३७००० पर्यंत शिल्लकच रहात असल्याचें दिसत आहे. एकंदरीनें १९३९–४० साल संस्थानचे सांपत्तिक स्थितीचे दृष्टीनें प्रथमारंभींचे अंदाजापेक्षां बरेच अंशानें अनुकूल अशा परिस्थितींत गेलें ही गोष्ट वरील सर्व विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल. याच सालांत दरबारकडून जमीनबाब मागील बाक्यांपैकीं सुमारें ८०००० रुपयांची सूट देण्यांत येऊन शेतकरी वर्गाचा बोजा हलका होणेस मदत करण्यांत आली आहे. या सर्व दृष्टीनें १९३९–४० साल दरबारास व रयतेस दोघांसही अनुकूल अशा परिस्थितींचें गेलें. यानंतर १९४०–४१ सालचें प्रथम अंदाजासंबंधानें विचार करूं. पूर्वींच्या दोन सालच्या प्रथमचे अंदाजी बजेटाप्रमाणें या सालचे प्रथमचे अंदाजी बजेटांतही सालअखेर तोंडमिळवणी न होतां तूटच दिसून येत आहे ही गोष्ट प्रारंभींच नमूद करणें भाग आहे. सदर सालांत शेवटच्या तिन्ही बाबी म्हणजे कर्ज, तसलमात आणि अमानत या तिन्ही खात्यांचे जमेचे आणि खर्चाचे आंकडे सारखेच धरले असल्यानें ते निव्वळ जमा-खर्चाचे आंकडे आहेत अशा दृष्टीनें सोडून देऊन उत्पन्नाच्या व खर्चाच्या दुसऱ्या मुख्य बाबींचें विवेचन करणें सोईचें होईल.

सन १९४०–४१ सालचे प्रथमचे अंदाजांत कर्ज, तसलमात व अमानत शिवाय करून बाकी बाबींपासून उत्पन्न ९५२९९८ रुपये आणि खर्च १०२८४६४ रुपये धरण्यांत आलेला आहे. त्यांतूनही हे जमीनबाब लोकलफंड सुटीचे व इनाम उत्पन्नाचे जमाखर्ची

आंकडे रुपये ( ११२००० + ९००० + १२४७२२ = ) – २४५७२२ वजा केले असतांना उत्पन्नाचे व खर्चाचे नक्की आंकडे म्हणजे ७०७२७६ रुपये उत्पन्न आणि ७८२७४२ रुपये खर्च असे आंकडे राहातात. या आंकड्यांवरून उत्पन्नापेक्षां खर्च ७५४६६ रुपये जास्त येत आहे. ही तूट प्रारंभींचे ३७८०९ रुपये शिलकीनें कमी होऊन सालअखेर नक्की तूट ३७९५७ रुपये पर्यंत येईल असें आतांचे अंदाजानें वाटत आहे. कांहीं आकस्मिक व इतर गोष्टींची परिस्थिति उद्भवली नसती तर ही तूटही बऱ्याच अंशानें कमी झाली असती. खर्चाकडील खातें नंबर ३० अ यांत सन १९३९–४० सालांत झालेला आणि सन १९४०–४१ सालांत अंदाज केलेला खर्च धरावा लागला नसतां तर ३४००० पर्यंत बचत होऊन तूट जवळ जवळ भरून निघाली असती. परंतु हल्लींच्या परिस्थितींत अंदाजांत दाखविलेल्या या खर्चाच्या बाबी अपरिहार्यच असल्यानें त्यांत आतांचे अंदाजांत कांहीं कमी धरतां येत नाहीं. बाकीच्या जमाखर्चाच्या बाबी जवळ जवळ सन १९४०–४१ सालचे प्रथम अंदाजाप्रमाणेंच धरणेंत आल्या आहेत. गेले तीन वर्षांची परिस्थिति व सन १९४०–४१ सालची एकंदर सर्वसाधारण परिस्थिति यांत महदंतर असल्यानें गेले तीन सालचे सरासरीचे आंकड्याचे आधारावर सन १९४०-४१ सालचें अंदाजपत्रक तयार करणें बरोबर होणार नाहीं. सन १९३९ ४० सालचें सर्व वर्ष जवळ-जवळ युद्ध–परिस्थितींतच गेलें असल्यानें त्याच सालचे अनुरोधानेंच तसल्याच प्रकारच्या सन १९४०।४१ सालचें अंदाजपत्रक तयार करणें जास्त बरोबर होऊं शकेल, या दृष्टीनेंच तशी योजना केली आहे. जमीनबाब व लोकलफंड यांत २५ टक्के सूट व इनकमटॅक्स कर बसविणेची उत्पन्नाची किमान मर्यादा वाढविली गेली त्यामुळें घटलेलें ७००० इन्कमटॅक्सचें उत्पन्न असे मिळून एकंदर उत्पन्नांत एक लाख तीस हजारापर्यंत येणारी कायम तूट लक्षांत घेतां सर्व रीतीनें काटकसरीचे प्रयत्न सुरू ठेवून सुद्धां बजेटची तोंडमिळवणी होऊं शकत नाहीं यांत विशेष आश्चर्य करणेजोगें कांहीं नाहीं. सालोसाल प्रत्येक खात्याचे खर्चात शक्य तितकी काटकसर व त्याबरोबर शक्य असतील अशा उत्पन्नाच्या नवीन नवीन बाबी शोधून काढून त्यापासून उत्पन्न वाढविणेचे प्रयत्न अशा रीतीनें दोन्ही बाजूंनीं प्रयत्न कांहीं वर्षे सुरू राहातील तरच बजेटाची तोंडमिळवणी करणें व राष्ट्रसंवर्धक अशा कामाकडे जास्त जास्त खर्च करणें शक्य होईल व याद्दष्टीनें दरबारकडून प्रयत्नही सुरू आहेत. असो. वर लिहिल्याप्रमाणें १९४०।४१ सालांत जमेचे अंदाज धरले आहेत ते जवळ जवळ १९३९-४० सालचे प्रथम अंदाजी बजेटाप्रमाणेंच धरले आहेत. खातें नं. १ ते २६ यांत १९३९-४० सालचे प्रथम अंदाजांत सूट व इनाम गांव उत्पन्नासुद्धां ९५०८६३ रुपये उत्पन्न धरणेंत आलें होतें तें १९४०-४१ सालचे प्रथम अंदाजांत ९५२९९८ म्हणजे २१३५ रुपये वाढीनें धरणेंत आलें आहे. साडेनऊ लाखांच्या जमेंत दोन हजारांची वाढ विशेष नसून त्याजबद्दलचीं कारणें देणेचें फारसें कारण राहात नाहीं. खर्चाचे बाजूसही त्याचप्रमाणें आहे. खातें नं. १ ते ३० अ या खात्यांत सूट व इनामी उत्पन्न धरून सन १९३९।४० चे प्रथमचे अंदाजपत्रकांत १००३७७८ रुपये खर्च धरणेंत आला असून, सन १९४०।४१ चे प्रथम अंदाजपत्रकांत १०,२८,४६४ रुपयांचा खर्च धरणेंत आला आहे. म्हणजे २४६८६

रुपयांनीं जास्त धरलेला आहे. सन १९३९-४० सालचे प्रथमारंभींचे अंदाजपत्रकांत खातें नं. ३० अ मुळींच नसून, सन १९४०–४१ चे प्रथम अंदाजपत्रकांत तें खातें अजीबात नवीनच सुरू करणेंत येऊन, त्याप्रीत्यर्थ २४००० हजार रुपये खर्च दाखविण्यांत आलेला आहे. साडेचोवीस हजाराचे वाढींत २४००० हजार रुपये खातें नं. ३० अ मुळेंच वाढ असून बाकी ६८६ रुपये वाढ इतर खात्यांत आहे. एकंदर दहा लाखाचे बजेटांत एक हजाराचे आंत बाहेरची वाढ विशेष महत्त्वाची नसल्यानें त्याचीं कारणें देणेचें कारणच नाहीं. खातें नं. ३० अ यांत युद्ध–मदत फंडास १०००० रुपये आणि तीन हजार रुपये खानेसुमारी करितां असा खर्च दाखविला आहे. या दोन्ही बाबींवरील खर्च उघड उघड अपरिहार्य असल्यानें त्याबाबत विशेष खुलासा करणेचें कारण राहात नाहीं. बाकीच्या दोन बाबीं-पैकीं दोन हजार रुपये ग्रामसुधारणेकरितां धरणेंत आले आहेत. नवीन सालांत सहकारी तत्त्वांवर दोन तीन तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स स्थापन होऊन त्यांचेमार्फत ग्राम-सुधारणेचें काम हातीं घेतलें जाण्याची बरेच प्रमाणांत अपेक्षा आहे. ग्रामसुधारणेच्या कामा-बाबत अशा संस्थांना उत्तेजनार्थ मदत करणें अवश्य होईल, या दृष्टीनें ही दोन हजार रुपयांची योजना करून ठेवणेंत आली आहे. खातें नंबर ३० अ यांत फॅमिन रिझर्व फंडची एक नवीन योजना या सालापासून सुरू करणेंत आली आहे. अशा रीतीची गंगाजळीची योजना कोणते तरी स्वरूपांत असावी अशा रीतीच्या सूचना कायदेमंडळाकडूनही वेळो-वेळीं आल्या होत्या; पण त्याप्रमाणें अम्मलबजावणी करणें आजपर्यंत अनेक कारणांनीं शक्य झालें नाहीं. अशा रीतीचा उपक्रम सुरू करणेस हल्लींची वेळही सर्वस्वीं अनुकूल अशी नाहीं हें खरें, परंतु यापुढें जास्त वाट न पाहतां थोड्या प्रमाणांत कां होईना अशा रीतीचा उपक्रम सुरू करणेचें ठरविणेंत येऊन त्याप्रमाणें अम्मल करणेंत आला आहे. वसुलीबाबतचा खर्चवेंच वजा जाऊन इन्कमटॅक्स कराचें जें निव्वळ उत्पन्न राहील त्यांपैकीं ५० टक्के उत्पन्न दरसाल या रिझर्व फंडास जमा करणेचें ठरविणेंत आलें आहे. तसेंच या फंडाची रकम संस्थानचे एकंदर शिलकींत न ठेवितां सरकारी रोख्यांत अगर पूर्ण सुरक्षित असे अन्य ठिकाणीं गुंतविणेचें ठरविणेंत आलें आहे. याप्रमाणें सन १९४०।४१ सालचें जमा-खर्चाचे प्रथम अंदाजपत्रकाची सर्वसाधारण रूपरेषा आहे. सहकारी संस्थास मदतीदाखल कांहीं योजना करणेंत आलेली नाहीं. परंतु संस्थानमजकुरीं सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापन करणेची बहुतेक तयारी झाली असून प्रत्यक्ष देवघेवीस येत्या दिवाळीचे सुमारास आरंभ होईल अशी बळकट अपेक्षा आहे. बँकेचे देवघेवीचे व्यवहार सुरू झाल्याबरोबर बँकेकडून द्रव्य–मदत होईल. अशा रीतीच्या सहकारी पतपेढ्या मागोमाग गांवगन्ना स्थापन होऊन त्यापासून शेतकरी वर्गास मदत करणेस सुरुवात होईल अशी आजचे एकंदर परिस्थितीवरून अपेक्षा आहे. त्यामुळें त्यासंबंधींची कांहीं योजना बजेटांत दिसून येत नाहीं.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें बजेटाची एकंदर परिस्थिति मंडळापुढें मांडणेंत आली आहे. जमाखर्चाच्या जास्त महत्त्वाच्या बाबींसंबंधानें मीं खुलासा केलाच आहे. बाकी खातेवार कमी जास्तीचे कारणाचा खुलासा जरूर तर माझे मित्र स. स. रावसाहेब हुजूर ट्रेझरी ऑफि-सर करतील.

मीं आतांपर्यंत केलेल्या विवेचनांतील बराचसा मोठा भाग आंकड्यांसंबंधीं असल्यानें तो एका वाचनानें कदाचित् आपल्या लक्षांत राहाणार नाहीं म्हणून सर्व विवेचन " बजेट नोट " या स्वरूपांत छापून घेणेंत आलें असून त्याच्या प्रती आपणांस वांटण्यांत येत आहेत. बजेट हा विषयच कंटाळवाणा, व त्यांत माझें भाषणही जरा जास्त लांब झालें. अशा स्थितींत आपण तें शांतपणें ऐकून घेतलें त्याबद्दल आपणां सर्वांचे आभार मानून मी माझें भाषण पुरें करितों.

## उपाहारानंतर

### रावसाहेब महाबळ यांचें बिल

पुरुषांकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतींसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबाबत जमखंडी संस्थानचा ॲक्ट नं. १ सन १९३७ चा दुरुस्त करण्याबद्दलचें बिल.

### ॲक्ट नंबर      सन १९४० चा.

जमखंडी संस्थानचा सन १९३७ चा ॲक्ट नं. १ चा पुरुषांकडन प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबद्दलच्या दुरुस्त होण्याचें बिल जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळापुढें मांडण्याचें आहे. त्याबद्दलचीं कारणें व त्याचा हेतुः—

### कारणें:—

मूळ जमखंडी संस्थानचा १९३७ चा ॲक्ट नंबर १ मध्यें हिंदु कुटुंबांतील विधवा स्त्री नवऱ्याचे ठिकाणीं सहहिस्सेदार होतें असें विधान कलम १ मध्यें करणेंत आलें आहे; या कायद्यासाठीं तिला प्राप्त होणारा सहहिस्सेदाराचा दर्जा अगर हक्क या कायद्यापुरताच मर्यादित आहे, कीं इतर कायद्याखालींही तिला त्याचा उपयोग करतां येईल याबद्दल संशय उत्पन्न होणेचा संभव आहे; तो राहूं नये म्हणून व संदिग्धता दूर व्हावी म्हणून हें दुरुस्तीचें बिल आणणें जरूरीचें आहे.

### हेतु:—

वर नमूद केलेली संदिग्धता नाहींशी व्हावी असा हेतु हें बिल आणण्यांत आहे.

### जमखंडी संस्थानचा सन १९३७ चा ॲक्ट १ चें दुरुस्तीचें बिल

जमखंडी ॲक्ट नं.      सन १९४० चा पुरुषांकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबाबत जमखंडी संस्थानचे सन १९३७ चे नं. १ चे कायद्याचें कलम १ यांतील खुलासे या सदराखालीं खालीलप्रमाणें नवीन खुलासा जोडण्यांत येत आहे.

**कलम १ यांतील खुलासे या सदरांत शेवटीं:-**

" ( ३ ) हिंदु कुटुंबांतील विधवा स्त्री नवऱ्याचे ठिकाणीं सहहिस्सेदार होते असें वर कलम १ यांत नमूद आहे. त्यामुळें तिला सहहिस्सेदार म्हणून प्राप्त होणारा हक्क अगर दर्जा फक्त या कायद्याचे कारणापुरताच मर्यादित आहे, असें समजणेंचें आहे. "

रा. सा. महाबळ:—मीं आपणापुढें हें लहानसें बिल मांडलें आहे. तें पूर्वी गॅझेटमध्येंही प्रसिद्ध झालें आहे. बिलाचें पहिलें वाचन होऊन तें मंजूर व्हावें याबद्दल मी थोडेसें बोलणार आहें. पुरुषांकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबाबत जमखंडी संस्थानचा ॲक्ट नं. १ सन १९३७ चा पास झाल्यानंतर पोटगीच्या रकमेऐवजीं इस्टेटींतील हिस्सा देतां येतो अशाबद्दलचा तो कायदा झाला. त्यांत कलम १ यांतील खुलासे या सदरांत मी खालीलप्रमाणें दुरुस्ती सुचवीत आहें.

" ( ३ ) हिंदु कुटुंबांतील विधवा स्त्री नवऱ्याचे ठिकाणीं सहहिस्सेदार होते असें वर कलम १ यांत नमूद आहे. त्यामुळें तिला सहहिस्सेदार म्हणून प्राप्त होणारा हक्क अगर दर्जा फक्त या कायद्याचे कारणापुरताच मर्यादित आहे असें समजणेचें आहे. " बिलाचा हेतु व कारणें पाहातां दत्तक घेणेचा मोह तिला होऊं नये म्हणूनच केवळ तो कायदा पास केला. पुढें एक दोन ठिकाणीं असा प्रश्न उत्पन्न झाला कीं, तिला coparcener मानावें कीं co-sharer म्हणावें ? ही अडचण उपस्थित झाली. कलेक्टरपुढें एकानें तक्रार केली कीं, मी एक हिस्सेदार असल्यानें व मी सज्ञान असल्याकारणानें ती इस्टेट माझ्या ताब्यांत यावी. तेव्हां या कायद्याच्या हेतूप्रमाणें कलेक्टरनीं तिचा अर्ज नामंजूर केला.

गहाण सोडविणेच्या दाव्यांतही असेच एक दोन प्रसंग आले. हिशेब मागणेचे दाव्यांतही अशीच सहहिस्सेदार व नवऱ्याची भागीदार म्हणून मागणी करण्यांत येऊं लागली. या सहहिस्सेदारणीनें अशा इस्टेटीची विल्हेवाट करूं नये व पोटगीविरहित दुसरा तिला कोणताही हक्क असूं नये म्हणून ही दुरुस्ती मी मांडीत आहे. केवळ पोटगी मागणेपुरतीच ती सहहिस्सेदार आहे असाच त्याचा अर्थ व्हावा. या हेतूनें हें बिल मांडलें आहे. कोर्टांतून याबद्दलचे निर्णय न घेतां कायदाच अशा प्रकारें दुरुस्त केल्यास बरें असें वाटतें.

स. स. देवधर:—मूळ बिलानें विधवेला दत्तक घेण्याचे जे हक्क मिळणार ते हिरावून घेतल्यासारखे या आपल्या दुरुस्तीनें होणार असें वाटतें. या दुरुस्तीमुळें स्त्रियांच्या हक्कावर जास्त Restriction पडेल असें वाटतें व या खुलाशामुळें सर्व इस्टेटी गहाण टाकल्या जातील व त्यामुळें तंटे उत्पन्न झाले कीं अस्तित्वांत असलेल्या कायद्याप्रमाणें दिवाणी दावा करा असें सांगण्याची पाळी येईल. तरी असा हा घोटाळा होऊं नये असें माझें मत आहे.

स. स. मंडी:—ह्या बिलामध्यें दुरुस्तीची जरूरी नाहीं. त्यामुळें दिलेले हक्क काढून घेतल्याप्रमाणें होणार आहे. गेले वर्षी कायदा करून यंदा हक्क काढून घेतल्यामुळें अन्याय केल्यासारखें होणार आहे. तरी ही दुरुस्ती होऊं नये.

रा. सा. महाबळ:—विरोध करणाऱ्या स. सभासदांना या कायद्यानें दिलेले हक्क काढून घेतले जातील असें वाटतें. परंतु तसा मूळच्या कायद्याचाही हेतु नाहीं. आपल्याला हिंदु विधवांना पोटगीऐवजीं इस्टेट मिळावी असें वाटत असेल व तसें आपलें म्हणणें असेल तर आपण तसा कायदा करून घ्यावा त्याबद्दल माझी यत्किंचितही हरकत नाहीं. पोटगीऐवजीं इस्टेट मिळावी असा हक्क देणारा कायदा स्वतंत्र रीतीनें करून घ्यावा. तो प्रश्न वेगळा. शिवाय तिला स्वतंत्र हक्क हिंदु कायद्याप्रमाणेंच मिळत नसल्यानें या कायद्याप्रमाणें तिला जास्त हक्क मिळाले आहेत असें नाहीं व मीं सुचविलेल्या दुरुस्तीमुळें हक्क काढून घेतले असेंही होत नाहीं. संशयास्पद भाषेमुळें उत्पन्न होणारे दोष काढणेसाठींच केवळ ही दुरुस्ती आहे. संशयास्पद भाषेमुळें हक्क उत्पन्न झाले आहेत असें म्हणणेंही मूलतः चुकीचें आहे. ही दुरुस्ती न केल्यास हिंदु कायद्याच्या तत्त्वास बाध येईल. तरी या बिलाचें पहिलें वाचन पास करावें अशी या मंडळाला विनंति आहे.

मे. अध्यक्ष यांनीं पहिलें वाचन पास होणेसाठीं मतें घेतां १७ विरुद्ध ३ मतांनीं पहिलें वाचन पास झालें.

रा. सा. महाबळ:—आतां दुसरें वाचन मंजूर व्हावें अशी विनंति आहे.

मे. अध्यक्ष:—या बिलासंबंधीं कोणास कांहीं सूचना करावयाची आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) नाहीं.

मे. अध्यक्ष यांनीं दुसरें वाचन पास होणेसाठीं मतें घेतां १७ विरुद्ध २ मतांनीं दुसरें वाचन पास झालें.

रा. सा. महाबळ:—आतां तिसरें वाचन मंजूर व्हावें अशी विनंति आहे.

मे. अध्यक्ष यांनीं तिसरें वाचन पास होणेंसाठीं मतें घेतां १७ विरुद्ध २ मतांनीं तिसरें वाचन पास झालें.

मे. अध्यक्ष:—सदरहू बिल पास झाल्याचें मी जाहीर करतों.

त्यानंतर स. स. देवधर यांनीं आपलें खालील बिल दुसऱ्या वाचनासाठीं पुढें मांडलें.

## सन्मान्य सभासद व्यंकटेश राजाराम देवधर रा. जमखंडी यांचें बिल

### १ वेश्याव्यवसाय निवासस्थान केंद्रीकरण बिल

खालील बिल अलाहिदा लोकमत अजमावण्यासाठीं गॅझेटमध्यें प्रसिद्ध करणेंत आलें आहे व या खेपेस तें दुसऱ्या वाचनासाठीं आहे.

ज्याअर्थीं जमखंडी शहरामध्यें गल्लोगल्लीं वेश्याची वस्ती वाढूं लागली आहे व ज्याअर्थीं तशी वस्ती वाढणें हें समाजाची नीतिमत्ता व स्वास्थ्य यांस धोक्याचें व अनिष्ट आहे व त्या व्यवसायावर योग्य नियंत्रण पडण जरूरीचें आहे त्याअर्थीं खालील कायदा करणेंत येत आहे.

१ वेश्या राहण्याचीं व व्यवसायाचीं ठिकाणें गांवच्या एका विविक्षित बाजूस असणेचीं आहेत, व अन्यत्र व्यवसाय व राहणें हें गुन्ह्यास पात्र राहण्याचें आहेत.

२ सदर वेश्यागाराबद्दल जागा वेळोंवेळीं जरूरीप्रमाणें ठरविणेचा अधिकार स्थानिक सरकारकडे राहील व सदर कारणाकरतां लागणारी जागा अथवा राहातीं घरें ताब्यांत वगैरे घेणेचा अथवा ताब्यांत देवविणेचा सरकारास पूर्ण अधिकार असून, सदर लोक्यालिटीमधील घरांचीं भाडीं अथवा विक्रीच्या कामीं जागेच्या किंमती सरकाराकडून ठरविण्यांत येतील.

३ वरील नियमास सोडून एखादी वेश्या (एक अथवा अनेक) इतर ठिकाणीं राहिलेली आढळून आल्यास तिचा तो गुन्हा कॉग्निझिबल स्वरूपाचा होईल व सदर गुन्ह्याबद्दल तीन महिन्यांची साधी कैद अथवा ५० रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार कोणत्याही मॅजिस्ट्रेटास राहील.

४ जो कोणी घराचा मालक अथवा जागेचा भोगवटा करणारा अथवा कोणत्याही हक्कानें जागा अथवा घर धारण करणारा मालक, समजून उमजून वेश्यागार नव्हे अशा ठिकाणीं एखाद्या वेश्येस (एक अथवा अनेक) जागा भाड्यानें अगर अन्य रीतीनें त्या व्यवसायासाठीं म्हणून राहणेसाठीं देईल तो अबेटर म्हणून कलम ३ यांतील गुन्ह्यास पात्र राहील.

५ या कायद्याचे करतां वेश्या म्हणजे "जी संभोगासाठीं म्हणून मोबदला घेऊन आपल्यावर ज्याचा कायदेशीर हक्क नाहीं अशा माणसास आपल्या देहाची विक्री करते ती" असा समजण्याचा आहे.

स. स. देवधरः—माझें हें बिल गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. ५०० लोकांच्या सह्यानिशीं अर्जही माझ्या बिलाचा पुरस्कार करण्यासाठीं आला आहे. एकंदर अशा रीतीनें नीतिमत्तेला या कायद्यानें पाठबळ मिळणार आहे. मी हें बिल दुसऱ्या वाचनासाठीं मांडीत आहें. जमखंडी शहरांत तरी जनसंख्येच्या मानानें वेश्याव्यवसाय बोकाळलेला आहे. हा समाज हल्लीं जिकडे तिकडे दिसतो. कोठेंही पहा. प्रत्येक आळींत, देवालयाच्या दोन्ही बाजूस, भररस्त्यावर, प्रत्येक गल्लींत असा सर्व ठिकाणीं पसरलेला आहे. यास कांहीं तरी आळा बसावा म्हणून हें बिल मी मांडीत आहे. मध्यंतरीं रा. ब. दिवाणसाहेबांकडून डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्टप्रमाणें तजवीज करणेबद्दल काम चाललें आहे. म्युनिसिपल ॲक्ट केवळ कुंटणखान्याकरितांच आहे. दोन किंवा अधिक बायका कुंटणखाना करून तो व्यवसाय चालवितील म्हणून तो कायदा आहे. मी म्हणतो तशी व्यवस्था त्या कायद्यामध्यें नाहीं. वाढलेली वेश्यांची संख्या लक्षांत घेतां आतां यास आळा घातला पाहिजे. दहा वर्षांच्या या काळांत हा व्यवसाय करणाऱ्या दुप्पट बायका वाढल्या आहेत. तरी आतां हें बिल मंजूर करावें अशी विनंति आहे. थिएटर, टंकसाळी विहिरीचे बाजूस वेश्यांचे अड्डेच आहेत. लोकांना मात्र हें बिल पाहिजे आहे. लोकांची नीतिमत्ता राखावयास पाहिजे असल्यास यास बंदी केली पाहिजे. इतर ठिकाणच्या वेश्या आणि जमखंडी येथील वेश्या यांची स्थिति

पाहिली तर फार भिन्न आहे. इतर ठिकाणीं वेश्यांचें निवासस्थान हें गांवापासून बऱ्याच अंतरावर व एका बाजूला असतें. तेथें आजूबाजूला इतर लोकांची वस्ती नसते. पण येथें भररस्त्यावर चार दोन घरें सोडून वेश्यांचीं घरें आहेत. आज येथें ब्राह्मणाचे घरास लागून वेश्यांचीं घरें आहेत. रावसाहेब महाबळ न्यायमंत्रि यांचें घराचे दरवाजांत उभें राहिलें म्हणजे समोर वेश्यांचीं घरें ! स. स. घोरपडे यांच्या घरांच्या बाजूला वेश्येचें घर ! प्रत्येकांच्या घरामागें व पुढें हल्लीं वेश्यांचीं घरें आहेत. ह्या प्रश्नाचा समाजाच्या दृष्टीनें विचार झाला पाहिजे. यामुळें समाजांतील नीतीच्या कल्पना शिथिल होऊन समाज अनैतिक मार्गाकडे झुकूं लागेल व समाजाला भलतेंच वळण लागेल. म्हणून हें बिल कोणत्याही स्वरूपांत मंजूर करावें, पण तत्त्व अंमलांत आणावें. शब्दच्छल करणेचा माझा हेतु नाहीं. बिलाचे शब्दांत वाटल्यास दुरुस्ती करा. यासाठीं लोक आपल्याशीं को-ऑपरेशन करतील. टंकसाळीच्या बोळांत या बाया ढेंकणासारख्या बसलेल्या असतात. श्रीमंत राजेसाहेबांची मोटार जात असतांना या रांडा भर रस्त्यांत बसलेल्या असतात ! अशी विचित्र परिस्थिति आहे. तेव्हां याला आळा घालण्यासाठीं हें बिल पास करावें अशी विनंति करून मी माझें भाषण संपवितों.

रा. सा. महाबळः—या बिलाच्या तत्त्वास मी विरोध करीत नाहीं. तत्त्व मान्य आहे. परंतु हें बिल पास झाल्यास त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनें व्यवस्था कशी व्हावयाची हा मोठा नाजुक पण महत्त्वाचा प्रश्न आहे. या सगळ्या बिलामध्यें अवघड गोष्ट व्यवस्थेच्या दृष्टीनें आहे. या बिलास विरोध करणें म्हणजे आपल्या घरांसमोर वेश्या राहाण्यास संमति देण्यासारखेंच आहे. रा. ब. दिवाणसाहेबांकडे यासंबंधीं अर्ज आलेला आहे. आपण हें बिल मांडलें तें पास झालें तर जनतेकडून त्याचें स्वागत केलें जाईल. पण ह्या बायकांना राहाण्यासाठीं चाळी कोणीं बांधून द्याव्या ? त्यांची राहाण्याची व्यवस्था कोठें करावयाची ! तुम्ही म्हणाल सरकारनें सर्व व्यवस्था करावी. सरकारनें या लोकांना चाळी बांधून द्याव्या. बरें आज तशी व्यवस्था झाली तर घरमालक ओरडतील त्यांचें भाडें नाहींसें होतें म्हणून. अशा लोकांना जागा दिल्यामुळें त्यांना आज भरपूर भाडें मिळत आहे. तेव्हां हें जमणार कसें ? आज हें बिल पास झालें तर त्या बाया म्हणतील आम्हांस घरें बांधून द्या. गांवाबाहेर त्यांना घरें बांधून दिल्यामुळें त्यांचा धंदा चालणार नाहीं. मग त्यांचेकडून भाडें कसें वसूल होणार ? कीं त्यांना जागा मोफतच द्यावयाची ? गोष्ट तापदायक आहे खरी; परंतु ती दुरुस्त करणें कठीण आहे. तत्त्वास माझा बिलकूल विरोध नाहीं. परंतु खर्चाची व अंमलबजावणीची तजवीज कशी करावी हा मोठा बिकट प्रश्न आहे. तशी तजवीज करणें फार खर्चाचें आहे. लोकांनीं या बाबतींत जास्त पुढाकार घेतला पाहिजे. म्हणजे सरकार त्यास हातभार लावील. अगर याहून हें बिल जास्त सोईस्कर असें करून मांडल्यास बरें होईल. आतां आहे या स्वरूपांत बिल पास झाल्यास त्या बिलाप्रमाणें तजवीज कशी करावयाची ? अडचणी किती येतील याचा विचार करावा आणि मगच बिलास मंजूरी द्यावी.

स. स. देवधरः—लोकांना हें बिल पाहिजे आहे. लोक आपल्याशीं Co-operation करतील. आपण मांडलेल्या अडचणी काल्पनिक आहेत. ह्या बिलांत वाटेल तो फरक करा.

पण तत्त्व अंमलांत आणा. सरकारनें थोडी फार सक्ति करावी व तत्त्व अंमलांत आणावें. वाटल्यास हें बिल आपण तयार करावें.

रा. सा. महाबळः--असलेलें बिल अव्यवहार्य आहे.

स. स. देवधरः—मुधोळ संस्थानांत अशा प्रकारचें बिल झालें आहे.

मे. अध्यक्षः—या बिलास विरोध असेल तर मतास टाकतो.

रा. सा. महाबळः—माझा विरोध आहे असें नाहीं. हें बिल अव्यवहार्य आहे. यामुळें सरकारवर आर्थिक जबाबदारी पडणार आहे.

स. स. देवधरः—समाजाची गरज लक्षांत घेऊन हें बिल पास करावें. यास कोणीही विरोध करूं नये.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां २ विरुद्ध ९ मतांनीं स. स. देवधर यांचें बिल नामंजूर झालें.

मे. अध्यक्षः—आतां ठराव मांडावयाचे आहेत.

रा. सा. महाबळः—मी माझे ठराव उद्यां मांडीन.

## स. स. केंचनगौडा रंगनगौडा नाडगीर यांचा ठराव

ठराव १:—संस्थानमजकुरीं पिकांच्या रोगनिवारणार्थ व पिकांना उंदरांचा वगैरे होणारा उपद्रव होऊं नये म्हणून सरकारांतून औषधें मोफत देणेची पद्धत सुरू करणेंत यावी व त्याकरितां या विषयांत तज्ज्ञ अशा एका इसमाची नेमणूक करणेंत येऊन त्याच्या शिफारसीप्रमाणें या बाबतींत सत्वर उपाययोजना अमलांत आणावी अशी या मंडळाची श्रीमंत राजेसाहेब सरकार यांना शिफारस आहे.

स. स. नाडगीरः—लोकांचा धंदा मुख्यतः शेती असल्याकारणानें व सध्यां शेतीस उंदरांचा व रोगांचा फार उपद्रव होतो त्यामुळें शेतकऱ्यांचें अतोनात नुकसान होतें. तेव्हां तो उपद्रव नाहींसा व्हावा म्हणून हा ठराव मांडला आहे. तेव्हां तो मंजूर करावा अशी विनंति आहे.

स. स. देवधरः—माझा या ठरावास दुजोरा आहे. उंदरांचे तांडेच्या तांडे हल्लीं शेतीस सरास उपद्रव देत आहेत तरी याबद्दल जरूर ती तजवीज व्हावयास पाहिजे. सबब स. स. नाडगीर यांनीं जो ठराव मांडला आहे तो पास करावा.

रा. ब. दिवाणसाहेबः—ठरावाच्या हेतूबद्दल सहानुभूति आहे. प्रश्न येवढाच आहे कीं, ही जबाबदारी प्रजेवर असतां ती सरकारकडे टाकली जात आहे. वास्तविक हें काम तालुका असोसिएशनसारख्या संस्थेचें आहे. अशी संस्था काढणेचें काम चालू आहे. परंतु केवळ सरकारवर हा भार घालणें योग्य नाहीं.

स. स. नाडगीरः—तालुका डे. असोसिएशनकडून काय मदत मिळवावयाची ?

रा. ब. दिवाणसाहेबः—तुम्ही स्वस्थ बसून सरकारनें मदत करावी हें म्हणणें चुकीचें आहे. लोकांनीं योजना तयार करावी व त्यास सरकारनें मदत करावी.

स. स. नाडगीरः—आमची मागणी गैर आहे काय ?

रा. ब. दिवाणसाहेबः—हा पैशाचा प्रश्न आहे व इतकी सर्व तजवीज सरकारनें केली पाहिजे असें मला वाटत नाहीं.

स. स. चीफ मेडिकल ऑफिसरः—' सायमन गॅस ' नांवाचा एक गॅस असतो त्यानें उंदीर मरतात. दुसऱ्या कोणत्याही उपायांनीं उंदरांचा उपद्रव कमी होणार नाहीं.

स. स. नाडगीरः—मग तो गॅस सरकारनें पुरविण्याची व्यवस्था करावी.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसरः—आतां यंदाचा ' सीझन ' तर गेलाच आहे. पण ह्या कामीं सरकारनें व प्रजेनें मिळून दोघांनींही प्रयत्न करावे.

रा. ब. दिवाणसाहेबः—हा ठराव स. सभासदांनीं मागें घ्यावा.

स. स. नाडगीरः—माझा ठराव मतास टाकावा.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां ३ विरुद्ध ९ मतांनीं स. स. नाडगीर यांचा ठराव नापास झाला.

## स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांचा ठराव

**ठराव नं. १ :**—संस्थानमजकुरीं असलेल्या सर्व कचेऱ्यांमध्यें सार्वजनिक लोकांच्या सोईसाठीं म्हणून एक तक्रारी बुक ठेवणेंत यावें व सदर तक्रारी बुकांतील नोंदीची तपासणी प्रत्येक महिनाअखेर ज्या त्या कचेरीच्या व कोर्टाच्या इमीजियेट वरिष्ठ व मुख्य अंमलदाराकडून व्हावी व सदर नोंदी तपासलेबद्दल शेरे त्या बुकांत लिहिले जावेत. कचेरी या शब्दामध्यें नोंदणी-कचेरी, चीफ मेडिकल ऑफिस, पोलीस कचेरी, चावड्या व इतर कचेऱ्यांचा समावेश होतो. वरील उदाहरणें पूर्ण नसून तीं खुलाशासाठीं दिलेलीं आहेत. अशी या मंडळाची श्रीमंत राजेसाहेब यांचे हुजूरकडे विनंति आहे.

स. स. देवधरः—हा ठराव मांडण्याचा माझा हेतु असा आहे कीं, वरिष्ठ अंमलदारांना रयतेकडून-मदत मिळावी व को-ऑपरेशन मिळावें. अशा तक्रारी जास्त झाल्यास लोकांचें सहकार्य जास्त होत आहे असाच त्याचा अर्थ होईल. कांहीं गोष्टी अशा असतात, कीं त्याबद्दल मुख्य अंमलदाराकडे तक्रार करणें योग्य होणार नाहीं. हल्लीं तक्रार केल्यास ताबडतोब दाद लागते याबद्दल अधिकारी वर्गाचे आभार मानले पाहिजेत. परंतु क्षुल्लक गोष्टीं-बद्दल प्रत्यक्ष तक्रारीपेक्षां अशा बुकानेंच काम भागेल. खुद्द सरकारच्या कचेरींतसुद्धां तक्रारबुक

आहे. खालच्या अम्मलदारांबद्दलच्या ज्या रयतेच्या तक्रारी असतील त्या मांडण्यास त्यांना पूर्णपणें मुभा मिळेल. तरी हा ठराव आपणांपुढें मांडला आहे तो पास करावा अशी विनंति आहे.

स. स. मंडी:—माझा या ठरावास दुजोरा आहे.

रा. सा. महाबळ:—रयतांच्या तक्रारी अम्मलदारांच्या कानावर जाव्या यासाठीं हा ठराव मांडला आहे. जीं उदाहरणें ठरावांत दिलीं आहेत तीं खुलाशासाठीं दिलीं आहेत. ठराव मांडतांना स. सभासदांनीं आपणांपुढें जें भाषण केलें त्यांत आणि ठरावाच्या भाषेंत किती विसंगतपणा आहे हें आपल्या निदर्शनास मला आणावयाचें आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी-गांठीस वेळ लागत नाहीं. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी ताबडतोब मिळतात. याबद्दल तक्रार नाहीं. त्याचप्रमाणें तक्रार केल्यास ताबडतोब त्याची दाद लागते याबद्दल स. स. देवधर अधिकारी-वर्गाचे आभार मानतात. मग हा ठराव करून साधणार तरी काय ? एक पुस्तक ठेवावें व वाटेल त्यानें वाटेल ती तक्रार नोंद करून ठेवावी आणि महिनाअखेर शेरा मारावा. परंतु आपला ठरावाचा हेतु कसा चुकीचा आहे तो आपल्या निदर्शनास आणून दाखवितों. आतां एखाद्या इसमाच्या घरांत चोर शिरला आहे आणि त्यासाठीं त्याला ताबडतोब दोन पोलिस पाहिजे आहेत. परंतु ह्या ठरावाप्रमाणें त्याला पोलिस कचेरींत जाऊन बुकांत नोंद करून ठेवावी लागेल. तोपर्यंत इकडे चोर फरारी होईल. अशा वेळीं तक्रार नोंदण्याचा उद्देश कसा सफल होईल हेंच समजत नाहीं. याच्याही पुढें जाऊन मी असें म्हणतों कीं, तुम्हीं असा ठराव मांडा कीं वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं रयतेच्या आणि इतर लोकांच्या तक्रारी ताबडतोब ऐकून घेऊन त्यावर ताबडतोब निर्णय द्यावे. आणि मग कितीही तक्रारी येवोत. कोणीही आला तरी माझी तक्रार नाहीं. कोणीही अम्मलदार तक्रार ऐकणार नाहीं असें मुळींच होत नाहीं. परंतु प्रत्येक बाबतींत कित्येक बंधनें पाळून या तक्रारीचा विचार करावा लागतो. तीं बंधनें या बुकांतील तक्रारींत पाळतां येणार नाहींत. अशा प्रकारच्या तक्रारी हॉटेल बुकांत असतात. आपली dignity राखण्याच्या दृष्टीनें हें बरें दिसत नाहीं. हाताखालील नोकरांनीं कर्तव्य केलें नाहीं तर योग्य स्वरूपांत त्या त्या अम्मलदारकडे लेखी तक्रार करणेस मुळींच हरकत नाहीं. परंतु या बुकाच्या पद्धतीनें अनेक फाटे फुटतात. तेव्हां हा ठराव मागें घ्यावा असें माझें म्हणणें आहे.

रा. ब. दिवाणसाहेब:—आमचे ऑफिसमध्यें एक अर्जाची पेटी होती त्याप्रमाणें प्रत्येक ऑफिसमध्यें एक एक पेटी ठेविल्यानें काम भागेल. परंतु अनुभव असा आहे कीं, वाटेल तो मनुष्य वाटेल ती तक्रार करतो. तेव्हां तक्रार-अर्ज असेल तर स्टँपची जरूरी आहे असें वाटतें.

मे. अध्यक्षः—रा. ब. दिवाणसाहेब प्रत्येक ऑफिसमध्यें पेटी ठेवण्यास कबूल आहेत तर मग हा ठराव मागें घेण्यास काय हरकत आहे.

स. स. देवधरः—प्रत्येक ऑफिसांत अशी एक एक पेटी ठेवावी. सह्या असल्याशिवाय अर्जाचा विचार करूं नये. परंतु रजिस्ट्रारनें, दिलेली स्टे ऑर्डर पुढें खालीं वेळेवर पाठविली नाहीं तर अशा गोष्टीबद्दल तक्रार कशी करावयाची.

रा. सा. महाबळः—कोर्टाच्या बाबतींत अशा अर्जाचा विचार करतां येणार नाहीं. अपिलांत असलेले अर्ज दाखल होणार नाहींत.

स. स. देवधरः—तक्रार-अर्जास तिकिट नसावें.

रा. ब. दिवाणः—तक्रारी पेट्या ठेवण्यास हरकत नाहीं.

स. स. देवधरः—आपण पेट्या ठेवण्याची तयारी दर्शविल्यावरून मी माझा ठराव मागें घेतों.

## स. स. वीरभद्रप्पा आल्लाप्पा मंडी यांचा ठराव

**ठराव नं. १ :**—बनहट्टी गांवालगत असलेला टोलनाका बनहट्टींतील रहिवाशांना रोजच्या व्यवहाराकरितां अडचण न होईल अशा प्रकारें तेथून काढून घेऊन यलहट्टीच्या पूर्वेस एकादे जागीं घालणेंत यावा म्हणून या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना नम्र विनंति आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—ठरावांतील " यलहट्टीच्या पूर्वेस " हे शब्द काढून टाकावे म्हणजे ठरावास माझी हरकत नाहीं.

स. स. मंडीः—मग दुरुस्ती कशी करावयाची? नदीस जाणारे लोकांचे बाबतींत हा टोल आमचेवर पडूं नये अशा तऱ्हेनें तो टोलनाका बदलणेंत यावा असें म्हणणें आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—" To the west of यलहट्टी " अशी दुरुस्ती करावी.

स. स. मंडीः—यलहट्टीचे पश्चिमेस पुलाजवळ टोलनाका ठेवावा.

रा. ब. दिवाणसाहेबः—होसूर, चिमडच्या गाड्या येथून जातील त्यांना कशी बंदी करावयाची?

स. स. मंडीः—असे लोक किती जातील? आतांच टोल कमी झाला याचें कारण काय?

रा. ब. दिवाणसाहेबः—बनहट्टी व आसंगिचे लोकांस माफी मिळेल.

स. स. मंडीः—पण तसा दाखला घेऊन सव्यापसव्य कोणीं करावयाचें? लिलावांत कांहीं या गोष्टीमुळें तूट येत नाहीं. तूट येते ती Competition मुळें येते.

रा. ब. दिवाणसाहेबः—मी तसें ॲश्युअरन्स देतों.

स. स. मंडीः—तसें ॲश्युअरन्स कशाला ? दुरुस्तीच करा. " आसंगी क्रॉसिंगच्या पूर्वेस व यलहट्टीच्या पश्चिमेस कोठेंही " अशी दुरुस्ती करावी.

रा. ब. दिवाणसाहेबः—आपण सुचविलेली दुरुस्ती मान्य आहे. दुरुस्तीसह ठराव पास करण्यास आमची कोणतीच हरकत नाहीं.

मे. अध्यक्षः—दुरुस्तीसह ठराव पास झाल्याचें जाहीर करतों; व आतां वेळ संपल्यानें काम तहकूब ठेवावें.

---

# परिशिष्ट नं. १

## जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे सन्माननीय सभासद रा. रा. व्ही. आर. देवधर यांनीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर खालीलप्रमाणें.

| अ. नं. | इसमाचें नांव व लायकी | हुद्दा | हल्लीं ज्या जागीं काम करीत आहे ती शाळा | हल्लीं ज्या शाळेंत काम करीत आहे त्या ठिकाणीं आल्याची तारीख | हल्लीं ज्या जागीं काम करीत आहे त्या ठिकाणीं येऊन माहे जुलै १९४० अखेर किती वर्षे झालीं. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रघुनाथ बाळकृष्ण सावडे, ३ रें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | फेरीस स्कूल जमखंडी. | १-६-१९३० | १०-२ | |
| २ | रामचंद्र कृष्ण कुलकर्णी, दुसरें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | बनहट्टी कानडी मुलांची शाळा | १-८-१९२८ | १२ | |
| ३ | हणमंत बाळाजी रायबागी, तिसरें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | सावळगी कानडी शाळा | १-१०-१९३३ | ६-१० | |
| ४ | पीरसाहेब हसनसाहेब नदाफ, तिसरें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | कमडोळी मुलांची शाळा | १-७-१९२५ | १५-१ | |
| ५ | शिवनगौडा भरमगौडा पाटील, ३ रें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | कुंदगोळ का. मुलांची शाळा | ८-७-१९३९ | १०-२४ | |
| ६ | वासुदेव परशुराम काळे, दुसरें वर्ष ट्रेंड ... | हेडमास्तर | सांवशी शाळा | १-११-१९३६ | ३-९ | |
| ७ | रंगो नरसिंह गोटे, कानडी दुसरें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | हुन्नूर शाळा | १-१२-१९३५ | ४-८ | |
| ८ | गोविंद कृष्ण कुलकर्णी, कानडी १ लें वर्ष ट्रेंड | हेडमास्तर | गोटे शाळा | १-६-१९३१ | ९-२ | |
| ९ | श्रीपाद लक्ष्मण गु॥ देसाई, „ १ लें वर्ष ट्रेंड | शाळामास्तर | कवटगी शाळा | १-६-१९४० | -२ | |
| १० | संगपा रुद्रापा मरेगुद्दी ... | हेडमास्तर | चिद्री शाळा | १-६-१९४० | -२ | |
| ११ | धुंडापा गुरबसापा हट्टी | हेडमास्तर | कडपट्टी तालुका जमखंडी | १-९-१९२२ | १७-११ | |

Sd./-A. V. DHARESHWAR
विद्याधिकारी.

# परिशिष्ट नं. २

## स. स. शिवाजी गंगाधर कुलकर्णी यांच्या प्रश्नाचें उत्तर

| शेज नंबर | प्रश्न | उत्तर. | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन | संख्या | कुंदगोळ मुनसफ कोर्टाचे ठरावावर हायकोर्टकडे फर्स्ट अपिलें व तपासणी अर्ज झाले त्याजबद्दलचें पत्रक स. १९३६ ते १९४०. निकालाचा तपशील | | | | | शेरा |
| | | | | कायम केले | फिरविले | फेरफार केला | परत चौकशीस | इतर रीतीनें | |
| | | | | | फर्स्ट | अपिलें | | | |
| २ | कुंदगोळ येथील दिवाणी कोर्टाकडील माहे ऑगस्ट १९३६ ई. पासून माहे जुलै स. १९४० ई. अखेर संपणाऱ्या चार वर्षांत जे फर्स्ट क्लास व सेकंड क्लास दावे आणि दरखास्ती यांच्यांतील किरकोळ कामें यांचे जे निकाल झाले व त्या निकालाविरुद्ध वरिष्ठ कोर्टाकडे किती अपिलें व तपासणी अर्ज झाले | १९३६ | २ | ... | ... | २ | ... | ... | |
| | | १९३७ | २ | ... | ... | ... | १ | १ | |
| | | १९३८ | २ | २ | ... | ... | ... | ... | |
| | | १९३९ | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | | १९४० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | | | | | तपासणी | अर्ज. | | | |
| | | १९३६ | १ | १ | ... | ... | ... | ... | |
| | | १९३७ | ३ | ३ | ... | ... | ... | ... | |
| | | १९३८ | ५ | ३ | २ | ... | ... | ... | |
| | | १९३९ | ७ | ४ | ३ | ... | ... | ... | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व त्यांतील सदर खालील कोर्टाचे कितीमध्यें रिमांड हुकूम झाले यांचें सालवार चारी सालचें पत्रक देर्णेत येईल काय ? | १९४० | १ | १ | ... | ... | ... | ... | |
| | कुंदगोळ मुन | सफ कोर्टाच्या | ठरावावर डि | स्ट्रिक्ट कोर्टा त्याबद्दल मा | कडे अपिलें हितीचें पत्रक | व तपासणी | अर्ज झाले | |
| | १९३६ | ४ | ३ | १ | ... | ... | ... | |
| | १९३७ | ११ | ३ | ५ | २ | ... | १ | |
| | १९३८ | १४ | ६ | ४ | १ | ... | ३ | * तीनही अपिलांचा निकाल झालेला नाहीं, सर्व शिल्लक आहेत. |
| | १९३९ | ७ | ३ | ३ | ... | ... | १ | |
| | १९४० | ३* | ... | ... | ... | ... | ... | |
| | | | | अपिलें दर | खास्तीवरील | | | |
| | १९३६ | १ | ... | ... | १ | ... | ... | |
| | १९३७ | ३ | २ | ... | ... | ... | १ | |
| | १९३८ | ४ | २ | २ | ... | ... | ... | * तीनही अपिलांचा निकाल झालेला नाहीं, सर्व ३ शिल्लक आहेत. |
| | १९३९ | ५ | २ | १ | ... | ... | २ | |
| | १९४० | ३* | ... | ... | ... | ... | ... | |
| | | | | किरकोळ | आपिलें | | | |
| | १९३६ | ० | ... | ... | ... | ... | ... | |
| | १९३७ | १ | १ | ... | ... | ... | ... | |
| | १९३८ | २ | १ | १ | ... | ... | ... | * अद्यापि निकाल नाहीं, सर्व ५ शिल्लक आहेत. |
| | १९३९ | ० | ... | ... | ... | ... | ... | |
| | १९४० | ५* | ... | ... | ... | ... | ... | |

ता. २२।८।४०

Sd/-B. B. MAHABAL
न्यायमंत्री

## दुसरा दिवस

### शुक्रवार, ता. २३–८–४०

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशींच्या बैठकीस १२॥ वाजतां सुरवात झाली. पहिल्या दिवसाइतकेच सन्मान्य सभासद हजर होते. कार्यक्रम-पत्रिकेप्रमाणें प्रथम बजेटवरील चर्चेस सुरवात झाली.

### स. स. देवधर यांचें बजेटवरील भाषण

स. स. देवधरः—या बजेटावर मीं बोलतांना रयतांना जे वेगवेगळे कर द्यावे लागतात त्या रयतांना किमान मदत जास्तींत जास्त कितपत केली आहे याचें मीं विवेचन केलें तर हें बजेट अत्यंत निरुपयोगी आहे असें म्हणावें लागेल. या बजेटांत रयतांना कांहींही मिळालेलें नाहीं. या संस्थानची जवळ जवळ एक लाख लोकसंख्या आहे. म्हणजे प्रत्येक जन्माला आलेल्या माणसाला आठ रुपये टॅक्स द्यावा लागेल. ब्रिटिश हद्दींत हें प्रमाण पाहिलें तर बंगालमध्यें चार किंवा पांच रुपये दर माणशीं टॅक्स द्यावा लागेल. आर्थिक दृष्टीनें हलाखीस आलेल्या मुंबई इलाख्यांतही हें प्रमाण दर माणशीं सहा रुपये पडतें. आणि आमच्या संस्थानांत मात्र दर माणशीं आठ रुपये टॅक्स द्यावा लागतो. बरें हे प्रत्येक माणसाकडून आठ रुपये घेतात व त्याचा मोबदला काय देतात या दृष्टीनें विचार केला तर कांहीं नाहीं असेंच म्हणावें लागतें. गेलीं सहा सात वर्षें सारखी ओरड चालली आहे कीं बजेट सुधारा, पण त्याचा आतांपर्यंत कांहींही उपयोग झालेला नाहीं. प्रजेची टॅक्सिंग कपॅसिटी ( कर देण्याची पात्रता ) पाहिली तर हें बजेट निव्वळ दिवाळखोरीचें आहे. याचें कारण, हें बजेट नोकरशाहीनें केलेलें आहे व तें नोकरशाहीच्या हिताच्याच दृष्टीनें केलेलें आहे. हें बजेट लोकनियुक्त मंत्र्यांनीं केलें असतें, तर खात्रीनें तें लोकांच्या हिताचें झालें असतें. दिवाळखोरीचें झालें नसतें.

दुसरी गोष्ट. कालच अर्थसचिवांनीं आपल्या भाषणांत हें बजेट तुटीचें असल्याचें व त्याबद्दल नवीन कर कोणते बसवावे याबद्दल विचार करीत असल्याचें सांगितलें. पण माझें त्यांना सांगणें आहे कीं आतां कराची भाषा बोलूं नका. आधींच प्रत्येक माणसांना आठ रुपये कर द्यावा लागत आहे हा जास्त आहे. आणखी कर वाढविण्याची भाषा बोलूं नका. ह्या करवाढीमुळेंच लोकांना स्वराज्य पाहिजे असें वाटतें. खरोखर विचार केला असतां माझ्यासारखीं माणसें स्वराज्य पाहिजे असें म्हणणार नाहींत. मला स्वराज्य नको; सुराज्य पाहिजे.

रा. सा. महाबळः—तसा ठराव आणा.

स. स. देवधरः—तो प्रश्न निराळा आहे. स्वराज्य पाहिजे अशा मताचा मी असतों तर काल जे सन्मान्य सभासद सभागृहांतून उठून गेले त्यांचेबरोबरच मीही बाहेर पडलों असतों. अशा तऱ्हेनें जी जनता आहे ती आज स्वराज्य मागत आहे. ही जनता स्वराज्य कां मागत आहे ? जर आपले लोक तेथें असतील तर आपल्याला कांहीं तरी मिळेल. आणि

म्हणूनच त्यांना आज स्वराज्य पाहिजे असें वाटतें. गेलीं सहा वर्षे आम्ही ओरडलों कीं, बजेट सुधारा. गेल्या सहा वर्षांत बजेटमध्यें कांहीं रयतांच्या दृष्टीनें सुधारणा झाली असती, तर त्यांना स्वराज्य मागण्याची इच्छा (Ambition) झाली नसती. अशा स्थितींत रा. ब. फडणीसांचें लक्ष उत्पन्न वाढविणेकडे आहे ही खेदाची गोष्ट आहे. मी म्हणतों खर्च कां वाढला ? अलिकडे स्टँपस् व कोर्ट फी वाढली. इन्कमटॅक्स वाढला. वाढलेल्या कोर्टफीमुळेंच लोक दावे वगैरे कमी दाखल करतात व अशानेंच पुन्हां उत्पन्न कमी होईल. हें उत्पन्न कसें वाढेल याचें मला सुद्धां उत्तर देतां येत नाहीं व रा. ब. फडणीसांनींही हें उत्पन्न वाढविणेचे भरीस न पडतां खर्चांतच काटकसर करावी असें माझें त्यांना सांगणें आहे. लोकलफंडावरून जमीनबाब चार लाख होते व जमिनबाबीचा आंकडा मात्र ४ लाख ८० हजार हा फुगवून मांडला आहे. कालच स. स. नाडगीर यांनीं उंदरांची संख्या वाढली असून त्यामुळें शेतीस फार उपद्रव होतो अशी तक्रार केली आहे. अशा स्थितींत जमीनबाब इतकी वसूल होईल काय याचा विचार करावा. याप्रमाणें जवळ जवळ दोन लाख हा आंकडा फुगवून दाखविला आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—यांतून सुमारें १३६००० रुपयेपर्यंत सुटीची रकम आहे. पान १७ वर सुट खर्च म्हणून १९२६००ची सुट आहे. यंदाचें बजेट करतांना मागील बाकी वसूल होईल असें मुळींच न धरतां मीं हें बजेट केलें आहे.

रा. सा. महाबळः—लोकलफंडावरून हा हिशेब करून जुळणार नाहीं. कारण हा लोकलफंड इनाम जमिनीवरचाही आहे.

स. स. देवधरः—यंदा जमेच्या बाजूनें विचार करतांना पूर्वीच्या बाकीची एक पैही विचारांत घेतलेली नाहीं असें रा. ब. फडणीसांनीं आतांच सांगितलें. पण एक लाखाची तूट भरून काढण्याकरितां पैसा कोठून येतो आणि तो खर्च केला जातो हें आपल्याला विचारावेसें वाटतें. पण याचें उत्तर १९३६–३७ च्या बजेटमध्यें सांपडतें. १९३६–३७ सालच्या बजेटच्या १५व्या पानावर ह्याचें उत्तर आहे. आपल्या ऐपतीप्रमाणें हें बजेट नसल्याकारणानें हें दिवाळखोरीचें झालें आहे. आंकडेमोड मागीलप्रमाणें नवीन कागदावर आहे इतकेंच. इन्कमटॅक्सचें उत्पन्नही यापुढें वाढणार नाहीं. गहाणाचे व्यवहार लोक आपआपसांत भागवतील. फॉरेस्ट खात्यांचें उत्पन्नसुद्धां यापुढें कमी होणार आहे. कारण फॉरेस्ट वाढविणेसाठीं आतांपर्यंत कांहींही प्रयत्न झालेले नाहींत. हल्लींचे मक्तेदारी पद्धतीनें फॉरेस्टचा नाश होऊं लागला आहे. फॉरेस्ट नसल्यानें त्याचा पावसावरही परिणाम होईल व आज प्रत्यक्ष होतही आहे. माझे मतें यापुढें फॉरेस्ट राखणें अत्यंत आवश्यक आहे. आम्हांस जाळण्यासाठीं लांकडें नाहीं मिळालीं तरी चालतील. आम्ही तीं बाहेरून आणूं. पण फॉरेस्ट कटाई बंद करा. बापटांच्या कारकीर्दीतल्याप्रमाणें फॉरेस्ट वाढविणेसाठीं प्रयत्न करा. कुंदगोळास फॉरेस्ट नाहीं. तेथें कशी लांकडाची व्यवस्था होते ! तरी फॉरेस्टें रिझर्व्ह करावीं व मक्तेदारी बंद करावी.

मीं आपल्याला सांगितलेंच आहे कीं लोकांची कर देण्याची पात्रता नाहीं. तेव्हां आपण आपलें बजेट सहा लाखांतच बसवूं. सात लाखाचें बजेट आपल्यास नको. आज-

पर्यंतचा काळ कसा तरी गेला. पण प्रत्येक वर्षी अशी एक लाखाची तूट येऊं लागली तर प्रत्येक वर्षी तसलमात व अमानतींतील रकमा नाहींशा होतील. डिपॉझीट रकमा बऱ्याचशा दाखवून हें बजेट तयार केलें आहे. बँकेकडील व्याज मागील खेपेस ८००० दाखविलें होतें परंतु या खेपेस तें ५००० दाखविलें आहे. तरी असा फरक कां समजत नाहीं? अशा कांहीं वाढविलेल्या रकमा असतील त्या कमी करून रा. ब. फडणीसांनीं पुन्हा एकदां बजेट करावें.

आतां हें बजेट सात लाखांचें आहे. पण ह्या सात लाखांपैकीं तीन लाखांबद्दल तर आम्हांस बोलतांच येत नाहीं कारण तो खासगीकडील खर्च आहे. शिवाय तितकीच रक्कम म्हणजे तीन लाख नोकरशाही व पेन्शन वगैरे बाबीकडे खर्च होते व राहिलेली एक लाख रुपये रक्कम—पण तीही सुद्धां—रयतांच्या उपयोगी पडत नाहीं. काल श्रीमंत राजेसाहेबांनीं लवकरच स्वराज्यदानाची देऊं केलेली घोषणा इतक्यांत आम्हांस नको आहे असेंच मी म्हणेन. आमच्या नोकरवर्गाला व आमच्या प्रजेला अद्यापि राज्यकारभाराचें शिक्षण मिळावयाचें आहे. आणि म्हणूनच मी आम्हांला स्वराज्य नको सुराज्य पाहिजे असें म्हणतों. लोकशाहीची घोषणा वाटल्यास पुढें टाका, परंतु बजेट चांगल्या प्रकारें करा. फक्त ग्रामसुधारणेसाठीं दोन हजार रुपयांची प्रोव्हिजन आहे. आपण म्हणतां तितकें उत्पन्न यापुढें वाढणार नाहीं. कारण लोकांची शक्तीच फार कमी झाली आहे. खासगी बाबी सोडल्या तरी ६० टक्यांमध्यें राष्ट्रसंवर्धन अगर प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें यांत कांहींच तरतूद नाहीं. आज मुख्य उत्पन्न शेतीचें आहे. पण शेतीची उत्पादन शक्ति वाढविण्याकडे कांहींच सोय झालेली दिसत नाहीं. शेतीकडे कांहीं तरी लक्ष द्या, उंदरांपासून बचाव करा असें म्हटल्यास फडणीससाहेब म्हणतात " तुम्हीच आपली सोय पाहून घ्या. " ह्या बजेटमध्यें शेती सुधारण्याबद्दल काय तजवीज केली आहे ? लोकांस चांगलें बीबियाणेंसुद्धां मिळत नाहीं. वास्तविक तशी कांहींतरी सोय झाली पाहिजे. लोक अज्ञानी आहेत. त्यांना मार्ग तुम्हीं दाखविला पाहिजे. तुम्ही आमचे नेते व्हा व आम्हांला मार्गदर्शन करा. श्रीमंत राजेसाहेब प्रजेला सुधारणा देण्याच्या खटपटींत आहेत. परंतु इकडे बजेटमध्यें मात्र कांहींच बदल झालेला दिसून येत नाहीं. लोकांचा विचारप्रवाह कोणत्या दिशेकडे आहे हें ध्यानांत धरून पुढील बजेटांत तरी सुधारणा करा. पाऊस येथें अतिशय कमी असतांना सरकारनें या बाबतींत काय तजवीज केली आहे? Irrigation चे प्लॅन करा. लोकांचें पाठबळ मिळवा. त्यांचें म्हणणें समक्ष ऐकून घ्या. आतां पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटसंबंधीं बोलावयाचें तर कोठलाही रस्ता चांगला नसतो. लोकांनीं तक्रार केली म्हणजे कट्टे टाकतात. दुसरे वर्षी कट्टे पसरणेस लागतात. खेडेगांवचे रस्ते तर अगदींच वाईट आहेत.

आतां शाळाखात्याकडे वळतों. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होणें आवश्यक आहे. आपण आज जी रक्कम प्राथमिक शिक्षणासाठीं खर्च करणार आहांत ती ज्या खेड्यांतील लोक चांगला जामीन देतील व शाळा चालवूं असें म्हणतील त्यांना चांगला जामीन घेऊन दोनशें रुपये वर्षाकाठीं देण्यास हरकत नाहीं. आमच्याकडे असें सांगणारे पुष्कळ लोक

आले. ज्या लोकांचे अशा ग्रँटसाठीं अर्ज येतील त्यांचेकडून जामीन घेऊन त्यांना ग्रँट द्यावी व अशी पद्धत चालू ठेवावी.

आतां पोलिस खात्याकडे वळतों. पोलिस खातें कार्यक्षम नाहीं. पोलिसांना कायद्याचें कांहीं सुद्धां ज्ञान नाहीं. पोलिसांनासुद्धां शिक्षणाची आवश्यकता आहे. त्यांचें वर्तन चांगलें पाहिजे. अर्धांगी बोलपटास २५ पोलिस हजर व इतके पोलिस कशासाठीं तर म्हणे प्रोटेक्शनसाठीं. पण हें प्रोटेक्शन कोठपर्यंत? आपण रात्रीं बारा वाजतां माझ्याबरोबर या. ह्या अर्धांगीचे प्रकार काय चालतात तें दाखवितों. ज्यांना कायदासुद्धां कळत नाहीं असें पुष्कळ शिपाई आहेत. तेव्हां त्यांना कार्यक्षम बनवा. खानसाहेबांना इतर गोष्टी मात्र ऐकूं येत नाहींत. पण नेमकी चोरी झालेली ऐकूं येते.

रा. ब. दिवाणसाहेब:—वैयक्तिक बोलूं नका.

स. स. देवधर:—मी त्यांचेवर टीका करीत नसून त्यांचें गुणगौरवच गात आहे. त्यांना नेमका चोरीचाच तेवढा सुगावा लागतो ही गोष्ट वाखाणण्यासारखी आहे. तुम्हीं नोकर आहांत सरकारचा पैसा घेतां. तुम्ही योग्य रीतीनें लोकांशीं वागलें पाहिजे. सरकारनें निरनिराळी प्रजा निरनिराळया अंमलदाराच्या ताब्यांत दिली आहे. त्या सर्वांकडे सारख्या रीतीनें पाहिल्यास तंटे होणारच नाहींत. कुंपणानेंच शेत खाऊं नये. पोलीसांच्या लीलेबद्दल बऱ्याच तक्रारी हल्लीं ऐकूं येतात. जितके गुन्हे कमी तितके पोलिसखातें कार्यक्षम. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनीं या गोष्टींकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. आतां खर्चाचें दृष्टीनें पाहिलें तर माझें म्हणणें असें आहे कीं खर्चच कमी करा. निदान तूर्त तरी कांहीं खात्यांतील खर्च कमी करा. उदाहरणार्थ, विद्याखातें, बँडमास्तर वगैरे. वर्तमानपत्रांतून आपलें नांव झळकण्याकडे लक्ष देऊं नका. वर्तमानपत्रवाले एकतर्फी असतात. आज जनतेला काय पाहिजे याचा विचार करा. ते स्वराज्य मागत नाहींत. त्यांना सुराज्य पाहिजे. आपण त्यांच्या मागण्यांकडे लक्ष दिलें नाहीं तर ह्या ॲसेंब्लीचा उपयोग काय? आतां काटकसर कशी करावी हा प्रश्न आहे. परंतु आपण आपला पगार कमी करून घेतला पाहिजे. नामदार बाळासाहेब खेर व ना. लठ्ठे यांच्यासारखे पगार कमी करून तुम्ही घेतले पाहिजेत. रा. ब. दिवाण साहेबांनीं २०० रु. पगार घ्यावा. त्याचप्रमाणें मोठमोठ्या अम्मलदारांनीं आपले पगार कमी करून घ्यावे. मी बजेटावरच चर्चा केली आहे असें नाहीं. तर दरबारनें सर्वसामान्य धोरण कसें ठेवावें, यासंबंधींहि बोललों आहे. शेवटीं पुन्हां एकदां रयतांच्या इच्छा, आकांक्षा काय आहेत याचा विचार करून त्याप्रमाणें वागा अशी सूचना देऊन मी माझें बराच वेळ लांबलेलें भाषण संपवितों.

## स. स. मंडी यांचें कानडा भाषण

स. स. मंडी:—स. स. देवधर यांनीं बजेटसंबंधीं बरीच चर्चा केली आहे. मी फक्त पांचच मिनिटें बोलणार आहे. ह्या बजेटमध्यें खातें ३० अ मध्यें ग्रामसुधारणेकडे २००० रु. रक्कम धरली आहे. इन्कमटॅक्स बसवितेवेळीं लोकहितासाठीं उत्पन्नाचा अंशतः तरी उपयोग करणेंत येईल असें आश्वासन दिलें होतें. परंतु आजपर्यंत इनकमटॅक्सची किती

तरी रक्कम वसूल झाली असूनसुद्धां लोकहिताच्या दृष्टीनें अत्यंत उपयोगी अशा ग्रामोद्धारासाठीं या बजेटांत २००० रु. च धरले आहेत ! बजेटाचे आंकडे १।२ दिवसांपूर्वी हातांत मिळतात. त्यामुळें तपशीलाचा खोलवर विचार करतां येत नाहीं.

तसेंच पब्लिकवर्क्स खात्यासाठीं ठराविक रक्कम दाखविली आहे. पण कोणत्या कामाकरितां किती रक्कम खर्च होणार याचा कांहींच उल्लेख नाहीं. त्यामुळें विशिष्ट प्रकारचें काम कां झालें नाहीं असा प्रश्न विचारल्यास त्या कामाकरितां चालू सालीं रक्कम शिलकी नाहीं, पुढील वर्षी त्याचा विचार करूं हें ठराविक उत्तर मिळतें. तसेंच कांहीं सडकेवरील नाले व ओघळी यांची बरीच वर्षे दुरुस्ती झालेली नाहीं. जर त्यासंबंधीं प्रश्न विचारले तर तुम्हींच करा अशीं उत्तरें देण्यांत येतात. विधायक कार्यक्रमासंबंधीं विचारलें तर तुम्हींच विधायक कार्यक्रम सांगा असें उत्तर मिळतें. मग तुम्हीं पगार कशाला घेतां ? आम्हींच सर्व करावयाचें जाहल्यास तुम्हीं कशाला ? बनहट्टीच्या दवाखान्यांत औषधास गेलें तर ते म्हणतात ४५० रु. मिळतात. त्यांत जितकें औषध देतां येईल तितकें देतों. ग्रामोद्योगास २००० रु. धरले आहेत. इन्कमटॅक्स मात्र एक लाख आतांपर्यंत वसूल झाला. शेतीसाठीं कांहीं उत्तेजन नाहीं. उंदरांचा नाश करा म्हटलें तर तुम्हींच करा असें सांगण्यांत येतें. त्याला कांहींच औषध मिळत नाहीं. सारा आम्ही देतों म्हणून संस्थानास उत्पन्न आहे. ज्या प्रजेकडून हा सारा वसूल होत आहे त्या प्रजेच्या हितासाठीं यांत कांहींच तरतूद नाहीं. व्यापार खात्याचें उत्पन्न ५००० रुपये आलें आहे. त्याचा उपयोग कोणत्या कामासाठीं केला आहे ? नवीन माग आले त्यास इलेक्ट्रिकची सोय वगैरे करणेकडे उपयोग केलात कां ? उद्योगधंदे चालले नाहींत तर नुसत्या शेतीवर जगणें अशक्य आहे. एकंदरींत हें बजेट बरोबर नाहीं असें माझें मत आहे. तें राष्ट्र-संवर्धक नाहीं. तरी यापुढें बजेट सुधारण्याकडे लक्ष द्या. –

मे. अध्यक्ष:—आतां बजेटावर विरोधी पक्षाकडून झालेल्या टीकेस रा. ब. दिवाण हे उत्तर देतील.

रा. ब. दिवाणसाहेब:—

अध्यक्ष महाराज आणि सन्मान्य सभासदहो,

आतांपर्यंत लोकपक्षांकडील दोघां सन्मान्य सभासदांनीं बजेटावर टीका केली. दोघेही सन्मान्य सभासद वकील असल्याकारणानें व थोडी बोलण्याची अधिक संवय असल्यामुळें दोघांनीहि एक तासभर वक्तृत्व गाजविलें. त्यांनीं वाटेल तीं विशेषणें–विषयाला लागूं असो अगर नसो–दिलीं आणि मधून मधून थोड्या शिव्या तर केव्हां केव्हां स्तुती करून भाषणें केलीं. अर्थात मला तसें भाषण करतां येणार नाहीं. विचार करून बजेटासंबंधीं जें सांगावयाचें तेंच मी सांगेन. प्रथम त्यांनीं मुद्दा असा काढला कीं सात लाख रुपये जमेस कसे येतात. मी माझ्या बजेट नोटमध्यें यासंबंधीं खुलासा केला आहे. पुन्हा एकदां त्याबाबत खुलासा करतों. सन १९४०–४१ सालचें प्रथमचें अंदाजांत कर्ज तसलमात व अमानत शिवाय करून बाकी बाबींपासून उत्पन्न ९५२९९८ रुपये आणि खर्च १०२८४६४ धरण्यांत आलेला आहे.

त्यांतूनहि ३ जमीनबाब लोकलफंड सुटींचे व इनाम उत्पन्नाचे जमाखर्ची आंकडे रुपये (११२०००+९०००+१२४७२२=)–२४५७२२ वजा केले असतांना उत्पन्नाचे व खर्चाचे नक्की आंकडे म्हणजे ७०७२७६ रुपये उत्पन्न आणि ७८२७४२ रुपये खर्च असे आंकडे राहातात.

प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें बजेटांत कांहींच तरतूद नाहीं अशी तक्रार आहे. परंतु या म्हणण्याचा अर्थच काय हें समजत नाहीं. ह्या बजेटामध्यें शिक्षण खात्यासाठीं ८१००० रु. धरले आहेत. वैद्यकीय खात्यासाठीं ३१,००० रु. धरले आहेत. पोलिस खात्यासाठीं ६५,१२६ इतक्या रक्कमेची तरतूद आहे ती कशासाठीं ? शिक्षणखातें लोकांसाठीं नाहीं काय ? वैद्यकीय खात्यावर होणारा खर्च लोकांच्या उपयोगासाठीं होत नाहीं काय ? पोलिस-खातें लोकसंरक्षणासाठींच आहे ना ? मग हा इतका पावणेतीन लाख रुपयांचा खर्च हा लोककल्याणासाठीं होतो का नोकरशाहीसाठीं होतो ? आज चार वर्षे खटपट करून को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांची स्थापना झाली ती कशासाठीं व कोणासाठीं ? रयत लोकांसाठींच ना ? जेथें लोकांची सहानुभूति तर नाहींच, परंतु तीव्र विरोध आहे तेथें को-ऑपरेटिव्ह सोसायटीची योजना दरबारनें हातीं घेतली ती कशासाठीं ? टीका करतांनासुद्धां ती योग्य वस्तुस्थितीला धरूनच केली पाहिजे. विध्वंसक टीका केव्हांहि उपयोगाची नाहीं.

मे. अध्यक्षः—आतां ठरावांस सुरवात करावी.

### रावसाहेब महाबळ यांचा ठराव

रा. सा. महाबळः—मी एक लहानसा ठराव आतां मांडणार आहें. तो मी वाचून दाखवितो.

**ठराव नं. २ :**—"Government of India Act No XXII of 1939 (An act further to amend the Indian Penal code and the Code of Criminal Procedure 1898.) इं. पि. कोड कलम १७६ सुधारण्याबाबत व क्रि. प्रो. कोड कलम ५६५ सुधारण्याबाबत कायदा जरूर त्या फेरफारांसह लागू होईल त्या अंशानें तारीख १–१०–४० पासून या संस्थानास लागू करावा अशी श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांना हें मंडळ शिफारस करीत आहे.

अध्यक्ष महाराज व सन्मान्य सभासदहो, मी हा ठराव आपणापुढें मंजूर करण्याकरितां मांडला आहे. ब्रिटिश हद्दींत हा कायदा पास झाला आहे. ह्या कायद्याचे स्वरूप अगदीं लहान सहान गुन्ह्यांपुरतेंहि आहे. नागरिकांस एखादा गुन्हा घडला असल्याची माहिती झाल्यास ती सरकारला देणें असें मूळ कायद्याचें स्वरूप आहे. जर अशी माहिती दिली नाहीं, तर तो कायदेशीर गुन्हा होतो व तशी माहिती देण्याचें कर्तव्य केलें नाहीं, तर तो गुन्हेगार होतो. म्हणून इं. पि. कोड कलम १७६ मध्यें दुरुस्ती व्हावी. तसेंच क्रि. प्रो. कोड ५६५ मध्येंहि १७६ कलमास अनुसरून दुरुस्ती व्हावी.

इं. पि. को. कलम १७६ हें एकच ब्रिटिश इंडियांत लागू आहे. कोणीहि गुन्हा घडला असल्याची माहिती चुकवूं नये म्हणून तें कलम आहे. तरी आपण हा ठराव मंजूर करावा अशी विनंति आहे.

मे. अध्यक्षः—ह्या ठरावास दुजोरा लागत नाहीं. ह्या ठरावास कोणाचा विरोधही असण्याचें कारण नाहीं. म्हणून मी हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

### रा. सा. महाबळ यांचा ठराव नं. १

ठराव नं. १:—Government of India act No XXXIX of 1939. ( An Act further to amend the India Oaths Act 1873. ) शपथा घेणेंबाबत इ. स. १८७३ च्या ॲक्टाचें कलम ५ सुधारण्यांबाबतचा कायदा जरूर त्या फेरफारांसह लागू होईल त्या अंशानें ता. १।१०।४० पासून या संस्थानांत लागू करावा अशी श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांना हें मंडळ शिफारस करीत आहे.

रा.सा.महाबळ—हें कलम लहान मुलांचे बाबतींत आहे.लहान मुलें पुराव्यासाठीं कोर्टांत आणलीं म्हणजे कायद्याप्रमाणें त्यांना शपथ घ्यावी लागते. मी ईश्वरासमक्ष खरें बोलेन अशी शपथ त्यांना घ्यावयास सांगितली तर तीं फार बावरतात. वास्तविक लहान मुलांची सदिच्छा व प्रवृत्ति खरें बोलण्याकडे असते प्रत्येक खटल्यांत लहान मुलांचे पुरावे असतील तर ते खटले पुष्कळ अंशीं यशस्वी होतील. परंतु अशी शपथ घेतल्याशिवाय पुरावा अग्राह्य समजला जातो. हें ब्रिटिश हद्दींत कलम लागू आहे. शपथ न घेतां झालेला पुरावा अग्राह्य धरला जातो तो ग्राह्य धरला जावा अशी कलम ५ मध्यें दुरुस्ती व्हावयाची आहे. पुष्कळ वेळां लहान मुलांच्या साक्षी घ्याव्या लागतात. तेव्हां ही त्यांचे बाबतींत शपथ घेण्याची अडचण राहूं नये म्हणून हा ठराव मांडला आहे. तरी तो आपण मंजूर करावा अशी विनंति आहे.

मे. अध्यक्ष:—ह्या ठरावासहि कोणाचा विरोध असण्याचें कारण नाहीं. मी हा ठराव पास झाल्याचें जाहीर करतों.

## उपाहारानंतर

### स. स. व्यंकटेश राजाराम देवधर यांचें भाग-लावणी कायद्याचें बिल.

### बिल नं. २

स. स. देवधर:—मी आपणापुढें आतां भागलावणी कायद्याचें बिल मांडणार आहे. या बिलाचा उद्देश वरिष्ठ व कनिष्ठ धारण करणार यांचेमधील नातें सलोख्याचें राहावें हा आहे. दरसाल लावणी रोख घेण्यानें शेतकऱ्यास शेतींत काम करण्यास उत्तेजन मिळत नाहीं. बहुतेक जमिनी Absent landlords कडेच आहेत व या जमिनी बहुतेक पडीक पडलेल्या दिसतात. याचें कारण कुळास सदरहू जमिनींबद्दल आपलेपणा वाटत नाहीं. ह्या कायद्यामुळें लोकांना धंदा मिळेल व ग्रामसुधारणेस उपयोग होईल. लोक बाहेर गांवीं गिरण्यांतून वगैरे कामास जातात. कारण शेतीपासून त्यांना कांहीं फायदा होत नाहीं. हल्लींच्या परिस्थितीमुळें १६ एकर जमिनीस दोन बैल इतकेंसुद्धां प्रमाण पडत नाहीं. म्हणून खेडूतांची स्थिति सुधारावी म्हणून हें बिल मांडीत आहे. ह्यापूर्वीं हें बिल मांडलें होतें परंतु लोकांनीं त्याला विरोध केला व त्यामुळें तें पास होऊं शकलें नाहीं. परंतु आजचा काळ निराळा आहे. इंग्लंडमध्यें पहा. प्रत्येक मनुष्य आपल्या गांवाकडे जातो. प्रत्येक गांवाला राजधानीचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. या बिलानें साक्षरता प्रसार होईल, खेडुतांशीं जास्त संबंध वाढेल. खेड्यांशीं संबंध आल्यामुळेंच इंग्लंडची सुधारणा झाली आहे. आपण

या बिलामुळेंच शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्यासारखें होणार आहे. आतां मी हें बिल आपणांस वाचून दाखवितों.

## भाग-लावणी कायद्याचें बिल

ज्यापेक्षां धारणीचें मान एकदम फार कमी झालेवेळीं कुळांनीं त्या मानानें लावणी रकमेंत फरक न केल्यामुळें लावणीनें जमिनी करणाऱ्या कुळांची स्थिति फार हलाखीची झाली आहे, व ज्याअर्थी शेतकऱ्यामध्यें जास्त कर्जबाजारीपणा वाढत असून त्यांना शेतकीची उत्पादनशक्ति थोड्याफार अंशानें देखील वाढविणें आर्थिक परिस्थितीमुळें अशक्य झालें आहे व समाजाचे हिताचें दृष्टीनें व कुळांची स्थिति सुधारावी म्हणून कायदा करणें हल्लींच्या स्थितींत इष्ट व जरूर वाटत आहे, त्यापेक्षां खालील कायदा संस्थान मजकुरीं लागू करणेंबद्दल श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांचे हुजुरांस शिफारस करणेंत येत आहे.

या कायद्यास भाग—लावणी कायदा असें संबोधणेचें आहे.

इसवी सन १९४०–१९४१ चे व पुढील होणाऱ्या लावणी करारांना व कबुलायतींना हा कायदा संस्थानपुरतां लागू असणेचा आहे.

### या कायद्यापुरत्या व्याख्या.

( अ ) कूळ म्हणजे स्वत: अगर दुसऱ्यांबरोबर लोकांच्या जमिनी रक्कम अगर भाग देणेचे करारांवर लावणीनें घेणारा एक अगर अनेक इसम.

( ब ) मालक म्हणजे जमीन धारण करणारा अथवा आपली जमीन स्वत: अगर गड्यांमार्फत न करतां दुसऱ्यांस लावणीनें देणारा अगर देणारे ती जमीन त्याचे अगर त्यांचे मालकीची असो अगर दुसऱ्याची त्यानें केलेली असो.

( क ) लावणीपत्र अगर कबुलायत म्हणजे कुळानें मालकाकडून अगर धारण करणाराकडून रोखीचा अगर भागाचा मोबदला देणेचे तोंडीं अथवा लेखीच्या करारावर जमिन पत्करणेचे बाबत केलेला लेखी अगर तोंडी करार.

( ड ) जमीन म्हणजे ज्यांत शेतीचें अथवा बागायतीचें उत्पन्न घेतलें जातें.

( ई ) रोखीनें म्हणजे जमिनींत उत्पन्न होणारे जिनसाव्यतिरिक्त इतर कोणताही जंगम माल अगर दस्त नाण्याचे स्वरूपांत देणेचा करार असणें.

### कलमें

( १ ) कोणीहि मालकानें अगर धारण करणारानें कुळांना जमिनी रोखीचे करारानें लावणीस देणेस हा कायदा लागू झालेनंतर दिल्यास तो करार अंमलांत आणणेस बंदी करण्यांत येत आहे.

( २ ) लावणीचे करार ज्या जमिनींत उत्पन्न होणारें पीक वगैरे हिस्सा देणेघेणेचे करारावरच होणेचा, यापुढें असणेचा आहे.

( ३ ) लावणीचे करारांत जमिनीचे कष्टमशागतीसंबंधानें जे करार ठरतील ते मोडल्यास त्याबद्दलची नुकसानीची रक्कम ठरवितां येईल.

( ४ ) लावणीचे ठरावाचे सुमारास मालक व कूळ यांचे दरम्यान इतर जर कांहीं देणेघेणेचे व्यवहार झाले असतील ते सकृतदर्शनी लावणीपैकींच आहेत असें समजण्यांत येईल.

( ५ ) कुळाचे हिश्शाचे उत्पन्नावर सरकारी साऱ्याची जबाबदारी असणेंची नाहीं.

( ६ ) पीक तयार झालेवर पिकांतील आपला हिस्सा रोखीनें मोबदल्यास देणेघेणेचा करार नंतर करणेचा दोघांसही हक्क आहे.

( ७ ) जमीन एकवार मालकानें हसन करून दिलेवर ती त्याच स्थितींत सोज्वल राखणेची जबाबदारी कुळावर आहे, व त्यानें तशी राखिली नाहीं तर तशी राखणेस लागणारे खर्चाची जबाबदारी कुळावर आहे.

( ८ ) बलुते वगैरे हक्कदारांचे हक्काची जबाबदारी दोघांवर सारखीच राहणेची आहे.

( ९ ) पीक आलेनंतर कुळानें आपला हिस्सा विकला तरी तें पीक तयार करून मालकाचा हिस्सा त्याचे स्वाधीन करणेचा व जमीन पूर्ववत करून देणेंची जबाबदारी विशेष करारचे अभावीं त्याजवरच राहणेची आहे.

( १० ) हा कायदा पुढील पंधरा सालापुरतांच लागूं असणेचा आहे.

या बिलामुळें शेतीची उत्पादन-शक्ति वाढेल. वाटल्यास तूर्त कांहीं खेड्यांपुरताच हा कायदा लागूं करावा. एप्रिल मे महिन्यांत लावणीचे दर शेंकडा २० वाढले. कारण बाजारभाव वाढले. परंतु ही तात्पुरती वाढ असल्याकारणानें लावणी पत्करल्यानंतर ती कायमची शेतकऱ्यांचेवर पडते. आतां हें बिल Introduce करणेंस मी परवानगी मागत आहें.

रा. सा. महाबळ:—हें बिल Introduce करण्याकरितां मंडळापुढें मांडण्यांत आलें आहे. परंतु दरबारतर्फे मी दोन मिनिटें खुलासा करतों. मला व्यक्तिशः सुद्धां या बिलाला विरोध करावयाचा आहे. ह्या बिलानें रयतांचें कांहीही कल्याण व्हावयाचें नाहीं. हा जमिनीचे मालक आणि कुळें ह्यांचा प्रश्न आहे. ह्या बिलामुळें कुळांचा जरी फायदा होणार आहे असें सांगितलें तरी अखेरीस सरकारलाच विचार करावा लागेल. यांत रयतांचा फायदा आहे असें सांगितलें आहे. पण तो कसा होणार हें समजत नाहीं. हा ज्याचा त्याचा व्यक्तिशः प्रश्न आहे. आज हें बिल Introduce करण्यास परवानगी दिली तर तें गॅझेटमध्यें प्रसिद्ध होऊन यावें लागेल. मग त्यावर लोकमत अजमावावें लागेल. तेव्हां इतकें करीपर्यंत हें बिल Introduce करण्यासच परवानगी देऊं नये. ह्या बिलास दरबारतर्फे विरोध आहे.

स. स. शंकरराव आपटे:—जमिनदार व कुळें यांचे असलेल्या हक्कास बाध येईल असा कायदा करणेच योग्य होणार नाहीं. हल्लींचें लावणीचें मान पाहिल्यास मार्च ते मे पर्यंत दर वाढलेले आहेत. फ्रीडम ऑफ कॉंट्रॅक्टवर यामुळें बाध येऊं नये. सावकारापासून होणाऱ्या असह्य त्रासांतून सोडविणेकरितां हें बिल आहे. परंतु आतां या नवीन आणलेल्या बिला-प्रमाणें freedom of contract वर हल्ला कोणत्याहि कायद्यानें आणतां येणार नाहीं. ह्या नवीन बिलानें जमिनींतील उत्पन्न आलें किती हें ठरविणेची मोठी अडचण पडणार आहे. एखादे-

वेळीं कूळ म्हणेल पांच रुपये उत्पन्न आलें तर जमीनदार म्हणेल १० रुपये उत्पन्न आलें. अशी आपत्ति येणार आहे. परंतु हल्लींच्या रोखीच्या कबुलायतीमुळें ही आपत्ति येत नाहीं. ह्या नवीन बिलानें अनवस्था प्रसंग येणार आहे. यासाठीं प्रत्येक जमिनींतील पिकांसाठीं पंचनामे करीत बसावें लागेल. Citizen चा freedom of contract या हक्कावर ह्या कायद्यानें हल्लाच होणार आहे. कोणताहि कायदा केला तरी मूळ करार करण्याच्या हक्कावर गदा येतां कामा नये. ह्या नवीन बिलामुळें सामान्य हक्कांवरहि एक प्रकारची बंदी होत आहे. पीक किती आलें याबद्दल वरचेवर तंटे उत्पन्न होतील. अशा प्रकारचा कायदा कोठल्याहि कायदेमंडळांत आलेला नाहीं. याचे परिणाम दूरवरचे आहेत. याचे अनिष्ट परिणाम रयतेस भोगावे लागतील तरी हें बिल परत घ्यावें अशी माझी विनंति आहे.

स. स. देवधरः—स. स. आपटे म्हणतात त्याप्रमाणें आपत्ति येत नाहीं किंवा freedom of contract वरहि बंदी होणार नाहीं. गहाणाचे दाव्यांत उत्पन्न जास्त आल्याबद्दल रिणकोला पुरावा देतां येतो. ही गोष्ट माझ्या कायद्यासारखीच एक गोष्ट आहे. जमीन मालकांनीं थोडासा स्वार्थत्याग दाखविला पाहिजे. वेळोवेळीं आपल्या जमिनी स्वतः जाऊन पाहिल्यास त्यामुळें तंटे उपस्थित होणार नाहींत. कॉंग्रेस सरकारनें असलें बिल पास केलें आहे. तरी आपणहि हें बिल पास करून आपलाहि मान राखून घ्यावा. यांत कोणाच्याहि हक्कांवर बंधन नाहीं.

मे. अध्यक्ष यांनीं बिल Introduce करणेस परवानगीसाठीं मतें घेतां २ विरुद्ध १६ मतांनीं परवानगी नाकारण्यांत आली.

### स. स. देवधर यांचें 'गहाणऋणको संरक्षण' बिल

### बिल नं. ३

स. स. देवधरः—हें 'गहाण-ऋणको संरक्षण बिल' introduce करणेस परवानगी मिळणेसाठीं मी मांडीत आहे. ह्या बिलास कोणाचाहि विरोध असण्याचें कारण नाहीं. आज प्रजेच्या डोक्यावर ७० लाखांचें कर्ज आहे व आज संस्थानची प्रजा एक लाख आहे. आज बँका वगैरे काढूनहि हें कर्ज फेडणें शक्य नाहीं. सरकारवरहि हा बोजा टाकणें व्यवहार्य होणार नाहीं. तरी अशा अडचणीमध्यें रयत व सावकार यांचेमधील संबंध जास्त चांगल्या रीतीनें राहावेत म्हणूनच मी हें बिल मांडीत आहे. व्याजाची वाढ कायमची बंद राहावी म्हणून हें बिल मांडलें आहे. कधीं तरी आपण मुद्दल दिलें म्हणजे आपली जमीन आपणास परत मिळेल अशी आशा तरी करणेस त्यास जागा होईल.

यामुळें निदान व्याज तरी वाढणार नाहीं. दरसालचे उत्पन्नांतूनच व्याज फिटेल. व्याज देतां न आल्यास ती जमीन सावकारानें घ्यावी अशी यांत सोय आहे. मात्र व्याज त्यापुढें वाढणार नाहीं ही मोठी सोय यांत होणार आहे. शेतकी ॲक्टला पूरक असें हें बिल आहे. मात्र सावकारांना यांत थोडासा स्वार्थत्याग करावा लागेल. कुळांचे बाजूनें थोडेसें नमतें घ्या. हल्लींच्या शेतकी कायद्यानें गहाण रकमेस इंटरेस्ट ॲक्ट लागू नसल्यानें मी हें बिल मांडीत आहे. मी आतां हें बिल आपणांस वाचून दाखवितो.

( बिल वाचतात. )

## गहाणऋणको संरक्षण बिल

ज्याअर्थी संस्थानमजकुरीं गहाणऋणकोची आर्थिक परिस्थिति अत्यंत हलाखीची झाल्यानें व गहाण मिळकतींचे येणारे उत्पन्नांतून गहाण रकमेच्या व्याजाची फेड करून मुद्दलांत फेड करीत जाणें अशक्य दिसत आहे व शेतकरी–संरक्षण कायद्यानें तितकेंसे ऋणविमोचन होत नाहीं त्याअर्थी ज्यास्त गतीनें ऋणविमोचन होण्यास खालीलप्रमाणें कायदा करण्यांत यावा, अशी शिफारस हें मंडळ श्रीमंत राजेसाहेब सरकार यांना करीत आहे.

सदर कायदा श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं मंजूर केल्यातारखेपासून संस्थानांतील स्थावर मिळकतीचे सर्व प्रकारचे गहाणाचे व्यवहारांस लागूं करणेचा आहे, व या कायद्यास त्या सालचा नंबरचा कायदा म्हणण्याचा आहे.

( १ ) कोणीही गहाण ऋणकोनें आपली तारण म्हणून लिहून दिलेली इस्टेट सावकारांस कबजांत घेणेबद्दल लेखी नोटिसीनें कळविल्यास ती मिळकत सावकारानें आपल्या ताब्यांत घेतली पाहिजे व तशी ऋणकोनें त्याचे ताब्यांत दिल्यापासून सदर गहाण मिळकतीवरील असलेल्या त्या सावकाराचे बोजाचे व्याज बंद करणेंचे आहे व त्या नंतरचे उत्पन्नाबद्दल तो हिशोब देणेस जबाबदार नाहीं.

( २ ) गहाण इस्टेट जर जमीन असेल तर ऋणकोनें त्या जमिनीचा कबजा घेणेबद्दल कोणत्याहि सालचे पाडव्यापूर्वीं एक महिना सावकारास नोटीस देऊन चैत्र पौर्णिमेस कबजा सोडणेचा आहे. या व्यतिरिक्त ताब्यांत दिल्यास त्या वर्षापुरता व्याजबंदीचा फायदा मिळणेचा नाहीं.

( ३ ) गहाण इस्टेटी इमारत, खुलीजागा वगैरे असेल तर पूर्ण एक महिन्याची ताब्यांत घेणेबद्दल सावकारास नोटीस मिळाली पाहिजे व मुदतींत प्रत्यक्ष कबजा सावकारास सोडलेनंतरच व्याज बंद होणेचें आहे.

( ४ ) गहाण मिळकत झाडें वगैरे असल्यास सदर झाडास येणाऱ्या उत्पन्नाचे मोसमाचे पूर्वी ४ महिने सावकाराचे ताब्यांत देणेबद्दल नोटीस देऊन प्रत्यक्ष कबजा सोडला तरच व्याजबंदीचा नियम त्यास लागूं होणेचा आहे.

( ५ ) ऋणकोनें सदर कायद्यान्वयें गहाण मिळकत सावकाराचे कबजांत दिलेनंतर त्यास सदर मिळकत सदर गहाणाची सर्व फेड होईपावेतों परत मिळणेंची नाहीं. तशी फेड हुकुमानामेनें ठरविली जावी अथवा शेतकी संरक्षण कायद्यानें ठरविली जावी.

( ६ ) कोणत्याहि सावकाराचे ताब्यांत गहाण मिळकत या कायद्यान्वयें अथवा अन्य कायद्याअन्वयें असेल तर त्या मिळकतीवरील असलेले सरकारी करांची यापुढील जबाबदारी दस्तांत सदरबदल कोणत्याही स्वरूपाचा करार असला तरी सावकारावर बसणेची आहे.

( ७ ) कोणत्याही गहाणाचे बाबतींत सावकाराचे ताब्यांत गहाण मिळकत गेलेनंतर त्यानें आपली सदर गहाणाबाबत सर्व रक्कम त्या गहाण मिळकतीवरच वसूल करून घेणेची आहे. इतर इस्टेटीवर अथवा जातीवरच वसूल करून घेणेचा अधिकार नाहीं.

( ८ ) या कायद्याचे कलमाव्यतिरिक्त इतर बाबतींत प्रचलित असलेल्या कायद्याचे नियमांस बाध येणेचा नाहीं.

रा. सा. महाबळः—आपण सांगतां एक, लिहितां एक. आपण शेतकी ॲक्ट पास करून घेतला आहे. त्यांत सर्व व्यवस्था उत्तम तऱ्हेनें असतां अशा प्रकारचें अव्यवहार्य बिल मंडळापुढें आणणेंच मुळीं चुकीचें आहे. हें बिल अत्यंत निरुपयोगी आहे.

स. स. देवधरः—वाटल्यास थोडीफार सुधारणा करा.

रा. सा. महाबळः—ह्या बिलांत आहेत हीं सगळीं कलमें काढून टाका.

स. स. देवधरः—ह्यांत आपण थोडेसें नमतें घ्या. आपण आमचे नेते आहांत. शेतकऱ्याला आपली व्यवस्था करतां येत नाहीं. शेती हा राष्ट्रसंवर्धक धंदा आहे. आपण थोडासा स्वार्थत्याग दाखविला तर खेडूतांचें कल्याण होण्यासारखें आहे.

रा. सा. महाबळः—शेतकी ॲक्टमध्यें सर्व व्यवस्था उत्तम तऱ्हेनें आहे.

स. स. देवधरः—शेतकी ॲक्टमध्यें इंटरेस्ट ॲक्ट लागू नाहीं. या बाबतींत रावसाहेब सरन्यायाधीश सांगतील. कारण त्यांनीं कांहीं निकाल दिलेले आहेत.

रा. सा. सरन्यायाधीशः—सर्व सामान्य बिल पाहिलें तर बिलाचे उद्देश उत्तम आहेत. पण सुचविलेल्या बिलानें तो उद्देश सफळ होणार नाहीं. ह्या कायद्यानें कोणासही त्याचा फायदा घेतां येईल. मग शेतकरी असो अगर नसो. शेतकी कायद्यास पूरक म्हणून हें बिल त्यांनीं आणलेलें आहे. शेतकी ॲक्टांत व्याजाबद्दल कमी जास्त करणेस अधिकार आहेच. पण यामुळें दुहेरी फायदा घेणेचा यांच्या बिलांत हेतु आहे. प्रत्येक सावकार कांहीं शेतकरीच असत नाहीं व ह्या बिलानें जमीन ताब्यांत घेतल्यावर त्यासाठीं त्यास मुद्दाम कलम ठेवावें लागेल.

शेतकी ॲक्ट कलम १४ मध्यें कांहीं सोय उभयतांचे सवलतीनें करावी अशी व्यवस्था ठेविलीच आहे. याप्रमाणें रयतांस फायदा करून घेतां येतोच. पण या बिलानें सावकारावर केवळ सक्तीच केल्यासारखें होणार आहे. उत्पन्न नसलें तरी ती जमीन त्याचेवर लादावयाचीच. शिवाय contract of freedom वरही एक प्रकारें बंधनच येणार आहे. तरी बिल आणतेवेळीं संपूर्णतः विचार करून मांडलें असतें तर चांगलें झालें असतें.

स. स. देवधरः—या बिलाचें तत्त्व मान्य करा. मग तपशिलांत फरक करतां येईल. शेतकी ॲक्टमुळें इंटरेस्ट ॲक्ट लागू होत नाहीं. हल्लींच्या शेतकी ॲक्टनें कुळास पैसा मिळेनासा झाला आहे. रयतांस पैसा मिळणेस कांहीं तरी तरतूद व्हावी म्हणून हें बिल मांडलें आहे तरी हें Introduce करण्यास परवानगी द्यावी अशी विनंति आहे.

मे. अध्यक्ष:—मी ह्यावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं बिल Introduce करणेस परवानगीसाठीं मतें घेतां २ विरुद्ध १६ मतांनीं परवानगी नाकारण्यांत आली.

मे. अध्यक्ष:—स. स. देवधर यांनीं नरेंद्रमंडळांत कायमची जागा मिळाल्याबद्दल श्रीमंतांचे अभिनंदनाचा ठराव व टाईमस्केल चालू केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव असे मांडलेले दोन्ही ठराव पास झाल्यावर ते श्रीमंत राजासाहेब यांचेकडे पाठविले होते ते स्वीकारल्याबद्दल श्रीमंत राजेसाहेबांकडून पत्रें आलीं आहेत तीं सेक्रेटरी वाचून दाखवितील.

[ सेक्रेटरी पत्रें वाचतात. ]

( परिशिष्ट नं. ३ व ४ पहा )

त्यानंतर स. स. देवधर यांनीं आपलें शेतकी-कायदा-दुरुस्ती बिल Introduce करण्यास परवानगी मिळणेकरितां पुढें मांडलें.

## स. स. देवधर यांचें शेतकी कायदा दुरुस्ती बिल नं. ४

स. स. देवधर:—हल्लीं संस्थान मजकुरीं जो शेतकी अॅक्ट चालूं आहे, त्यांत कांहीं दुरुस्ती सुचविणेसाठीं हें बिल आहे. हा कायदा पास झालेनंतर गेल्या एक वर्षाच्या अनुभवानंतर ज्या कांहीं अडचणी उपस्थित होऊं लागल्या त्याचा पूर्णपणें विचार करून त्या सुधारून घेण्यासाठीं हें बिल मीं आणलें आहे. हल्लींच्या शेतकी कायद्याप्रमाणें ८ हप्ते देतां येतील असें आहे, त्याऐवजीं १६ पर्यंत हप्ते देणेचा अधिकार आहे अशी दुरुस्ती व्हावी. कारण interest aet चा फायदा मिळत नाहीं. तसेंच केवळ ४०० रु. उत्पन्न आहे येवढ्यानेंच तो शेतकरी नाहीं असें न म्हणतां ८०० रु. उत्पन्न असा आंकडा घालावा. बाहेरचें उत्पन्न असलेल्या मनुष्याचें उत्पन्नही यावेळीं विचारांत घेऊन बाहेर जर तो शेतकरी असेल तर त्यास येथेंही शेतकरी ठरवावें. व्याजाबद्दल कोर्टाचे डिसक्रीशनवर ठरविणेंत आलें आहे तें दरसाल दर शेंकडा ६ टक्के व्याज आकारावें. आतां मी आपणांस बिल वाचून दाखवितों.

( बिल वाचतात. )

## संस्थान मजकुरीं लागू असलेला शेतकी कायदा दुरुस्ती बिल

( १ ) शेतकी कायदा कलम मध्यें ८ हप्ते देतां येतील, त्याऐवजीं १६ पर्यंत हप्ते देणेचा अधिकार आहे, अशी दुरुस्ती व्हावी.

( २ ) शेतकी कायदा कलम यांतील ४०० रुपये ऐवजीं ८०० असा आंकडा घालावा.

( ३ ) नवीन नंतरचें कलम घालून संस्थान हद्दींतील शेतकी उत्पन्न व परहद्दींतील शेतकी उत्पन्न यामध्यें फरक ठेवणेचा नाहीं.

( ४ ) नवीन कलम घालून शेतकी अॅक्टाप्रमाणें घेण्यांत येणाऱ्या हिशोबाचे कामीं अथवा दाव्याचे अथवा अर्जाचे कामीं दरमहा दरशेंकडा ६ रुपये व्याज या अॅक्टानें आकारण्यांत येईल.

वरीलप्रमाणें १-२ ज्या त्या कलमांत दुरुस्ती म्हणून सामील करण्यांत यावींत व ३-४ हीं नवीन कलमें घालून ॲक्ट दुरुस्त करणेंत यावा अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब यांना विनंति आहे.

रा. सा. महाबळः—गेल्या वर्षीच शेतकी ॲक्ट पास झाला आहे. त्यापूर्वी सिलेक्ट कमिटी नेमली होती. सिलेक्ट कमिटींत आपण सर्वजण होतों. त्यांत स. स. आपटेही होते. अखेरीस स. स. देवधर यांनीं सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टास भिन्न मतपत्रिकाही जोडली आहे. आतां स. स. देवधर यांनीं सुचविलेल्या दुरुस्त्या स. स. आपटे यांनीं सिलेक्ट कमिटींत सुचविल्या होत्या. स. स. आपटे यांचें म्हणणें ५०० रु. उत्पन्न धरावें असें होतें. तडजोडीनें ४०० रु. उत्पन्न ठरविलें. स. स. आपटे यांचें म्हणणें १० हप्तेपर्यंत असें होतें पण अखेरीस ८ हप्ते ठरले व आतां १६ पर्यंत स. स. देवधर म्हणतात.

साक्षात् धंदा करणारा तो शेतकरी असें त्यावेळीं ठरविणेबद्दल विचार जाहला होता. आतां ब्रिटिश हद्दींतील उत्पन्न पाहून तो शेतकरी आहे किंवा कसें हें ठरविण्यानें अनवस्था प्रसंग येईल. आपण आपल्या हद्दीपुरतेंच पाहाणें बरें. तरी ह्या सर्व कलमाबद्दल वादविवाद होऊन पास झालेल्या कायद्यांत आतां ढवळाढवळ करूं नये असें मला वाटतें. यापूर्वी पांच पांच हप्ते दिलेले असतांना फेड न झाल्यानें पुन्हा हप्तेबंदी मागतात व दिली जाते. माझे मतें ह्या कायद्यांत बदल करण्याची इतक्यांत घाई करूं नये, आणखी कांहीं दिवस जाऊं द्या. मग त्यांत काय अडचणी उपस्थित होतील त्याप्रमाणें बदल करतां येईल. तरी हें बिल introduce करण्यास परवानगी देऊं नये अशी विनंति आहे. आपलें मत बदलण्याला कारण काय झालें हें समजत नाहीं. या बिलानें निर्वाह होत नाहीं का? आपण हें बिल मांडण्याच्या भानगडींत पडूं नये.

मे. अध्यक्षः—मी ह्यावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं बिल introduce करणेस परवानगीसाठीं मतें घेतां २ विरुद्ध १६ मतांनीं परवानगी नाकारण्यांत आली.

मे. अध्यक्षः—आतां ठराव घ्यावे.

### स. स. नाडगीर यांचा ठराव

**ठराव २ राः**—संस्थान मजकूरच्या खेड्यांची सुधारणा होणें अत्यंत जरूर आहे. त्यासाठीं जमखंडी दरबारनें एक ग्रामोद्धार–योजना सत्वर आंखून ती अंमलांत आणावी, व त्याकरितां दरसाल कमीत कमी दहा हजार (१००००) रुपये. खर्च करावा अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना शिफारस आहे.

हा ठराव मांडण्याचा उद्देश येवढाच कीं, जे शेतकरी लोक आहेत त्यांच्या खेड्याची सुधारणा होणें आवश्यक आहे. आज खेड्यांतून पाहिले तर रस्तेसुद्धां नीट नाहींत. तरी तशी सुधारणा होणेसाठीं दहा हजार रुपयांची व्यवस्था व्हावी म्हणून हा ठराव आहे.

स. स. देवधरः—माझा या ठरावास दुजोरा आहे. हल्लींचें जें बजेट आहे त्यांत दोन हजार रुपये ग्रामोद्धारासाठीं धरलेले आहेत. एकंदर संस्थानची प्रजा एक लाख आहे व

ती बहुतेक खेड्यांतूनच आहे. तेव्हां निदान त्यांच्या सुधारणेसाठीं दहा हजार रुपयांची प्रोव्हिजन बजेटमध्यें होणें आवश्यक आहे. आज ग्रामोद्धारासाठीं दहा हजार रुपये खर्च केले तर त्याप्रमाणेंच दहा हजार रुपये संस्थानचें उत्पन्नही वाढेल. तरी ह्या ठरावास कोणीही विरोध करूं नये. तो मंजूर करावा अशी विनंति आहे.

रा. ब. दिवाणसाहेब:—या बाबतींत दरबारचें सहानुभूतीचेंच धोरण आहे. तथापि एकंदर बजेट तुटीचेंच असल्यामुळें दहा हजार रुपये इतकी रक्कम स. सभासद विनंति करतात त्याप्रमाणें ग्रामोद्धारासाठीं देतां येणार नाहीं. तेव्हां स. स. नाडगीर ह्यांनीं हा ठराव परत घ्यावा.

स. स. नाडगीर:—हा ठराव मागें कां घ्यावा ? हा ठराव मतास टाकावा.

रा. ब. दिवाणसाहेब:—आज हा ठराव पास झाल्याबरोबर त्यासाठीं दहा हजारांची बजेटमध्यें प्रोव्हिजन पाहिजे. पण तशी प्रोव्हिजन होण्यासारखी आजची स्थिति नाहीं.

स. स. नाडगीर:—दरबारनें त्यांत इंटरेस्ट घेतलें तर सर्व कांहीं होईल.

रा. ब. दिवाणसाहेब:—हा ठराव आज पास करून घ्यावा असा आपला आग्रहच असेल तर मला नाइलाजानें त्याला विरोध करावा लागेल.

स. स. देवधर:—दहा हजारांच्या ऐवजीं पांच हजारांचा आंकडा घालून ठराव पास होऊं द्यावा.

रा. ब. दिवाणसाहेब:—आज आंकडा घालून घेण्याचें बंधन मी घालूं शकत नाहीं. वाटल्यास ठराव मतास टाकावा.

मे. अध्यक्ष ह्यांनीं ह्या ठरावावर मतें घेतां ३ विरुद्ध १३ मतांनीं हा ठराव नापास झाला.

## स. स. देवधर यांचा ठराव

**ठराव नं. ४:**—कुंदगोळ तालुक्यांत सर्वसाधारण कायमची पिण्याच्या पाण्याची व इतर सांडपाण्याची टंचाई असते. अशासाठीं, ती अंशतः तरी दूर व्हावी म्हणून दरसाल बजेटमध्यें ४००० रु. ची तरतूद करणेंत येऊन दरवर्षी पाण्याची जास्त सोय व्हावी म्हणून सदर रक्कम खर्च करणेंत यावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे हुजुराकडे विनंति आहे.

रा. सा. पुराणीक:—यंदाच २७०० रुपयेपर्यंत यासाठीं खर्च जाहले आहेत. तेव्हां ह्या ठरावास विरोध करण्याचें कारणच नाहीं.

मे. अध्यक्ष:—यास कोणाचा विरोध नाहीं म्हणून हा ठराव सर्वानुमतें पास झाल्याचें जाहीर करतों.

## स. स. मंडी यांचा ठराव

**ठराव नं. २:**—हल्लीं दुर्मरणाचें प्रेत संशय नसतांना देखील 'पोस्टमार्टम' करण्यांत येत आहे. यामुळें पुष्कळांना विनाकारण त्रास होत आहे. संशय नसलेबद्दलचा जबाब झालेल्या

आतांचें सांगणेवरून असल्या दुर्मरणाचीं प्रेतें 'पोस्टमार्टम' न करितां त्यांच्या आप्त लोकांना त्या प्रेताचा अंत्यविधि करण्यासाठीं परवानगी देण्यांत यावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना मागणी आहे.

स. स. मंढी:—माझा असा अनुभव आहे कीं बनहट्टीस दरसाल २०।२५ माणसें दुर्मरणानें मरतात. अशीं सर्व प्रेतें पोस्टमार्टमसाठीं डॉक्टरकडे नेण्यांत येतात. तक्रार नसतांनासुद्धां अशीं प्रेतें पोस्टमार्टमकरितां पाठविण्यांत येतात. माझें म्हणणें मयताच्या बाबतींत संशय असेल अगर तक्रार असेल तर तसें करणेस कांहीं हरकत नाहीं. एकदां एक लोहार वाटेंत हार्टफेल होऊन मेला. धडधडीत हार्टफेल होऊन मेला असतां व संशय नसतांनासुद्धां त्याला पोस्टमार्टमकरितां दवाखान्यांत नेला; व तें प्रेत दोन दिवसानंतर ताब्यांत दिलें. तेव्हां संशय अगर तक्रार नसतांना अशीं प्रेतें पोस्टमार्टमसाठीं नेण्यांत येऊं नयेत म्हणून हा ठराव मांडला आहे. तरी तो सर्वांनीं मंजूर करावा अशी विनंति आहे.

स. स. देवधर:—या ठरावास माझा दुजोरा आहे. पोलिसांच्या अनेक लीला आहेत म्हणून मीं सांगितलें त्यांतलीच ही एक आहे. तेव्हां सररास सर्वच प्रेतें पोस्टमार्टमसाठीं नेण्यांत येऊं नयेत. संशय अगर तक्रार असेल तर पोस्टमार्टमसाठीं प्रेत अवश्य पाठवावें. त्यास कोणाचीही हरकत नाहीं. पण मी आपणास अशीं सूचना देतों कीं, असा ठराव मंडळापुढें कां आणला जातो याबद्दल चौकशी करा. म्हणजे त्याचीं कारणें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतील.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसर:—हा ठराव पास होण्यानेंच पोलिसांच्या लीला वाढतील.

रा. सा. महाबळ:—कायद्याप्रमाणें अशी तजवीज करणें क्रमप्राप्त आहे. पण हा ठराव पास झाल्यानंतर बऱ्याच प्रेतांचे बाबतींत पोलिसांनीं आपलें कर्तव्य केलें नाहीं असे निष्कारण आरोप मात्र त्यांचेवर येतील. कायद्यांतच असे दोष-वाटल्यास म्हणा—असल्यानें त्यास नाइलाज आहे. आतां यापुढें होईल तों दक्षता घ्यावी हें योग्य होईल.

स. स. मंढी:—प्रत्येक प्रेताचे बाबतींत अशीच स्थिति होते; त्यास काय करणार ?

रा. सा. महाबळ:—यांत पोलिस पाटील जास्त दक्षता घेत आहेत येवढेंच.

स. स. मंढी:—पोलिस पाटील स्टेटमेंटच घेत नाहीं. तेव्हां या बाबतींत काय करावें.

स. स. देवधर:—पोलिस पाटलाचें हें अज्ञान आहे.

रा. सा. महाबळ:—म्हणून कांहीं हा ठराव पास करणेस नको. मात्र यापुढें जास्त दक्षता घेण्यांत यावी अशी तजवीज व्हावी.

स. स. मंढी:—पोलिस पाटलानें आपले समजुतीप्रमाणें केल्यास माझ्या या ठरावाचा व आपल्या आश्वासनाचा उपयोग काय ?

रा. सा. महाबळ:—त्याला इलाज नाहीं. कायदाच तसा आहे.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसर:—संशयास्पद नाहीं असें आढळल्यानंतरसुद्धां मला कांहीं केसीस केमिकल ॲनलायझरकडे पाठविणेचे प्रसंग आले आहेत.

स. स. मंढी:—माझा हा ठराव मतास टाकावा.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां ३ विरुद्ध १३ मतांनीं स. स. मंढी यांचा ठराव नामंजूर झाला.

## स. स. नाडगीर यांचा ठराव

ठराव ३ राः—संस्थानमजकुरीं हल्लीं जे गांव, नकाशे अस्तित्वांत आहेत त्यांत जमिनींतील कायम स्वरूपाच्या ओघळी व शेतास जाणे येणेकरितां असलेले कायम स्वरूपाचे वहिवाटीचे रस्ते नमूद नाहींत. त्यासाठीं सदर बाबतींत लोकांचे नेहेमीं तंटे उद्भवतात. करितां एका तज्ज्ञ सर्व्हेअरकडून पाहणी करवून अशा ओघळी व रस्ते नमूद असलेले नवीन नकाशे तयार करणेंत यावेत अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना शिफारस आहे.

स. स. नाडगीरः—शेतावर जाणे येणेकरितां कायम स्वरूपाचे रस्ते नसल्यामुळें फार अडचण पडते व त्यामुळें नेहमीं तंटे उत्पन्न होतात. रयतांमधील तंट्यांचा निकाल करणेस उपयोग व्हावा म्हणून मी हा ठराव मांडला आहे. तरी सर्वांनीं मंजूर करावा अशी विनंति आहे.

स. स. देवधरः—माझा या ठरावास दुजोरा आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—तशी योजना दरबारतर्फे चालली आहे. ठराव मंजूर करण्यास कोणतीच हरकत नाहीं.

मे. अध्यक्षः—या ठरावास कोणाचा विरोध नसल्यामुळें तो पास झाल्याचें मी जाहीर करतों.

## स. स. देवधर यांचा ठराव

ठराव ३ राः—हल्लीं डोंगरी लांकडाचे मक्ते देत असल्यामुळें डोंगरांतील झाडांची उत्पत्ति व त्यांची कटाई यांचें प्रमाण व्यस्त होत चाललें आहे. तरी फॉरेस्ट वाढविणेसाठीं म्हणून फॉरेस्ट खात्याकडे झाड लागवडीसाठीं म्हणून स्पेशल १००० एक हजार रुपयांची तरतूद बजेटमध्यें व्हावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे हुजूरकडे विनंति आहे.

स. स. देवधरः—फॉरेस्ट वाढविणेसाठीं १००० हजार रुपयांची तरतूद व्हावी म्हणून हा ठराव आणला आहे. यांस कोणाचाही विरोध असण्याचें कारण नाहीं. कारण फॉरेस्टच्या वाढीवर पावसाचें मान अवलंबून असतें. व पाऊस चांगला पडला तरच शेती चांगली होते शिवाय आपल्या संस्थानच्या दृष्टीनें पाहिल्यास शेती हीच खरी उत्पादनशक्ति आहे. तेव्हां ह्या ठरावास कोणीही विरोध करूं नये अशी विनंति आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—हा ठरावे आम्हांस मान्य आहे कारण तशी तरतूद आहे.

मे. अध्यक्षः—या ठरावास कोणाचा विरोध नसल्यामुळें हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

## स. स. मंडी यांचा ठराव

ठराव ३ राः—बनहट्टी गांवीं पिण्याच्या पाण्याची अडचण फारच आहे. ही दूर करण्यासाठीं सरकारांनीं बनहट्टी गांवच्या दक्षिणेस असलेला ओढा अडवून पाण्याची व्यवस्था करावी अशी श्रीमंत राजासाहेब सरकार यांना या सभेची विनंति आहे.

स. स. मंढीः—फार दिवसापासून बनहट्टीस पाण्याचे हाल होत आहेत. याबाबत वेळोवेळीं मागणी केली आहे पण त्याचा कांहीं उपयोग झालेला नाहीं. गांवच्या पश्चिमेस ओढा आहे. त्याचें पाणी अडवा किंवा यलहट्टीच्या ओढ्याचें तरी पाणी अडवून पाण्याची सोय करावी. याबाबत प्रत्यक्ष पाहाणी झालेली आहे. गांवची वस्ती आठद्हा हजार आहे. कपडे धुणेसाठीं नदीस जावें लागतें. ह्यासाठीं खर्चहि फार येणार नाहीं. आठद्हा हजारांचें फक्त काम आहे. म्युनिसिपालिटी कांहीं रक्कम देणेस तयार आहे. तेव्हां पाण्याची सोय व्हावी म्हणून हा ठराव आणला आहे. तरी तो मंजूर करावा अशी विनंति आहे.

स. स. देवधरः—ह्या ठरावास माझा दुजोरा आहे.

रा. सा. पुराणिकः—हा ठराव मान्य आहे, परंतु " पिण्याच्या " हा शब्द omit करावा. आमची योजना चालू आहे; पण त्यामुळें पिण्याच्या पाण्याची सोय होऊं शकणार नाहीं.

स. स. मंडीः—निदान धुण्याच्या तरी पाण्याची सोय व्हावी. " पिण्याच्या " हा शब्द गाळणेस माझी कांहींच हरकत नाहीं.

मे. अध्यक्षः—यास कोणाचा विरोध नाहीं तेव्हां दुरुस्त ठराव सर्वानुमतें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

### स. स. नाडगीर यांचा ठराव

ठराव ४ थाः—कुंदगोळ गांवांतील पिण्याच्या पाण्याचे हौदांतील पाणी दरसाल बिघडून नारू व इतर प्रकारचे रोग उद्भवतात तरी तें पाणी फिल्टर करून देणेची सोय करणेंत यावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे.

स. स. नाडगीरः—हा ठराव सर्वांनीं मंजूर करावा अशी विनंति आहे.

स. स. देवधरः—या ठरावास माझा दुजोरा आहे. याबाबतींत कांहीं तरी सोय करावी.

रा. सा. महाबळः—या बाबतींत सोय काय करावयाची असें आपणांस वाटतें ?

स. स. नाडगीरः—हौदांत पाणी पंपानें घेऊन तें फिल्टर करावें.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसरः—रोज पंपिंग पाहिजे. सांगलीच्या टाकीसारखी टाकी पाहिजे. तेथें क्लोरिनेशन करावें लागेल. अर्थात् हें काम फारच खर्चाचें आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—हें काम म्युनिसिपालिटीचें आहे. तेव्हां या बाबतींत म्युनिसिपालिटीकडेच दाद मागावी. तेव्हां हा ठराव आपण मागें घ्यावा.

स. स. नाडगीर आपला ठराव परत घेतात.

### स. स. देवधर यांचा ठराव

ठराव ४ थाः—हल्लीं येथील Prince of Wales हॉस्पिटलची असलेली उघडण्याची व औषध देणेस सुरू करण्याची वेळ सकाळीं ९ वाजतांची कमी करून, सदर दवाखाना सकाळीं ७ ला सुरू होऊन ११ वाजतां बंद व्हावा व पुढें ३ ला सुरू होऊन सायंकाळीं

६ ला बंद करणेंत यावा अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे हुजूरकडे विनंति आहे.

स. स. देवधरः—हल्लींचे डॉक्टर फार लोकप्रिय आहेत. त्यांचे हातास यश असल्यामुळें पेशंटचीही संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. पण त्यांच्या लोकप्रियतेचा फायदा सर्व रयतेस व्हावा अशी आमची इच्छा आहे व म्हणून हा ठराव मीं या मंडळापुढें आणला आहे. हल्लींची जी हॉस्पिटलची वेळ आहे ती माझ्या समजुतीनें गैरसोईची आहे. सध्यां सकाळीं ९ वाजतां औषध देण्यास सुरवात होते. त्यामुळें पुष्कळ लोकांना ही वेळ गैरसोईची होते. पेशंटचें दिवसेंदिवस वाढतें प्रमाण लक्षांत घेतां दवाखाना सकाळीं ७ ला सुरू झाला पाहिजे व अकरा वाजतां बंद व्हावा.

सध्यां दवाखान्याची वेळ ९ वाजतां असल्यामुळें व पेशंटची आतिशय गर्दी असल्यामुळें पेशंटसना बारा वाजेपर्यंतही औषध मिळत नाहीं. आज दवाखान्यांत ५,७ कंपाऊंडर्स आहेत पण त्यांना काम आवरत नाहीं. अशा स्थितींत दवाखाना सकाळीं ७ वाजतां उघडला तर लोकांना बारा वाजेपर्यंत तिष्ठत बसावें लागणार नाहीं. सध्यां ह्या दवाखान्याची popularity वाढली असल्यानें डॉक्टरांना बाहेरूनही 'कॉल्स' फार येतात. शिवाय ऑपरेशनच्या कामांत सध्यांचे डॉक्टर अत्यंत तरबेज असल्यामुळें तिकडेही त्यांचा बराच वेळ जातो. सध्यांचे डॉक्टर म्हणजे आमच्या सुदैवानें आम्हांला मिळालेला एक अमोलिक ठेवा आहे. तेव्हां त्याचा उपयोग होतो आहे कीं होत नाहीं हें पाहाण्याकडे सर्वांचीच दृष्टि असणार. आज दररोज पांचशें लोक औषधासाठीं दवाखान्यांत येतात. त्यांना वेळेवर औषध मिळावें हाच माझा मुख्य हेतु आहे. त्यांची कोठल्याही तऱ्हेनें गैरसोय होऊं नये. ( अपूर्ण )

मे. अध्यक्षः—आतां वेळ संपल्योनें काम तहकूब ठेवावें.

# परिशिष्ट नं. ३

No. S. D. 65-40

तारीख २३।८।४० इसवी.

रावबहादूर रामचंद्र केशव बाळ, बी. ए., एलएल. बी., अध्यक्ष, जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ, अधिवेशन सन १९४० इ. यांसीं नमस्कार वि. वि.

आपलेकडून असेंब्ली जावक नंबर ४६ ता. २२।८।४० इ. चे पत्रानें ता. २२।८।४० इ. रोजीं भरलेल्या असेंब्लीच्या अधिवेशनांत सांप्रत चालूं असलेल्या महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्य सरकारांस विजय प्राप्त व्हावा अशी या कायदेमंडळाची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे अशा मजकुराचा ठराव आपण मांडला व तो कायदेमंडळानें एकमतानें मंजूर केलेबद्दल व मंजूर झाले ठरावाचे पुढील तजविजीबद्दल आपलेकडून इकडेस लिहून आलें आहे. ते पाहून इकडेस संतोष वाटला. तरी मंडळाचे इच्छेप्रमाणें सदर मंजूर झालेला ठराव साम्राज्य सरकारांचे प्रतिनिधि यांचेकडे पाठविणेची इकडून जरूर ती तजवीज करणेंत येत आहे, कळावें लोभ असावा ही विनंति.

Sd/ S. A. PATWARDHAN,
राजेसाहेब, जमखंडी

# परिशिष्ट नं. ४

No. S. D. 64-40

ता. २३।८।१९४० इसवी.

रावबहादूर रामचंद्र केशव बाळ, बी. ए., एलएल. बी., अध्यक्ष, जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ सन १९४० यांसीं नमस्कार विनंति विशेष.

आपलेकडून असेंब्ली जा. नं. ५५४ ता. २२।८।१९४० इसवीचे पत्रानें ता. २२।८।१९४० इसवी रोजीं असेंब्लीच्या भरलेल्या अधिवेशनांत सन्मान्य सभासद व्यंकटेश राजराम देवधर यांनीं ( १ ) आम्हांस चेंबर ऑफ प्रिन्सेसमध्यें वैयक्तिक जागा मिळाल्याबद्दल व ( २ ) संस्थान मजकूरचे फर्स्ट ग्रेड व सेकंड ग्रेड ऑफीसर्स व ग्रॅज्यूएटस् नोकर खेरीज करून इतर सुपीरियर सर्व्हिसमधील नोकर लोकांचें टाईमस्केल ईजाफे काटकसरीमुळें पूर्वी बंद ठेवणेत आले होते ते पुन्हां सुरूं केलेबद्दल अभिनंदनाचे ठराव मांडले व ते मंडळानें एकमतानें पास केलेबद्दल इकडेस लिहून आलें आहे. तरी सदर दोन्ही ठराव असेंब्लीनें एकमतानें पास करून आमचें अभिनंदन केलें ह्याबद्दल मंडळाचे आम्ही अत्यंत आभारी आहों. कळावें लोभ असावा ही विनंति.

Sd/ S. A. PATWARDHAN,
राजेसाहेब, जमखंडी

# परिशिष्ट नं. ५

अ. जा. नं. ५९ ता. २२–८–१९४० इ.

## प्रेस नोट.

### जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ.

### ७ वें अधिवेशन.

ता. २२–८–४० इसवी.

### दिवस पहिला.

सर्व लोकांच्या माहितीकरितां या अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्यानें आमचेकडून खालीं लिहिल्याप्रमाणें प्रसिद्ध करणेंत येतें कीं:—

१. सदरहू अधिवेशन ठरल्याप्रमाणें आज सुरू झालें. सुरवातीस सकाळीं ९॥ वाजतां श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांनीं मंडळाच्या सभासदांना उद्देशून आपलें प्रास्ताविक भाषण केलें. त्यानंतर बैठक तहकूब झाली, व पुन्हां दोनप्रहरीं १ वाजतां अधिवेशनाचे कामास सुरुवात झाली. त्यावेळीं ठरल्याप्रमाणें प्रथम प्रश्नोत्तराचें काम सुरू झालें. कामास सुरुवात झालेवर सुमारें १० मिनिटांनीं खालीं लिहिलेले लोकनियुक्त सन्मान्य सभासद सभागृहांत आले.

(१) स. स. वाटवे.
(२) स. स. बंगी.
(३) स. स. लाहोटी.
(४) स. स. होसूर.
(५) स. स. सावळगी.
(६) स. स. मुधोळ.
(७) स. स. आपटे गो. द.
(८) स. स. कुलकर्णी. शि. गं.
(९) स. स. कोरी.
(१०) स. स. बाळण्णवर.

२. सभागृहांत आल्यानंतर स. स. वाटवे यांनीं आमचे हातीं या सभासदांच्या सह्या असलेलें एक पत्र दिलें व अधिवेशनाचे कामीं आपणांस यापुढें भाग घेणेचा नाहीं असें कळविलें. सदरहू पत्र येणेंप्रमाणें:—

**मेहेरबान रावबहादूर अध्यक्ष, जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ, अधिवेशन ७ वें यांजकडे:—**

यादी खालीं सही करणार कायदेमंडळाचे सभासद यांची येणेंप्रमाणें:—

३. सन १९३८ सालीं सांवशी प्रजापरिषदेच्या अधिवेशनांत सध्यांचे कायदेमंडळ प्रजेस जबाबदार नसून, त्यायोगें प्रजाहित कांहींही साधतां येत नाहीं असें दिसून

आल्यामुळें त्याबद्दलच्या ठरावांस अनुसरून बऱ्याच सभासदांनीं आपले राजीनामे दिले होते. परंतु लवकरच दरबारनें घटना–समिति नेमून, पुढील सुधारणा–दान सत्वर अमलांत आणण्याची तजवीज करण्याचें आश्वासन दिल्यामुळें, त्यावेळीं सदर राजीनामे परत घेण्यांत आले होते. त्या गोष्टीसही आज दोन वर्षांचा काल लोटला तरी, व आज सकाळीं श्रीमंत राजासाहेब सरकार यांनींही आपलें भाषणाचे वेळीं अद्यापि पुढील सुधारणा–दानाची घोषणा न केल्यामुळें व विद्यमान कायदेमंडळांत राहून लोक–हित साधतां येत नाहीं असें आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसून आल्यामुळें, नाइलाजानें आम्हांस त्यावेळचा निर्णय अत्यंत जड मनानें पुन्हा अंमलांत आणणें भाग पडत आहे, व त्याप्रमाणें चालू अधिवेशनांत आम्हांस कोणताही भाग घेतां येत नाहीं हें कळविणेस आम्हांस अत्यंत वाईट वाटत आहे. मे. कळावें, ता. २२–८–४० इ.

सह्या वरील सभासदांच्या.

हा अनपेक्षित व खेददायक प्रकार घडून आल्यानंतर, ह्या बाबतींत, ह्या सभासदांची कांहीं गैरसमजूत झाली असल्यास ती दूर करावी आणि त्यांना अधिवेशनाचे कामीं भाग घेण्यास प्रवृत्त करावें अशा हेतूनें आम्हीं त्यांना पत्रांत नमूद केलेल्या तक्रारींच्या अनुरोधानें "नवीन सुधारणांबद्दलची घोषणा आजच आपल्या भाषणांत न करण्याचें जें कारण श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं दिलेलें आहे तें तुम्हांस योग्य वाटत नाहीं काय ?" असा प्रश्न केला. त्या प्रश्नाचें उत्तर म्हणून थोडेसें घुटमळून स. स. वाटवे यांनीं आम्हांस चर्चा करावयाची नाहीं असें म्हटलें, व वरील सर्व सभासद सभागृहांतून निघून गेले.

हा प्रकार झाला नसता तर बरें झालें असतें. याबद्दल हे सभासद अधिवेशनांत आपलें म्हणणें मांडण्यास व चर्चा करण्यास कबूल झाले असते तर योग्य झालें असतें. सुधारणांबद्दलची घोषणा आपणांस कां करतां येत नाहीं, याचें कारण श्रीमंत राजासाहेब यांनीं स्पष्ट शब्दांत दिलें आहे. तें कारण असें:—

"सुधारणा–समितीचा रिपोर्ट गेल्या महिन्यांत आल्यानंतर, आम्हीं त्याबद्दल विचार करून आमचा स्वतःचा निर्णयही ठरवला. परंतु हा निर्णय जाहीर करणेपूर्वी तो नेक–नामदार व्हाइसरॉयसाहेब यांचेकडून मान्य होऊन येणेची जरूरी व इष्टता उत्पन्न झाल्यानें, तो त्यांचेकडे पाठविण्यांत आला आहे. नेकनामदार व्हाइसरॉयसाहेब यांची पसंति अद्यापि हातीं आली नसल्यानें केवळ नाइलाजानें आमचा निर्णय आम्हांस या ठिकाणीं व्यक्त करतां येत नाहीं. या गोष्टीस इलाजच नसल्यानें आपणांस कांहीं दिवस थांबलें पाहिजे. थोड्याच दिवसांत आम्हीं योजलेल्या सुधारणांना साम्राज्य–सरकारांची मान्यता मिळेल, आणि आम्हीं त्या सुधारणा शक्यतों लवकर योग्य प्रसंग पाहून जाहीर करूं शकूं, असा आम्हांस भरंवसा वाटतो."

श्रीमंत राजासाहेब यांचा हा खुलासा या बाबतींतील गैरसमज दूर करण्यास पुरेसा आहे, असें सहजीं दिसून येतें. सध्यांच्या कायदेमंडळानें प्रजाहित कांहींच साधतां येत नाहीं म्हणून आम्हीं कामकाजांत भाग घेत नाहीं असेंही एक कारण वरील सभासदांनीं

आपल्या पत्रांत नमूद केलें आहे. श्रीमंत राजासाहेब यांनीं नवीन सुधारणांची घोषणा आपल्या आजच्या भाषणांत केली असती तरी देखील हें कारण कसें नाहींसें झालें असतें, हें समजण्यास मार्ग दिसत नाहीं.

हा सर्व प्रकार ध्यानीं घेऊन श्रीमंत राजासाहेब यांनीं नवीन सुधारणांची घोषणा आज केली नाहीं एवढ्याच कारणामुळें-श्रीमंत राजासाहेब यांनीं घोषणा न करणेस योग्य कारण असून देखील-या सभासदांनीं सभात्याग करून अधिवेशनांत भाग न घेणेचें ठरविणें कितपत योग्य व सयुक्तिक होईल याचा विचार सर्वांनीं अवश्य करावा.

विकृत स्वरूपांत माहिती प्रसिद्ध होऊन याबाबतींत निष्कारण गैरसमजाला जागा राहूं नये म्हणून आम्हांस हा खुलासा करणें इष्ट वाटल्यावरून तो केला आहे.

तारीख २२-८-४० इसवी.

R. K. BAL.
अध्यक्ष,
ज. सं. प्रा. का. मंडळ, अधिवेशन ७ वें.

## तिसरा दिवस

### ता. २४।८।४०

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशींच्या कार्यक्रमास १२।। वाजतां सुरवात झाली. त्याप्रसंगीं पहिल्या दिवसा इतकेच सभासद् हजर होते. कार्यक्रमाप्रमाणें बजेटमधील बाबींवर चर्चा सुरू झाली.

स. स. देवधरः—बजेट पान ३, खातें नं. ६ लोकलफंडाबाबत खुलासा पाहिजे.

रा. ब. दिवाणसाहेबः—Land revenue फिक्स असतो. परंतु किरकोळ उत्पन्न जसें कमीजास्त होतें तसा लोकलफंड कमीजास्त होत असतो.

स. स. देवधरः—पान ३ खातें नं. ५ किरकोळ जमीनबाब १४००० ही कशाची ?

रा. ब. दिवाणसाहेबः—फळांचे वगैरे उत्पन्नाबद्दल होय.

स. स. देवधरः—हा आंकडा फार मोठा दिसतो व तो सरासरीनें काढलेला दिसतो.

रा. ब. दिवाणसाहेबः—अनुभवानें तसा विचार करूनच तो आंकडा धरलेला आहे.

स. स. देवधरः—मागील प्रत्यक्ष आंकड्यांवरून पाहतां हा आंकडा मोठा दिसतो.

रा. ब. दिवाणसाहेबः—याचें नांवच मुळीं fluctuating असल्यानें तें कमी जास्त येणेचा संभव असतो. प्रथम अंदाजीं आंकडा धरलेला असतो. कमीजास्त विक्रीवर हा आंकडा अवलंबून असतो.

स. स. देवधरः—पान ३, खातें नं. ७ आयटेम २ डोंगरी लांकडाबद्दल धरलेला आंकडा कमी करावा.

रा. ब. दिवाणसाहेबः—तसें करतां येणार नाहीं. ही लिलावाची रक्कम असल्या-कारणानें कमी कशी धरतां येईल ?

स. स. देवधरः—ह्यांत किरकोळ रक्कम कशाची धरली आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—बाहेरून मेंढ्या वगैरे येतात त्यांचे दंडाबद्दल वगैरे आहे.

स. स. देवधरः—पान ५, खातें ९ आयटेम १ स्टँप व कोर्ट फी तिकिटेंविक्रीचा आंकडा मोठा धरला आहे. कारण आतां शेतकी अॅक्ट लागू जाहला असल्यानें उत्पन्न कमी येईल.

रा. ब. दिवाणसाहेबः—तसें आतांच कांहीं सांगतां येणार नाहीं.

स. स. देवधरः—पान ७, आयटेम १२ जेलखातें:—मागील उत्पन्न पाहातां आतां उत्पन्न कमी कां धरलें आहे ?

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसरः—२६५० च्या आंकड्यांत दुबेरजीचा संबंध आहे त्यामुळें हल्लींचा आंकडा लहान दिसतो.

स. स. देवधरः—पान ९, बाब १६ ( ५ ) हा कसला आंकडा ?

रा. सा. धारेश्वरः—हें कांहीं फंडावरील व्याज आहे. मागील वर्षी तें काढून न घेत-ल्यानें यंदा धरलें आहे.

स. स. देवधरः—पान ११, बाब २१ ( १ ) हे आंकडे कसले ?

रा. ब. दिवाणसाहेबः—गांवांत कांहीं सरकारी इमारती आहेत त्यांचें हें भाडें.

स. स. देवधरः—यांत पुणें वाडा आहे काय ?

रा. ब. दिवाणसाहेबः—तो खाजगीकडील आहे.

स. स. देवधरः—पान १३, बाब २५ ( २ ) ही रकम कसली ?

रा. ब. दिवाणसाहेबः—ही बँकेच्या व्याजाबद्दलची रकम आहे.

स. स. देवधरः—सरासरी व्याजाचा दर काय पडतो !

रा. ब. दिवाणसाहेबः—सरासरी व्याजाचा दर ८% पडतो.

स. स. देवधरः—पान १३, बाब २६ ( ५ ) यांत रकम कां दाखविली नाहीं ?

रा. ब. दिवाणसाहेबः—पूर्वी पार्टपेमेंट म्हणून खासगींतून रकम येत असे. त्याबद्दलचा हा आयटेम आहे.

स. स. देवधरः—दरसाल किती रकम येत असे !

रा. ब. दिवाणसाहेबः—साधारणपणें ? असावी.

स. स. देवधर—फिक्स डिपॉझिट रक्कम एक लाख धरली आहे. ती कमी धरावी.

रा. ब दिवाणसाहेबः—नको म्हटलें तरी लोक ठेवी आणून ठेवितात. सिक्युरिटिकरितां त्या घ्याव्या लागतात. शिवाय त्या रकमा जास्त व्याजानें गुंतवतां येतात त्यामुळें फायदाच आहे.

स. स. देवधरः—पान १५, खातें २८ तसलमातीचा आंकडा मोठा आहे. भत्ता, किरकोळ खर्च वगैरे हिशोब घेऊनहि हा आंकडा मोठा आहे.

रा. ब. दिवाणसाहेबः—यापूर्वी याहूनहि जास्त रकमा तसलमातीला याव्या लागल्या आहेत. त्यामुळेंच हा आंकडा धरावा लागला आहे.

स. स. देवधरः—शक्य तो तसलमात कमी असावी असा प्रयत्न करावा.

रा. स. महाबळः—तसलमात आंकड्यांस भितां कां ?

स. स. देवधरः—मी भीत नाहीं. पण तो आंकडा आतां फुगत चालला आहे इतकेंच.

## खर्चाचे बाजूकडील रकमांचे खुलासे.

स. स. मंडीः—ग्रामोद्योगासाठीं जी रकम धरलेली आहे त्या रकमेचा विनियोग कसा करावयाचा याची रूपरेषा कांहीं आहे काय ?

रा. ब. दिवाणसाहेबः—ज्या योजना पुढें येतील त्यासाठीं म्हणून हा आंकडा धरलेला आहे.

**यानंतर खर्चाचे बाजूच्या रकमाबद्दल कपातीच्या सूचना सुरू.**

स. स. देवधरः—पान २९, आयटेम १२ न्यायमंत्रि यांच्या ऑफिसच्या पगाराचा आकडा कमी धरावा.

रा. सा. महाबळः—पगाराबद्दल आपणांस बोलतां येणार नाहीं.

स. स. देवधरः—निदान भत्याच्या रकमेंतून १०० रुपये कमी करावे व ५०० रु. ऐवजीं ४०० रु. आंकडा धरावा. आतां अपिलांचा नंबर कमी आहे तसेंच तपासणी अर्ज कमी येतात. एकाच माणसाकडून बरींच कामें करून घेतां येतात. बजेटाच्या तोंडमिळवणीसाठीं म्हणून मोठ्या माणसांनीं थोडी घस सोसावी.

रा. सा. महाबळः—पगाराचे बाबतींत आपणांस मुळींच बोलतां येत नाहीं. आपण हें मार्केटमध्यें बोलावें.

स. स. देवधरः—मार्केटमध्यें मी आपलेपुढें बोलणेस येत नाहीं.

स. स. मंढीः—स. स. देवधर यांनीं सुचविलेल्या कपातीस माझें अनुमोदन आहे.

ही सूचना मतांस टाकतां ३ विरुद्ध १३ मतांनीं नापास झाली.

स. स. देवधरः—पान ३७, खातें १८, विद्याधिकारी ऑफिस कमी करून काम भागवावें. मला पगार, भत्ता व इतर खर्चाबद्दल बोलतां येत नाहीं. मी ह्यांत एकंदर ५० रुपयांची कपात सुचवितों.

स. स. मंढी—माझा या कपातीला दुजोरा आहे.

ही सूचना मतांस टाकतां ३ विरुद्ध १३ मतांनीं नापास झाली.

स. स. देवधरः—पान ४९, खातें २२ आयटेम ६ स्टेटकडील रिपेरीला ३६००० रुपये धरले आहेत पण दुरुस्ती व्हावी तशी मात्र होत नाहीं. म्हणून ही रकम अजिबात कमीच करावी.

रा. सा. पुराणीकः—म्हणजे कांहींच तजवीज होत नाहीं असें म्हणणें आहे काय ?

स. स. मंढीः—खर्चाचे मानानें दुरुस्ती होत नाहीं.

स. स. देवधरः—१०,००० रु. तरी यांत कमी धरावे.

ही सूचना मतांस टाकतां ३ विरुद्ध १३ मतांनीं नापास झाली.

स. स. मंढीः—पान ४१, खातें १८, आयटेम ५, भत्ता व इतर औषधी सामान वगैरेसह यांतून ५० रु. कमी करावे.

रा. स. महाबळः—ही निंदाव्यंजक कपात आहे. एका बाजूनें औषधें मिळत नाहींत म्हणून ओरडतां तर दुसऱ्या बाजूनें कपात सुचवितां.

स. स. मंढीः—जेथें औषधेंच मिळत नाहींत तेथें इतकी रकम तरी खर्ची कशाला घालावयाची ?

रा. सा. महाबळः—आपण म्हणतां तसा ठराव मांडावा.

मे. अध्यक्षः—तर मग बजेटवर चर्चा तरी कशाला ? रकम वाढवितां येत नाहीं म्हणतां व रकम कमी करणेस सुचविलें असतां निंदागर्भ म्हणतां. तेव्हां चर्चा बंदच करावी हें बरें.

रा. सा. महाबळः—( जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या कामकाजासंबंधींचा नियम ५४ वाचून दाखवितात. )

मे. अध्यक्षः—लोकपक्षाच्या सभासदांचा यामुळें दोन्हीकडून कोंडमाराच होतो. तेव्हां चर्चाच बंद करावी.

रा. सा. महाबळः—खर्च कमी कसा करावा तें सुचवा की ?

स. स. देवधरः—नाईलाजास्तव चर्चा बंद करतों.

त्यानंतर कार्यक्रमाप्रमाणें पुढील कामास सुरुवात झाली.

स. स. देवघर यांनीं 'हुजूर रेकॉर्डमधील कागद पाहणेसंबंधींचें नियम.' या बाबतचें बिल परवानगीसाठीं पुढें मांडलें.

## हुजूर रेकॉर्डमधील कागद पाहणेसंबंधीं नियम.

खालील बिल येत्या असेंब्लीपुढें वट्ट हुकुमाची दुरुस्ती करणेची असल्यानें वट्ट हुकूम दुरुस्ती बिल म्हणून मानावें.

ज्याअर्थी जमखंडी येथील हुजूर रेकॉर्डमधील कागदपत्र पाहणेस कोणतेच पूरक असे नियम नाहींत व संबंधीक अथवा इतर इसमांना रेकॉर्ड पाहणेस नियम असणें, सर्वच दृष्टीनें जनतेच्या सोईचे व जरूरीचे असल्यानें हुजूर रेकॉर्डमधील कागद पाहण्याबद्दल खालील नियम करणेत यावे अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना शिफारस आहे.

( १ ) कोणताहि इसम ज्याचा हुजूर रेकॉर्डसमधील कागदाशीं संबंध आहे अथवा नाहीं तो अफिडेव्हिट करून रेकॉर्डवरील अंमलदाराकडे अर्ज देऊन परवानगी घेईल तर त्यास एकच प्रकरण अथवा कज्जा अथवा खटला अथवा चाललेलें काम पाहण्याची मुभा आहे. सदर अर्जास आठ आण्याचें तिकीट लावणेचें आहे.

( २ ) वरीलप्रमाणें एकदां परवानगी मिळालेनंतर सदर वरील नमूद केलेले कामासंबंधीं कागद पाहणेस त्यास दोन तास सवड मिळणेची आहे व मिळालेली परवानगी त्यास मिळाले तारखेपासून आठ दिवस उपयोगांत राहणेची आहे.

( ३ ) अर्ज जो देणेचा त्यामध्यें अर्जदारानें कशासाठीं आपणांस रेकॉर्डमधील काम पाहणेस पाहिजे आहे त्याचीं कारणें अफिडेव्हिट करून नमूद करणेचीं आहेत व कोणकोणतें काम पाहणेचें आहे त्यासंबंधीं तें प्रकरण, कज्जा, अथवा काम, रेकॉर्डवरील अंमलदारास समजून येईल अशासाठीं होतां होईल तों बरोबर माहिती नमूद करणेची आहे.

( ४ ) कोणत्याही कारणासाठीं रेकॉर्डमधील कागद पाहतां येणार नाहीं असा अर्जदारास निकाल मिळाल्यास तो शेवटचा निकाल समजणेचा आहे.

( ५ ) रेकॉर्डमधून कोणताही मजकूर वाचून त्याबरहुकूम नक्कल हजर न करतां कोणींही कोणतेंही त्या मजकुराचें अफिडेव्हिट करील अथवा साक्ष देईल तर तो कायदेशीर पुरावा होणार नाहीं.

( ६ ) कागद पाहतांना सदर कागदाचीं टिपणें करून घेणेस अर्जदारास मुभा आहे.

( ७ ) कागद पाहणेस वर नमूद केलेपेक्षां जास्त वेळ लागल्यास जास्तीचे वेळेसाठीं वरीलप्रमाणेंच प्रत्येक दोन तासांस जास्त आठ आणे फी ( अर्जाचें ८ आणेचें तिकीट ) देणें अर्जदारास जरूर आहे. या वरील वेळेंत पैशाचे दृष्टीनें भाग पाडणेचे नाहींत.

( ८ ) वरील अर्ज मंजूर जाहलेनंतर अर्जदार रेकॉर्डमधील कागद रेकॉर्डकीपर अथवा त्यांनीं नेमलेले इसमाचे नजरेखालीं पाहील व कागद पाहून झालेनंतर कागद परत देईल.

मे. अध्यक्षः—पण हें बिलाच्या स्वरूपांत नाहीं. बिलाचा ठराविक फॉर्म आहे. त्याप्रमाणें तें असावयास पाहिजे.

स. स. देवधरः—हे नियम म्हणून मंजूर करणेस काय हरकत आहे.

रा. सा. पटवर्धनः—पण कायद्याच्या स्वरूपांत तें कसें पास करतां येईल.

स. स. देवधरः—लोकांना कागद पाहावयास मिळावेत म्हणून मी हे नियम मांडीत आहें.

रा. सा. महाबळः—तुम्हांला हायकोर्ट सर्क्युलरप्रमाणें कागद पाहावयास मिळतील. परंतु सर्वच हुजूर रेकॉर्डचे कागद कसें पाहावयास मिळतील ?

स. स. देवधरः—जे कागद दाखविणेजोगे आहेत ते दाखविणेस काय हरकत आहे. नकलांसाठीं अर्ज करावयाचा जाहला तरी त्यांतील निकालतारीख व तपशील वगैरे कसा पाहाण्यास मिळेल. सबब जे कागद पाहिजे असतील ते दाखवावे व जास्त वेळ लागल्यास प्रत्येक दोन तासांस आठ आणे याप्रमाणें अर्जास तिकीट लावावें. वाटल्यास दुसरे नियम करा. पण वर सांगितलेली अडचण दूर करावी. ही उत्पन्नाची बाब आहे.

रा. सा. महाबळः—दिवाणी शाखेपुरते तर नियम आहेतच.

स. स. देवधरः—पण तेवढ्यानें काम भागत नाहीं. बाहेर या बाबतींत कांहीं नियम झालेलें आहेत. ते आणवून घेऊन या बाबतींत कांहीं तरी उपाययोजना व्हावयास पाहिजे.

रा. सा. महाबळः—असेंब्लीच्या कामकाजांत हे अशा तऱ्हेचे नियमच मांडतां येत नाहींत. बिल म्हणजे कायदा. बरें जे नियम आज मंडळापुढें मांडले आहेत त्यांत हुजूर रेकॉर्ड याची व्याप्ति कोठवर करावयाची याची व्याख्या नाहीं. श्रीमंतांचे सर्व कचेरींतील कागद हुजूर रेकॉर्डांत असतात. आतां दाव्यापुरतीच गोष्ट घेतल्यास त्या त्या कोर्टांत जरूर तीं फेरीस्तें व निकाल तारीख मिळते. स. स. देवधर म्हणतात त्याप्रमाणें आठ आणे दिले कीं वाटेल तें पाहावयास मिळावें. परंतु हा नियम अंमलांत कसा आणतां येईल ? वाटल्यास याबद्दल जरूर त्या धर्तीवर ठराव आणावेत. स. स. देवधर यांचें म्हणणें सर्वच सभासदांस मान्य होईल असें नाहीं. त्यामुळें ज्या गोष्टीकडे एखाद्याचा मुळींच संबंध नाहीं असे Confidential कागद पाहाण्यास मिळाले तर दुसऱ्यांचे बाबतींत अडचण उत्पन्न होईल. केवळ आठ आणे देऊन रेकॉर्डांतून वाटेल त्या कामाचे कागद मागवावे अशी स्थिति होईल. आपलाच संबंध असलेले कागदपत्र दुसऱ्यांनीं पाहिले तर चालेल काय ? तेंच तत्त्व या बाबतींत लावावें. तरी अशा तऱ्हेच्या बिलाला Introduce करणेस परवानगी देऊं नये.

स. स. देवधरः—लोकांना सरकार रेकॉर्डांतील कागद पाहाण्यास मिळणेस हरकत नाहीं. व जेथें जरूर असेल तेथें अर्ज व ॲफिडेव्हिट घेऊन मग देणेस हरकत नाहीं.

रा. सा महाबळः—आपण म्हणतां त्याप्रमाणें बाहेरही असे नियम अंमलांत नाहींत. तसे नियम कोठें अंमलांत असतील तर ते आणून दाखवावे. तुम्ही हुजूर रेकॉर्ड असें

म्हणत आहांत. त्याऐवजीं Judicial Record असें म्हणा. आपण म्हणतां त्याप्रमाणें नियम आणून दाखवा.

मे. अध्यक्ष यांनीं बिल Introduce करणेस परवानगीसाठीं मतें घेतां ३ विरुद्ध १३ मतांनीं परवानगी नाकारण्यांत आली.

त्यानंतर ठरावास सुरुवात झाली.

## स. स. देवधर यांच्या
## ठराव नं. ४ वर चर्चा पुढें चालू

रा.सा. चीफ मेडिकल ऑफिसरः—स. स. देवधर यांनीं फक्त वेळेंत बदल सुचविणेसाठीं हा ठराव आणला आहे. सात तास काम करावें असें ते म्हणतात. पण संध्याकाळीं सात वाजतां विंचू चावलेला एखादा मनुष्य आला तर त्यास ठरावाप्रमाणें उद्यां सकाळीं या असें सांगावें लागेल. एकंदरींत यांत डॉक्टरचा फायदाच आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, सकाळीं सात वाजतां औषधासाठीं दवाखान्यांत लोक येऊ शकत नाहींत. बहुधा सकाळीं ९ पर्यंतच येतात. शिवाय सकाळीं कांहीं रोग्यांना तपासणेसाठीं जाणें भागच असते. दवाखाना अकरा वाजतां बंद ठेविल्यास खेड्यांतील लोकांची दैना होईल. बरें ११ पर्यंत केसीस पहात बसल्यास ऑपरेशनकडे लक्ष पुरविणेस सोईस्कर वेळ मिळत नाहीं. एकदां सरकारी वेळच ठरून गेल्यास इतर वेळीं मीं त्यांना पाहाणेचें कारण नाहीं. याशिवाय पोस्टमार्टेम, साक्षी, मॅटर्निटी होम इकडे लक्ष पुरवावें लागतें. पण या ठरावामुळें एखादी डिलिव्हरीची केस आली तरी आतां दवाखान्याची वेळ संपली असें सांगणें भाग पडेल. तरी वेळेंत बदल करून सन्मान्य सभासदांना काय साधावयाचें आहे हेंच समजत नाहीं. १९२८ सालीं २८० पर्यंत केसीस असत तर यंदा ३१० पर्यंत असतात. तेव्हां इतक्या वाढलेल्या कामामध्यें वेळेची लिमिट घालून कसें जमणार ? अर्थात् या बदललेल्या वेळेमुळें डॉक्टरचा एकंदरींत फायदाच होणार आहे. निष्कारण दगदग तरी पडणार नाहीं व त्यामुळें थोडी विश्रांतीच मिळेल. पण मला दुसरी अशी शंका येते कीं, सकाळीं ७ वाजतां दवाखाना उघडा ठेवला म्हणजे डॉक्टरांना बाहेरून जे पैसे मिळतात ते मिळणार नाहींत. कदाचित् डॉक्टरना मिळत असलेले पैसे यांना पाहावत नाहींत असें दिसतें. निदान सकाळीं ७ वाजतां दवाखाना सुरू करण्यानें लोकांची काय सोय होते हें सन्मान्य सभासद सांगतील तर बरें होईल.

स. स. देवधरः—डॉक्टरसाहेबांनीं माझ्या म्हणण्याचा विपर्यास करून घेतला. हा ठराव मुद्दाम आणण्याचें कारण कीं आपल्या गुणांचा जास्त उपयोग करून घेतां यावा. माझा ठराव अभिमानास्पद आहे. आपल्या ज्ञानाचा व विद्वत्तेचा लोकांना पुरेपूर फायदा व्हावा हाच या ठरावाचा हेतु आहे. यांत कोणावरही निंदा करण्याचा हेतु नाहीं.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसरः—दवाखान्यांतील काम संपल्याशिवाय तर मी घरीं जात नाहीं ना ? लोकांची कांहीं तक्रार आहे काय ?

स. स. देवधरः—अशी तक्रार बनहट्टी, कुंदगोळचे बाबतींत आहे.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसरः—पण हा ठराव येथील हॉस्पिटलबाबत आहे ना?

स. स. देवधर:—मी हा ठराव मागें घेतों.

### स. स. मंडी यांचा ठराव

**ठराव ४ था:**—बनहट्टी व होसूर आणि होसूर रामपूर यांचे दरम्यान हल्लीं रहदारी वाढलेली असून मोटारची वाहातूक जास्त झाली आहे. सद्रील रस्ते दुरुस्त करणेबद्दल ४-६ वर्षांपासून सरकारांना विनंति करून देखील अजून झालेली नाहीं. त्या बाबतींत यंदा तरी सद्रील रस्ते दुरुस्त करणेचें काम जरूर हातीं घेणेंत यावें अशी या सभेची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे.

स. स. मंडी:—हा ठराव सर्वांनीं मंजूर करावा अशी विनंति आहे.

स. स. देवधर:—माझा या ठरावास दुजोरा आहे.

रा. ब. दिवाणसाहेब:—आपला ठराव मान्य आहे.

मे. अध्यक्ष:—या ठरावास कोणाचा विरोध नाहीं असें समजून हा ठराव एकमतानें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

### स. स. देवधर यांचा ठराव

जमखंडी जेलकडील जेलरची व ऑफिसाची टाईम निश्चितपणें ऑफिसवर बोर्ड लावून लोकांना समजेल अशा रीतीनें निश्चित करावी, व त्याप्रमाणें अंमल व्हावा अशाबद्दल हें मंडळ श्रीमंत राजासाहेब सरकार यांना शिफारस करीत आहे.

स. स. देवधर:—सदर ठराव सर्वांनीं मंजूर करावा.

स. स. मंडी:—माझा या ठरावास दुजोरा आहे.

रा. सा. चीफ मेडिकल ऑफिसर:—आपण म्हणतां त्याप्रमाणें तजवीज करणेंत येईल.

मे. अध्यक्ष:—या ठरावास कोणाचा विरोध असण्याचें कारण नाहीं. मी हा ठराव एकमतानें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

### मे. अध्यक्षांचें समारोपाचें भाषण:—

मे. अध्यक्ष:—या वर्षीचें अधिवेशन यशस्वी झालें याबद्दल मी सर्वांचें अभिनंदन करतों. या मंडळाचें हें शेवटचेंच अधिवेशन आहे. परंतु या यशस्वितेंत थोडें वैगुण्य आलें आहे. तें म्हणजे लोकपक्षाच्या दहा सभासदांचा सभात्याग होय. श्रीमंत राजासाहेबांनीं सुधारणांची घोषणा केली नाहीं म्हणून श्रीमंत राजासाहेबांच्या हेतूबद्दल संशय प्रदर्शित केला गेला आहे. पण तसा संशय घेण्यास जागा नाहीं याची मीं स्वत: खात्री करून घेतली आहे. ज्या दहा सन्मान्य सभासदांनीं सभागृहाचा त्याग केला त्यांनीं आणखी थोडें सामोपचारानें घेतलें असतें, तर श्रीमंत सरकारांना विचारून घोषणा करण्यासंबंधीं पुन्हा खात्रीही करून दिली असती. सभात्यागाचें त्यांचें कारण घोषणेसंबंधीं आहे, हें फोल दिसतें. खरें कारण म्हणजे पुढील निवडणुकीकरितां म्हणून मतदारांकडून सहानुभूति मिळविण्याचा हेतु असेल असें मला वाटतें. आपण त्यांच्या सभात्यागाला महत्त्व देण्याचें कारण नाहीं. त्यांनीं सभात्याग केला तरी अधिवेशन यशस्वी झालें हें मात्र खरें. इतर लोकनियुक्त सभासदांचे मी आभार मानतों; स. स. देवधर यांनीं बजेटावर चर्चा करण्यांत भाग घेतला व आपल्या वेगवान वाणीनें सभात्याग केलेल्या सभासदांची उणीव भरून काढली

म्हणून मी त्यांचे आभार मानतों. सध्यांच्या कायदेमंडळांत राहून लोकहित साधतां येत नाहीं, असें या सभासदांचें म्हणणें होतें तर ते लोक या मंडळांत तरी कां आले ? येथें लोकहित साधतां येत नाहीं हें म्हणणें चुकीचें आहे. शेतकी सुधारणा, दत्तकविधान, विधवांचे वारसा-हक्क वगैरे अनेक समाजहिताचे कायदे या कायदेमंडळांत करण्यांत आले आहेत. असें असतां लोकहित साधतां येत नाहीं हें कसें ? मंडळाच्या कार्यांत नेहमीं अडचणी उपस्थित होतात हें खरें. परंतु निराश होण्याचें कारण नाहीं. आतां लवकरच नवीन सुधारणा मिळाल्यावर राज्य-कारभारांत अंशभागी होण्याची संधि लोकांना मिळणार आहे. आगामी घटनेचें स्वरूप काय आहे हें मला माहीत नसलें तरी द्विदल राज्यपद्धतीचे हक्क मिळतील असें वाटतें. ही द्विदल पद्धति इतकी इष्ट नाहीं हें खरें. परंतु इतर ठिकाणीं ती अयशस्वी झाली म्हणून येथेंही अयशस्वी होईल असें म्हणतां येणार नाहीं. संपूर्ण स्वराज्य मागणें अव्यवहार्य होईल असें मला वाटतें. जशा सुधारणा मिळतील तशा राबवाव्या हाच उत्तम मार्ग आहे.

मीं आज या अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून सात वर्षें काम केलें. श्रीमंतांची इच्छा म्हणून मी पुन्हा आलों. जें झाड लावण्यांत मी अग्रभागी होतो त्याचें वाढतें फळ पाहाण्यास मला आनंदच होत आहे व त्यामुळें मीं या अधिवेशनाचें काम पत्करलें. नवीन घटनेप्रमाणें अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधीं काय योजना आहे ती मला माहीत नाहीं. तरी याउपर श्रीमंतांची इच्छा, परमेश्वराची इच्छा व आपणा सर्वांची इच्छा असेल त्याप्रमाणें होईलच. श्रीमंतांना दीर्घ आयुष्य लाभो अशी परमेश्वरापाशीं सदिच्छा प्रदर्शित करून व पुन्हा एकदां आपणा सर्वांचे आभार मानून मी माझें भाषण संपवितों.

स. स. देवधरः—मी लोकपक्षातर्फें प्रेसिडेंटचे आभार मानण्यासाठीं उभा राहिलों आहे. रा. ब. बाळ हे गेलीं सात वर्षें या अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत. प्रेसिडेंट या नात्यानें त्यांची कामगिरी आतिशय महत्त्वाची आहे. जरी ते सरकारनियुक्त अध्यक्ष असले तरी त्यांनीं लोकपक्षांशीं केलेलें सहकार्य अत्यंत वाखाणण्यासारखें आहे. आज लोकपक्षाचें जें कांहीं कार्य दिसत आहे त्याचें सर्व श्रेय अध्यक्षांनाच दिलें पाहिजे. त्यांनीं गेलीं सात वर्षें अत्यंत समतोलपणानें व न्यायबुद्धीनें असेंब्लीचें काम पार पाडलें आहे. लोकपक्षाला अनुरूप असें त्यांनीं वातावरण निर्माण केलें आहे. वृद्धापकाळांतही प्रवासाची दगदग सोसून येथें येऊन प्रेसिडेंट या नात्यानें त्यांनीं चोख कामगिरी बजावली याबद्दल कौतुक व अभिमान वाटतो. या अधिवेशनास श्रीमंतांनीं हजर राहून प्रजेच्या काय अडचणी व इच्छा व आकांक्षा आहेत हें ऐकून घेतलें याबद्दल श्रीमंतांचेही लोकपक्षातर्फें आभार मानतों. त्याचप्रमाणें सरकारी सभासदांनींही लोकपक्षाशीं सहकार्य केलें त्याबद्दल त्यांचेही आभार मानून मी माझें भाषण संपवितों.

रा. सा. महाबळः—रा. ब. बाळ या असेंब्लीचे अध्यक्ष म्हणून गेलीं सात वर्षें काम करीत आहेत. १९३२ सालीं हा कायदा मंजूर झाला व श्रीमंत राजेसाहेबांच्या कृपेनें त्याचें चांगलें फळही मिळालें; आणि याचें सर्व श्रेय विद्यमान अध्यक्षांनाच दिलें पाहिजे. अत्यंत

लोकप्रिय न्यायाधिकारी म्हणून त्यांनीं कीर्ति मिळविली आहे. ते कोणालाही न दुखावितां स्वतंत्र व प्रांजळपणें आपलीं मतें असेंब्लीच्या वेळीं बोलून दाखवीत. अत्यंत समतोलपणानें ते असेंब्लीचें काम चालवित असत. श्रीमंतांच्या कृपेमुळेंच ते या मंडळाला अध्यक्ष लाभले आहेत. मी रा. ब. बाळ यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. त्याचप्रमाणें श्रीमंतांनींही ह्या अधिवेशनाचे वेळीं हजर राहून सविस्तर चर्चा ऐकली ह्याबद्दल त्यांचेही अंतःकरणपूर्वक आभार मानतों. यानंतर पुढची गोष्ट म्हणजे लोकपक्षांच्या सभासदांचे आभार मानणें ही होय. कांहीं सभासद रागावून बाहेर गेले. मी त्यांना रुसून गेले असें म्हणतों. ते बाहेर पडले नसते तर त्यांना चांगली कामगिरी करतां आली असती. ते बाहेर पडले-रुसून गेले—असतांना सुद्धां जे चार दोन सन्मान्य सभासद विवेक करून राहिले त्यांनीं आपल्या ओघवती वाणीनें त्यांची चांगलीच उणीव भरून काढली. स. स. देवधर, मंडी व नाडगीर यांनीं ठराव मांडले. पास किंवा नापास होऊं द्या तो प्रश्न निराळा. पण त्यांनीं दरबारशीं सहकार्य केलें याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. तसेंच सेक्रेटरींच्या कामाबद्दल व सुव्यवस्थेबद्दलही मी त्यांचे आभार मानतों.

यानंतर मे. अध्यक्षांनीं या वर्षाच्या अधिवेशनाचें काम संपल्याचें जाहीर केलें.

# परिशिष्ट नं. ६

हुजूर ऑफीस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ३४
सन १९४० इसवी.

## दप्तरी हुकूम.

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाबाबत सन १९३२ इसवीचा ॲक्ट नं. १ कलम १० अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं, जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे सन १९४० इ. सालचे अधिवेशनाची बैठक जमखंडी येथें परशुरामभाऊ हायस्कूलचे असेंब्ली हॉलमध्यें ता. २२ माहे ऑगस्ट सन १९४० इ. ते. ता. २४ माहे ऑगस्ट सन १९४० इ. अखेर तीन दिवस भरविण्याचें मुक्रर करण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख २५ माहे जून सन १९४० इसवी.

*S. A. Patwardhan*
राजे सं.॥ जमखंडी.

हुजूर ऑफिस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ६१
सन १९४० इसवी.

## दप्तरी हुकूम.

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाबाबत सन १९३२ इसवीचा ॲक्ट नं. १ कलम ५ प्रमाणें रावबहादूर दिवाण हे हुद्याच्या नात्यानें (Ex-Officio) कायदेमंडळाचे अध्यक्ष आहेत. हल्लीं संस्थानमजकुरीं रावबहादूर दिवाण यांचेकडे रेव्हेन्यू, फिनॅन्स वगैरे सारख्या महत्त्वाच्या खात्यांचा चार्ज असल्यानें कायदेमंडळाचे अधिवेशनाचेवेळीं सदर खात्याचे वरिष्ठ अम्मलदार म्हणून त्यांना खुलासा करण्याचा प्रसंग येणार आहे. अशा परिस्थितींत कायदेमंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनींच काम पहाणें इष्ट होणार नाहीं. सबब सदर ॲक्टचें कलम ४ पोट कलम २ (अ) प्रमाणें रावबहादूर रामचंद्र केशव बाळ, B. A., LL. B., रिटायर्ड स्मॉलकॉज जज्ज, पुणें व माजी दिवाण, जमखंडी, यांना जमखंडी कायदेमंडळाचे चालूं सन १९४० इसवी सालचे अधिवेशनापुरते कायदेमंडळाचे जादा सभासद म्हणून नेमणेंत आलें आहे. व त्यांनीं चालूं सन १९४० इ. सालचे कायदेमंडळाचे अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून सदर अधिवेशनाचें काम पुरें होईपावेतों काम पाहाणेचें आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १३ माहे ऑगस्ट सन १९४० इसवी.

*S. A. Patwardhan*
राजे सं॥ जमखंडी.

७९

हुजूर ऑफिस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ६२
सन १९४० इसवी.

## दप्तरी हुकूम.

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे चालू सन १९४० इ. सालचे अधिवेशनांत कायद्यासंबंधींचीं बरींच बिलें चर्चेकरितां येणार असल्यानें त्या कामांतील माहितगार, म्हणून रावसाहेब शंकर अनंत आपटे, B. A., LL. B., गव्हर्नमेंट प्लीडर व पब्लिक प्रॉसिक्युटर, जमखंडी यांस चालू सालचे कायदेमंडळाचे अधिवेशनापुरते जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाबाबत सन १९३२ इ. चा ॲक्ट नं. १ कलम ४ पोट कलम २ (ब) प्रमाणें कायदेमंडळाचे जादा सभासद म्हणून नेमणेंत आलें आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १३ माहे ऑगस्ट सन १९४० इसवी.

*S. A. Patwardhan*
राजे सं॥ जमखंडी.

हुजूर ऑफिस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ६३
सन १९४० इसवी.

## दप्तरी हुकूम.

इकडील दप्तरी हुकूम नंबर ५७ सन १३४६ फसलीचे हुकुमानें जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाबाबत सन १९३२ इ. चा ॲक्ट नं. १ कलम ४ ( २ ) प्रमाणें रावसाहेब वेंकटेश आण्णाजी आरबट्टी, B. A. LL. B., माजी सरन्यायाधीश जमखंडी यांची सदर कायदेमंडळाचे सरकारी ( Official ) सभासद म्हणून नेमणूक करण्यांत आलेली होती, परंतु रावसाहेब आरबट्टी हे तारीख १ माहे जुलै सन १९४० इ. पासून संस्थान मजकूरचे नोकरींतून सेवानिवृत्त झाले असल्यानें त्यांचे जागीं नेमणूक झालेले रावसाहेब भालचंद्र रामचंद्र पटवर्धन, M. A., LL. B., ॲक्टिंग सरन्यायाधीश व हुजूर ट्रेझरी ऑफिसर जमखंडी यांना चालू कायदेमंडळाची मुदत संपेपावेतों कायदेमंडळाचे सरकारी (Official) सभासद म्हणून नेमणेंत आलें आहे. कायदेमंडळाचे सभासद या नात्यानें रावसाहेब आरबट्टी यांचेकडे ज्या कामांचा चार्ज होता तीं सर्व कामें रावसाहेब पटवर्धन यांनीं पाहाणेचीं आहेत. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १३ माहे ऑगस्ट सन १९४० इसवी.

*S. A. Patwardhan*
राजे सं॥ जमखंडी.

हुजूर ऑफिस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ७४
सन १९४० इसवी.

# दप्तरी हुकूम.

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे सन १९४० इसवी सालचे आधिवेशनांत पास झालेले ठराव सदर मंडळाबाबत सन १९३२ इसवीचा ॲक्ट नंबर १ कलम १६ प्रमाणें मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून असेंब्ली जावक नंबर ६० सन १९४० इसवीचे नंबरानें इकडेस विचाराकरितां पाठविणेंत आलेले आहेत. त्याबाबत इकडून खालीं दिलेप्रमाणें हुकूम देण्यांत येत आहेत:—

| शेज नंबर | पास झालेले ठराव | त्याबाबत देणेंत आलेला हुकूम |
|---|---|---|
| १. | Government of India Act No. XXXIX of 1939 ( an Act further to amend the Indian Oaths Act 1873 ) शपथा घेणेबाबत इसवी सन १८७३ च्या ॲक्टाचें कलम ५ सुधारण्याबाबतचा कायदा जरूर त्या फेरफारासह लागूं होईल त्या अंशानें ता. १-१०-४० इ. पासून ह्या संस्थानांत लागू करावा, अशी श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांना हें मंडळ शिफारस करीत आहे. | सदरचा ठराव मंजूर करणेंत आला आहे. सदरहू Government of India Act No. XXXIX of 1939 ( an Act further to amend the Indian Oaths Act 1873 ) संस्थानमजकुरीं जरूर त्या फेरफारासह लागू होईल त्या अंशानें ( Mutatis Mutandis ) ता. १-११-४० इसवीपासून लागू करणेंत आलेला आहे. |
| २. | Government of India Act No. XXII of 1939 ( an Act further to amend the Indian Penal Code and the Code of Criminal Procedure 1898 ) इंडियन पिनलकोड कलम १७६ सुधारण्याबाबत व क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम ५६५ सुधारण्याबाबत कायदा जरूर त्या फेरफारांसह लागू होईल त्या अंशानें ता. १-१०-४० इसवीपासून ह्या संस्थानास लागू करावा अशी श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांना हें मंडळ शिफारस करीत आहे. | सदरचा ठराव मंजूर करणेंत आला आहे. Government of India Act No. XXII of 1939 ( an Act further to amend the Indian Penal Code and the Code of Criminal Procedure 1898) संस्थान मजकुरीं जरूर त्या फेरफारासह लागू होईल त्या अंशानें ( Mutatis Mutandis ) ता. १-११-४० इसवीपासून लागू करणेंत आलेला आहे. |

| शेज नंबर | पास झालेले ठराव | त्याबाबत देणेंत आलेला हुकूम |
|---|---|---|
| ३. | कुंदगोळ तालुक्यांत सर्वसाधारण कायमची पिण्याच्या पाण्याची व इतर सांड-पाण्याची टंचाई असते. अशासाठीं ती अंशतः तरी दूर व्हावी म्हणून दर-साल बजेटमध्यें चार हजार रुपयेची तरतूद करणेंत येऊन दरवर्षीं पाण्याची जास्त सोय व्हावी म्हणून सदरहू रक्कम खर्च करणेंत यावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे हुजूर-कडे विनंति आहे. | कुंदगोळ वॉटरवर्क्सबाबत दरबारकडून आतांपर्यंत २५-३० हजार रुपये खर्च करणेंत आलेलेच आहेत. सदर ठरावांतील तत्त्व इकडेस मान्य आहे. बजेटांत सवड होईल त्याप्रमाणें शिफारसीस अनुसरून सदर बाबत विचार करणेंत येईल. |
| ४. | हल्लीं डोंगरीचे लांकडाचे मक्ते देत असल्यामुळें डोंगरांतील झाडांची उत्पत्ति व त्यांची कटाई यांचें प्रमाण व्यस्त होत चाललें आहे. तरी फॉरेस्ट वाढविणेसाठीं म्हणून फॉरेस्ट खात्याकडे झाड लाग-वडीसाठीं म्हणून स्पेशल एक हजार (१०००) रुपयांची तरतूद बजेटमध्यें व्हावी अशी ह्या मंडळाची श्रीमंत राजा-साहेब सरकार यांचे हुजूराकडे विनंति आहे. | सदर ठरावांतील तत्त्व इकडेस पूर्णपणें मान्य आहे. बजेटांत सवड होईल त्या-प्रमाणें सदरबाबत तजवीज करणेंत येईल. रावबहादुर दिवाण यांनीं पेस्तर सालचें बजेट तयार करतांना सदरहूचा उपक्रम करण्याचा दाखला ठेवावा. |
| ५. | जमखंडी जेलकडील व जेलरची व ऑफिसची टाईम निश्चितपणें ऑफिसवर बोर्ड लावून लोकांना समजेल अशा अशा रीतीनें निश्चित करावी व त्या-प्रमाणें अम्मल व्हावा. अशाबद्दल हें मंडळ श्रीमंत राजासाहेब सरकार यांना शिफारस करीत आहे. | सदरचा ठराव मंजूर करणेंत आलेला आहे. रावबहादूर दिवाण जमखंडी यांनीं ठरावांत सुचविलेप्रमाणें जमखंडी जेल-मध्यें तसा एक बोर्ड तयार करून लाव-णेची जरूर ती तजवीज करावी. |
| ६. | बन्हट्टी गांवांत असलेला टोलनाका बन्हट्टी गांवांतील रहिवाशांना रोजच्या व्यवहाराकरितां अडचण न होईल अशा-प्रकारें तेथून काढून आसंगी क्रॉस व यल्लट्टी यांचे दरम्यान सोईचे ठिकाणीं घालणेंत यावा म्हणून या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना नम्र विनंति आहे. | सदरचा ठराव मंजूर करणेंत आला आहे. रावबहादूर दिवाण यांनीं ठरावांत सुचविलेप्रमाणें टोलनाक्याची जागा कायम करून त्या जागीं टोलनाका ठेवण्याची तजवीज करावी. |

| शेज नंबर | पास झालेले ठराव | त्याबाबत देणेंत आलेला हुकूम |
|---|---|---|
| ७. | बन्हट्टी गांवीं पिण्याच्या पाण्याची अडचण फारच आहे. ही अडचण दूर करण्यासाठीं सरकारांनीं बन्हट्टी गांवच्या दक्षिणेस असलेला ओढा अडवून पाण्याची व्यवस्था करावी अशी श्रीमंत राजासाहेब सरकार यांना या सभेची विनंति आहे. | सदर ठरावांतील पिण्याच्या पाण्याची सोय करावी हें तत्त्व इकडेस मान्य आहे. बन्हट्टी गांवच्या दक्षिणेकडील ओढा अडवून पाण्याची तशी सोय होणेसारखी आहे अगर कसें ह्याबाबत त्या विषयांतील तज्ज्ञ इसमाचा अभिप्राय प्रथम घेणें जरूर पडेल तरी सदरबाबत बजेटांत जशी सवड होईल त्याप्रमाणें विचार करणेंत येईल. |
| ८. | बन्हट्टी व होसूर व होसूर–रामपूर यांचे दरम्यान हल्ली रहदारी वाढलेली असून मोटारची वाहतूक जास्त झाली आहे. सदरील रस्ते दुरुस्त करणेबद्दल ४।६ वर्षांपासून सरकारांना विनंति करून देखील तजवीज अजून झालेली नाहीं. या बाबतींत यंदा तरी सदरहु रस्ते दुरुस्त करणेचें काम जरूर हातीं घेणेंत यावें अशी ह्या सभेची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे. | सदर ठरावांत केले शिफारशीप्रमाणें रावबहादूर दिवाण यांनीं पेस्तरसालचे बजेटांत सदरचे रस्ते दुरुस्तीची तजवीज करावी. |
| ९. | संस्थानमजकुरीं हल्लीं जे गांवनकाशे अस्तित्वांत आहेत त्यांत जमिनींतील कायम स्वरूपाच्या ओघळी व शेतास जाणेयेणेकरितां असलेले कायम स्वरूपाचे वहिवाटीचे रस्ते नमूद नाहींत त्यासाठीं सदर बाबतींत लोकांचे नेहमीं तंटे उद्भवतात, करितां एका तज्ज्ञ सर्व्हेअराकडून पहाणी करवून अशा ओघळी व रस्ते नमूद असलेले नवीन नकाशे तयार करणेंत यावेत, अशी या मंडळाची श्रीमंत राजेसाहेब सरकार यांना शिफारस आहे. | सदरहू ठराव मंजूर करणेंत आला आहे. रावबहादूर दिवाण यांनीं सदरबाबत कशी काय तजवीज करणेची व ह्याबाबत खर्च किती येईल ह्याबद्दलचें खर्चाचें एस्टिमेट करून इकडील अवलोकनासाठीं पाठविणेंत यावें म्हणजे पुढील तजविजीबाबत जरूर तसा हुकूम देणेंत येईल. |

येणेंप्रमाणें हुकूम करणेंत येत आहेत. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १२ माहे ऑक्टोबर सन १९४० इसवी.

*S. A. Patwardhan*
राजे सं॥ जमखंडी.

हुजूर ऑफिस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ७५.
सन १९४० इसवी.

## दप्तरी हुकूम

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे सन १९४० इ. सालचे अधिवेशनांत तिसरें वाचन होऊन पास झालेलें खालीं दिलेलें बिल सदर मंडळाचे कामकाजाबाबत नियम नंबर ७५ ( १ ) प्रमाणें सर्टिफिकीटासह नियम नं. ७५ ( २ ) प्रमाणें मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून असेंब्ली जा. नं. ६० सन १९४० इ. नंबरनें इकडेस विचाराकरितां पाठविणेंत आलें आहे. सदरहू बिल इकडून मंजूर करणेंत आलें असून त्याची प्रसिद्धि करणेंत येत आहे:—

" पुरुषांकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबाबत जमखंडी संस्थानचा सन १९३७ इ. सालचा ॲक्ट नं. १ दुरुस्त करण्याचें बिल "

### सन १९४० इ. चा ॲक्ट नंबर १.

जमखंडी संस्थानचा सन १९३७ इ. चा ॲक्ट नं. १ पुरुषांकडून प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबद्दल दुरुस्त होण्याचें बिल जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळापुढें मांडण्याचे आहे त्याचा हेतु व कारणें:—

मूळ जमखंडी संस्थानचा सन १९३७ इ. चा ॲक्ट नं. १ मध्यें हिंदु कुटुंबांतील विधवा स्त्री नवऱ्याचे ठिकाणीं सहहिस्सेदार होते असें विधान कलम १ मध्यें करणेंत आलें आहे. या कायद्यासाठीं तिला प्राप्त होणारा सहहिस्सेदाराचा दर्जा अगर हक्क ह्या कायद्यापुरतांच मर्यादित आहे कीं, इतर कायद्यांखालींही तिला त्याचा उपयोग करतां येईल ह्याबद्दल संशय उत्पन्न होणेचा संभव आहे. व तो राहूं नये म्हणून व संदिग्धता दूर व्हावी म्हणून हें दुरुस्तीचें बिल आणणें जरूरीचें आहे.

### हेतु

वर नमूद केलेली संदिग्धता नाहींशी व्हावी अशा हेतूनें हें बिल आणण्यांत आलें आहे.

### जमखंडी संस्थानच्या सन १९३७ इ. च्या ॲक्ट नं १ चें दुरुस्तीचें बिल.

जमखंडी ॲक्ट नं. १ सन १९४० च्या पुरुषांकडून वारसानें अगर वांटपानें प्राप्त होणाऱ्या मिळकतीसंबंधीं हिंदु विधवांचे हक्काबाबत जमखंडी संस्थानचे सन १९३७ इ. चें नं. १ चें कायद्याचें कलम १ ह्यांतील खुलासे ह्या सदराखालीं खालीलप्रमाणें नवीन खुलासा जोडणेंत येत आहे.

### कलम १ ह्यांत खुलासे ह्या सदरांत शेवटीं:—

" ( ३ ) हिंदु कुटुंबांतील विधवा स्त्री नवऱ्याचे ठिकाणीं सहहिस्सेदार होते असें सदर कलम १ ह्यांत नमूद आहे. त्यामुळें तिला सहहिस्सेदार म्हणून प्राप्त होणारा हक्क अगर दर्जा फक्त ह्या कायद्याचे कारणापुरतांच मर्यादित आहे. " असें समजणेचें आहे.

सदरहू बिलास आतां इकडील मंजुरीनें कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें असून सदरहू कायदा संस्थानमजकुरीं ता. १ माहे नोव्हेंबर सन १९४० इ. पासून लागू करणेंत आला आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १२ माहे ऑक्टोबर सन १९४० इसवी.

*S. A. Patwardhan*
राजे सं॥ जमखंडी.

परिशिष्ट नं. ७

# जमखंडी स्टेटकडील

सन १९४०–४१ इ. सालचें

जमा व खर्चाचें बजेट

| बजेट हेड मुख्य | बजेट हेड पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९–४० जुलई १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | | जमा शिल्लक सालगुदस्त | ५४८६५ | २६८८८ | ... | ... |
| १ | | **ब्रिटिश सरकारकडून येणारी रकम** | | | | |
| | १ | समडोळी सरदेशमुखी | ... | ९७५ | ... | ३२५ |
| | २ | ढवळपुरी धर्मादाय नेमणूक | ... | ... | ... | ... |
| | ३ | मिठाबद्दल येणारी रकम | - १४९१ | १४९१ | १४९१ | ... |
| | | एकूण... | १४९१ | २४६६ | १४९१ | ३२५ |
| २ | | **सायरबाब खातें.** | | | | |
| | १ | आतषबाजी, सुरुंगाची दारू वगैरेबद्दल लायसेन्स फी | ३४ | ३० | १२० | ... |
| | २ | सदरबद्दल चौथाई दंड | ... | ... | ९ | ५ |
| | ३ | काढ्याच्या पेट्यांवरील जकात | ८३१२ | ... | ६७९३ | ... |
| | ४ | पेट्रोल फंड | ... | ... | ७५८७ | ... |
| | | एकूण... | ८३४६ | ३० | १४५०९ | ५ |
| ३ | | **अबकारी खातें** | | | | |
| | १ | ब्रिटिश सरकारकडून दारू, शिंदी, ताडी वगैरेबद्दल येणारी रकम | ५४५१४ | ६९४२८ | ५४१३४ | ... |
| | २ | भांग, गांजाबद्दल येणारी रकम | १८२२३ | १८२२३ | १८२२३ | ... |
| | ३ | विषयुक्त पदार्थांबद्दल | ५५ | ७३ | ३५ | १५ |
| | | एकूण ... | ७२७९२ | ८७७२४ | ७२३९२ | १५ |

( १ )

## सन १९४०–४१ इ. सालाबद्दल

| एकूण | तीन साल सरासरी | स. १९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ३३८९८ | ... | अंदाजी ३७८०९ | ... | ... | |
| ३२५ | ४३३ | ३२५ | १०८ | ... | |
| ... | ... | ... | ... | ... | |
| १४९१ | १४९१ | १४९१ | ... | ... | |
| १८१६ | १९२४ | १८१६ | १०८ | ... | |
| १२० | ६१ | ६१ | ... | ... | |
| १४ | १४ | ... | १४ | ... | |
| ६७९३ | ७५५२ | ७००० | ५५२ | ... | |
| ७५८७ | ७५८७ | ७५०० | ८७ | ... | |
| १४५१४ | १५२१४ | १४५६१ | ६५३ | ... | |
| ५४१३४ | ५९३५९ | ५४००० | ५३५९ | ... | |
| १८२२३ | १८२२३ | १८२२३ | ... | ... | |
| ५० | ५९ | ५० | ९ | ... | |
| ७२४०७ | ७७६४१ | ७२२७३ | ५३६८ | ... | |

| बजेट नंबर मुख्य | बजेट नंबर पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० आगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९–४० जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| ४ | | **अफू खातें** | | | | |
| | १ | अफूविक्रीबद्दल | २९१३ | २९८३ | ३५२० | ४२० |
| | २ | सद्रबद्दल लायसेन्स फी व दंड वगैरे | २६९१ | २७४७ | २६४१ | २२५ |
| | ३ | चौथाई दंड | ६ | ... | ... | ... |
| | ४ | अफू ड्रॉबॅक अमाउंट | १४० | ६२ | ७८ | ... |
| | | एकूण... | ५७५० | ५७९२ | ६२३९ | ६४५ |
| ५ | | **जमीनबाब खातें** | | | | |
| | १ | कायम जमीनबाब सा. गु. व सालमा. | ४६१६८६ | ४१६६६४ | ३९६१४० | १०००० |
| | २ | सूट जमा | ... | ११२६०० | १९२००० | ... |
| | ३ | किरकोळ जमीनबाब | ८८६८ | १२३१६ | २१९५९ | १५०० |
| | ४ | इनाम जप्ती उत्पन्न | ... | ... | ... | ... |
| | ५ | जप्ती कांटणावळ | ... | ३७२ | २६ | २४ |
| | ६ | दत्तक नजराणा | ६९५ | १०२६ | ५२६ | ... |
| | ७ | मोजणी फी आणि भत्ता | ६७० | ३७० | ३१९ | १११ |
| | ८ | मुलकी दंड | ११ | ६ | ३१ | १९ |
| | ९ | इनाम जमिनींचा जमाखर्च | १२४७२२ | १२४७८० | १३ | १२४७२२ |
| | १० | मुलकी अमानत पक्केसद्रीं | ७१४४ | ३१७० | ६९३ | ... |
| | ११ | किरकोळ इतर | २८ | १०७ | २११ | ३९ |
| | | एकूण... | ६०३८२४ | ६७१४११ | ६११९१८ | १३६४१५ |
| ६ | | **लोकलफंड खातें** | | | | |
| | १ | एक आण्याचा कर सा. गु. सा. मा. | ३२४३३ | ४४१५० | २६१४१ | ६१७ |
| | २ | सूट जमा | ... | ९००० | ९००० | ... |
| | ३ | टोलफंड | ८५१५ | ९९२२ | ७९५० | १९५० |
| | ४ | तरीचा मक्ता | १२४७ | ८२१ | ७०७ | २५० |
| | ५ | दगड, माती व मासे वगैरे | १८२ | ५०७ | ३५७ | २०० |

| एकूण | तीन साल सरासरी | स.१९४०-४१ सालचे अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तींचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ३९४० | ३२७९ | ३३०० | ... | २१ | |
| २८६६ | २७६८ | २५०० | २६८ | ... | |
| ... | ६ | ... | ६ | ... | |
| ७८ | ९३ | १०० | ... | ७ | |
| ६८८४ | ६१४६ | ५९०० | २७४ | २८ | |
| ४०६१४० | ४९२१६३ | ४८०००० | १२१६३ | ... | |
| १९२००० | १५२३०० | ... | १५२३०० | ... | |
| २३४५९ | १४८८१ | १४००० | ८८१ | ... | |
| ... | ... | ... | ... | ... | |
| ५० | २११ | १०० | १११ | ... | |
| ५२६ | ७४९ | ७०० | ४९ | ... | |
| ४३० | ४९० | ५०० | ... | १० | |
| ५० | २२ | ५० | ... | २८ | |
| १२४७३५ | १२४७४६ | १२४७२२ | २४ | ... | |
| ६९३ | ३६६९ | १००० | २६६९ | ... | |
| २५० | १२८ | १०० | २८ | ... | |
| ७४८३३३ | ७८९३५९ | ६२११७२ | १६८२२५ | ३८ | |
| २६७५८ | ३४४४७ | ३६००० | ... | १५५३ | |
| ९००० | ९००० | ... | ९००० | ... | |
| ९९०० | ९४४६ | १०००० | ... | ५५४ | |
| ९५७ | १००८ | १००० | ८ | ... | |
| ५५७ | ४१५ | ५०० | ... | ८५ | |

| बजेट हेड मुख्य | बजेट हेड पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० ऑगस्ट१९३९ ते जून १९४० | १९३९–४० जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | ६ | कोंडवाड्याचें उत्पन्न | १४४५ | ९१६ | ८८६ | १२० |
| | ७ | सडकेच्या बाजूचीं झाडें व फळें वि. | २४० | ३९५ | ३२ | ... |
| | ८ | शिंगोटी | ३५० | ८२५ | ३७५ | १२५ |
| | | एकूण... | ४४४१२ | ६६५३६ | ४५४४८ | ३२६२ |
| ७ | | **फॉरेस्ट व शेतकी खातें** | | | | |
| | १ | गवताबद्दल | ४००४ | ३३२९ | ... | ... |
| | २ | डोंगरी लांकडाबद्दल | ३८१२ | ५३९३ | २७९५ | ७०० |
| | ३ | किरकोळ | ७३ | ७२ | ५५७ | १५१५ |
| | ४ | चंदनाच्या लांकडाबद्दल | ... | ५२ | ... | ... |
| | ५ | खाणींतील दगडमातीबद्दल | ७६७ | ९१० | ६१५ | ५० |
| | ६ | शेतकी उत्पन्न प्रदर्शन | ... | ५२ | २ | १२५ |
| | | एकूण.. | ८६५६ | ९८०८ | ३९६९ | २३९० |
| ८ | | **मातीवरील कर** | ३५९९३ | २४५३३ | १८६५२ | १४०० |
| | | एकूण... | ३५९९३ | २४५३३ | १८६५२ | १४०० |
| ९ | | **स्टँप खातें** | | | | |
| | १ | स्टँप व कोर्ट फी तिकीटें विक्री | ४९३१८ | ४३१५० | ३७०४९ | ३०५१ |
| | २ | दस्त छापणावळ व दंडाबद्दल | १६१९ | ११३८ | ८१५ | ... |
| | | एकूण... | ५०९३७ | ४४२८८ | ३७८६४ | ३०५१ |
| १० | | **रेजिस्ट्रेशन खातें** | | | | |
| | १ | नोंदणी फीबद्दल | ५५४९ | ५५१५ | ५६०२ | ६१५ |
| | २ | नकल फी | १८६३ | १६९८ | १५४७ | १७५ |
| | ३ | शेरा फी | ... | ६९५ | ६६५ | ७५ |
| | ४ | घरीं जाणेची फी | २०० | १६० | २६५ | ३५ |
| | ५ | किरकोळ दंड वगैरे | १७९ | १३५ | १०१ | २० |
| | | एकूण... | ७७९१ | ८२०३ | ८१८० | ९२० |

| एकूण | तीन साल सरासरी | स. १९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी-जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १००६ | ११२२ | १००० | १२२ | ... | |
| ३२ | २२२ | १०० | १२२ | ... | |
| ५०० | ५५८ | ५०० | ५८ | ... | |
| ४८७१० | ५६२१८ | ४९१०० | ९३१० | २१९२ | |
| ... | ३६६६ | ... | ३६६६ | ... | |
| ३४९५ | ४२३३ | ४००० | २३३ | ... | |
| २०७२ | ७३९ | २१०० | ... | १३६१ | |
| ... | ५२ | ... | ५२ | ... | |
| ६६५ | ७८१ | ७०० | ८१ | ... | |
| १२७ | ८९ | १०० | ... | ११ | |
| ६३५९ | ९५६० | ६९०० | ४०३२ | १३७२ | |
| २००५२ | २६८५९ | २०००० | ६८५५ | ... | |
| २००५२ | २६८५९ | २०००० | ६८५९ | ... | |
| ४०१०० | ४४१८९ | ४०००० | ४१८९ | ... | |
| ८१५ | ११९१ | १००० | १९१ | ... | |
| ४०९१५ | ४५३८० | ४१००० | ४३८० | ... | |
| ६२१७ | ५७६० | ५५०० | २६० | ... | |
| १७२२ | १७६१ | १८०० | ... | ३९ | |
| ७४० | ७१७ | ५०० | २१७ | ... | |
| ३०० | २२० | २५० | ... | ३० | |
| १२१ | १४५ | १५० | ... | ५ | |
| ९१०० | ८६०३ | ८२०० | ४७७ | ७४ | |

| बजेट हेड | | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १९३९–४० | |
| मुख्य | पोट | | १९३७–३८ | १९३८–३९ | ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | जुलै १९४० |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| ११ | | **कायदा व न्यायखातें** | | | | |
| | १ | न्यायसंबंधीं दंड | ३३५५ | ३७५४ | ३०८६ | ३१४ |
| | २ | डिपार्टमेंटल दंड | ८ | ३ | ७ | ८ |
| | ३ | बेवारस मालाचें उत्पन्न, मुद्देमाल विक्री | ३३ | ११६ | ८३ | १७ |
| | ४ | कोर्ट-फी मागाहून वसूल येणारी | १२ | १ | ... | ५ |
| | ५ | वकिलाचे सनदेची फी | ७०० | ... | २५० | १०० |
| | ६ | दिवाणी अमानत पक्केसदरीं जमा | ६२ | ६०९ | ... | ... |
| | ७ | नादारी मोकदम्यांतील वसूल | ३२० | ३६१ | २५५ | ४५ |
| | ८ | साक्षी व कामगारी भत्त्याबद्दल | १५० | १६३ | १३४ | १६ |
| | | **एकूण...** | ४६४० | ५००७ | ३८१५ | ५०५ |
| १२ | | **कोर्ट ऑफ वॉर्डस खातें** | | | | |
| | १ | श्रमांशाची रक्कम | १५९७ | ११५८ | १०७ | ... |
| | २ | एस्टॅब्लिशमेंटची रक्कम | १३४९ | २४८८ | २५१४ | ... |
| | | **एकूण...** | २९४६ | ३६४६ | २६२१ | ... |
| १३ | | **जेलखातें : जेलमध्यें तयार होणाऱ्या मालाचे उत्पन्नावरील नफा** | २६५० | ५०० | ... | १०० |
| | | **एकूण...** | २६५० | ५०० | ... | १०० |
| १४ | | **पोलीस खातें** | | | | |
| | १ | माउंटेड पोलीस ड्रेसफंड | २१३ | १८७ | १५७ | १३ |
| | २ | फूट पोलीस | | | | |
| | | अ–पगार व भत्ता | ... | ... | ... | ... |
| | | ब–ड्रेसफंड | ९९० | १०१८ | ८४० | ८० |

(८)

| एकूण | तीन साल सरासरी | स.१९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७-८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ३४०० | ३५०३ | ३५०० | ३ | ... | |
| १५ | ९ | १० | ... | १ | |
| १०० | ८३ | १०० | ... | १७ | |
| ५ | ६ | ५ | १ | ... | |
| ३५० | ५२५ | ४०० | १२५ | ... | |
| ... | ३३५ | ३०० | ३५ | ... | |
| ३०० | ३२७ | ३०० | २७ | ... | |
| १५० | १५४ | १५० | ४ | ... | |
| ४३२० | ४९४२ | ४७६५ | १९५ | १८ | |
| १०७ | ९५४ | ८५० | १०४ | ... | |
| २५१४ | २११७ | १३५० | ७६७ | ... | |
| २६२१ | ३०७१ | २२०० | ८७१ | ... | |
| १०० | १०६७ | ५०० | ५६७ | ... | |
| १०० | १०६७ | ५०० | ५६७ | ... | |
| १७० | १९० | २०० | ... | १० | |
| ... | ... | ... | ... | ... | |
| ९२० | ९७६ | १००० | ... | २४ | |

| मुख्य शीर्ष | पोट शीर्ष | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० | |
| | | | | | ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | जुलै १९४० |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | ३ | किरकोळ दंड | ३२ | ६ | १ | १ |
| | ४ | हत्यारांचे विक्रीबद्दल | ३९ | ३५ | ३१ | ... |
| | ५ | पेट्या रक्षणावळ फी | १६ | ७ | ७ | ३ |
| | ६ | घोडे विक्रीबद्दल | ... | ९५ | ... | ... |
| | | एकूण... | १२९० | १३४८ | १०३६ | ९७ |
| १५ | | **हुजूर रेकॉर्ड खातें** | | | | |
| | १ | मुलकी | ३३७ | ३३४ | २५० | २५ |
| | २ | दिवाणी | ८४८ | ५९० | ५९६ | ५४ |
| | ३ | इतर | ९३ | ४० | १०७ | १३ |
| | | एकूण... | १२७८ | ९६४ | ९५३ | ९२ |
| १६ | | **विद्या खातें** | | | | |
| | १ | शाळा फी | ६५२ | २९९१ | २३१७ | २५० |
| | २ | म्युनिसिपॅलिटीकडील मदत | ३१२५ | १५२५ | १०२५ | १६७५ |
| | ३ | लोकल फंड ३ प्राथमिक शाळेचे मदतीबद्दल | ... | ९००० | ... | ९००० |
| | ४ | निरुपयोगी सामानविक्री | ७ | १३ | ६ | ... |
| | ५ | फंडाचें व्याज | ... | ... | ... | ... |
| | ६ | गवत व फळें व फुलें विक्रीबद्दल | ३ | २४ | ५ | ५ |
| | ७ | किरकोळ | ३३ | १४ | १० | १० |
| | | एकूण... | ३८२० | १३५६७ | ३३६३ | १०९४० |
| १७ | | **देवस्थान धर्मादाय खातें** | ... | ... | | ... |
| १८ | | **दवाखाना खातें** | | | | |
| | १ | म्युनिसिपॅलिटीकडील मदत | १७१२ | १३४६ | १११९ | ६८१ |
| | २ | औषधविक्रीचें उत्पन्न | ... | १७२५ | २१९३ | २०७ |

(१०)

| एकूण | तीन साल सरासरी | स. १९४०-४१ साल<br>चें अंदाजी बजेट | को. नं. ७-८ यांतील फरक |  | शेरा विशेष कमी-जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
|  |  |  | कमी | जास्ती |  |
|  | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| २ | १३ | १० | ३ | ... |  |
| ३१ | ३५ | ३० | ५ | ... |  |
| १० | ११ | १० | १ | ... |  |
| ... | ९५ | ... | ९५ | ... |  |
| ११३३ | १३२० | १२५० | १०४ | ३४ |  |
| २७५ | ३१५ | ३०० | १५ | ... |  |
| ६५० | ६९६ | ६०० | ९६ | ... |  |
| १२० | ८४ | १०० | ... | १६ |  |
| १०४५ | १०९५ | १००० | १११ | १६ |  |
| २५६७ | २०७० | २५०० | ... | ४३० |  |
| २७०० | २४५० | २७०० | ... | २५० |  |
| ९००० | ९००० | ९००० | ... | ... |  |
| ६ | ९ | १८ | ... | १ |  |
| ... | ... | १३०० | ... | १३०० |  |
| १० | १२ | १० | २ | ... |  |
| २० | २२ | २५ | ... | ३ |  |
| १४३०३ | १३५६३ | १५५४५ | २ | १९८४ |  |
| ... | ... | ... | ... | ... |  |
| १८०० | १६१९ | १८०० | ... | १८१ |  |
| २४०० | २०६२ | २४०० | ... | ३३८ |  |

| बजेट हेड मुख्य | बजेट हेड पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | ३ | इतर ( फि. डि. चें व्याज ) | २ | ... | ... | ... |
| | ४ | चॅरिटी बॉक्स मॅटर्निटी वॉर्ड | ... | ... | १८१ | ... |
| | | एकूण... | १७१४ | ३०७१ | ३४९३ | ८८८ |
| १९ | | देवी खातें-म्युनिसिपॅलिटीकडील मदत | ९८८ | १०६४ | १००८ | .. |
| २० | | छापखाना खातें | | | | |
| | १ | छापणावळीचें उत्पन्न | १३७ | २०१ | २४३ | ... |
| | २ | सामानविक्री | ... | ... | ... | ... |
| | ३ | किरकोळ | १७ | ... | १२ | ... |
| | | एकूण... | १५४ | २०१ | २५५ | ... |
| २१ | | पब्लिक वर्क्स खातें | | | | |
| | १ | इमारतींचें व बंगल्याचें भाडें | ८९४ | ८५० | ७३६ | ६४ |
| | २ | स्टोअरकडील जुनें लोखंडी सामानविक्रीबद्दल | ३० | ८२७ | १४ | ... |
| | ३ | तलावाखालील जमिनीचें उ. | ५४६ | १७७ | ४०३ | ... |
| | ४ | अन्पेड पक्के सदरीं जमा | ... | २ | २५२ | ... |
| | ५ | इतर किरकोळ–रस्त्यावरील फळें व शेंगा वगैरेंचे विक्रीचें उत्पन्न | ६२१ | ४४० | ५२५ | ७५ |
| | | एकूण... | २०९१ | २२९६ | १९३० | १३९ |
| २२ | | वॉटर वर्क्स खातेचें उत्पन्न | १७३३३ | १८३६९ | १४८२५ | ३६७५ |
| २३ | | गिरणी उद्योग व व्यापार खातें | | | | |
| | १ | गिरणीकडील वठाई व गठ्ठे बांधणें | १२४४२ | २७४८५ | २५७८३ | ... |

| एकूण | तीन साल सरासरी | स.१९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ... | ... | ५७० | ... | ५७० | |
| १८१ | १८१ | २०० | ... | १९ | |
| ४३८१ | ३८६२ | ४९७० | ... | ११०८ | |
| १००८ | १०२० | १००० | २० | ... | |
| २४३ | १३४ | २०० | ... | ६ | |
| ... | ... | ... | ... | ... | |
| १२ | १४ | १० | ४ | ... | |
| २५५ | २०८ | २१० | ४ | ६ | |
| ८०० | ८४८ | ८०० | ४८ | ... | |
| १४ | २९० | १०० | १९० | ... | |
| ४०३ | ३७५ | ३५० | २५ | ... | |
| २५२ | १२७ | ५० | ७७ | ... | |
| ६०० | ५५४ | ६०० | ... | ४६ | |
| २०६९ | २१९४ | १९०० | ३४० | ४६ | |
| १८५०० | १८०६७ | १८००० | ६७ | ... | |
| २५७८३ | २१९०३ | २२००० | ... | ९७ | |

| बजेट हेड मुख्य | बजेट हेड पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७-३८ | १९३८-३९ | १९३९-४० ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९-४० जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | २ | स्टोअर सामानविक्री | १२९ | २४ | ६० | ... |
| | ३ | बॉयलर इन्स्पेक्शन फी | ... | ४० | ८० | ... |
| | ४ | गोडाऊनचें भाडें | ५०० | ११०० | ८०० | ... |
| | ५ | इतर किरकोळ | ९४ | ५३ | ३२ | ... |
| | ६ | कापसाच्या गांठीबद्दल जकात | ७४५ | २४५२ | १४२६ | ... |
| | | एकूण... | १३९१० | ३११५४ | २८१८१ | ... |
| २४ | | **पेन्शन खातें पेन्शन फंड व रजेचा अ०** | ११० | ११४ | ८८ | २० |
| २५ | | **व्याज खातें** | | | | |
| | १ | रयतेस तगाई दिल्याबद्दल | ५९२ | ५४१ | १०२२ | ७८ |
| | २ | स्टेट बँकेकडील कर्ज दिलेबद्दल | ११६३२ | १३८९९ | २५४७० | ३३० |
| | ३ | निरनिराळया बँकेंत ठेव ठेविल्याबद्दल करंट व फिक्स्ड | २४६६ | ६७०४ | ८५ | ... |
| | ४ | गव्हर्नमेंट प्रॉमिसरी नोटा व शेअर्सचें व्याज | ६११९ | ६१४९ | १३५८० | ... |
| | | एकूण... | २०८०९ | २७२९३ | ४०१५७ | ४०८ |
| २६ | | **किरकोळ खातें** | | | | |
| | १ | तैनातदार नोकरी अंशाबद्दल | १५१२ | १६७२ | ... | १६२० |
| | २ | जुनें सामानविक्री | २५० | ४५७ | १३८ | ... |
| | ३ | ऐन खर्चांपैकीं परत जमा | २९६४ | २४२ | १२६ | ७४ |
| | ४ | सर्व्हिस मदत कुडची कारकून | ... | ९६ | ९६ | ... |
| | ५ | पुणें वाड्याचे एस्टॅब्लिशमेंट ब० येणारी रकम | ... | ... | ... | ... |
| | ६ | म्युनिसिपॅलिटीकडील ऑडिट फी | १०० | ५० | ... | १०० |
| | ७ | पोस्टाची थैली नेणेंआणणेबद्दल | ६० | ६० | ५१ | ९ |

| एकूण | तीन साल सरासरी | स. १९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक — कमी | को. नं. ७–८ यांतील फरक — जास्ती | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ६० | ७१ | १०० | .. | २९ | |
| ८० | ४० | १०० | ... | ६० | |
| ८०० | ८०० | १००० | ... | २०० | |
| ३२ | ६८ | ५० | १० | ... | |
| १४२६ | १५४१ | १५०० | ४१ | ... | |
| २८१८१ | २४४१५ | २४७५० | ५१ | ३८६ | |
| १०८ | १११ | ११० | १ | ... | |
| ११०० | ७४४ | ६०० | १४४ | ... | |
| २५८०० | १७११० | २०००० | ... | २८९० | |
| ८५ | ३०८५ | १०० | २९८५ | ... | |
| १३५८० | ८६१६ | ५००० | ३६१६ | ... | |
| ४०५६५ | २९५५५ | २५७०० | ६७४५ | २८९० | |
| १६२० | १६०१ | १६२० | ... | १९ | |
| १३८ | २८२ | १०० | १८२ | ... | |
| २०० | ११३५ | २०० | ९३५ | ... | |
| ९६ | ९६ | ९६ | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | ... | |
| १०० | ८३ | १०० | ... | १७ | |
| ६० | ६० | ६० | ... | ... | |

| मुख्य खातें | पोट खातें | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४०. | |
| | | | | | ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | जुलै १९४०. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | ८ | हॉटेल लायसेन्स फी व किरकोळ अर्ज लायसेन्स फी | ७ | १२९७ | १०० | ... |
| | ९ | मोटार लायसेन्स फी | ३४३४ | २८९४ | २४९४ | १००६ |
| | १० | कॉटन मार्केटसंबंधीं उत्पन्न | १६२ | २०९ | ६०५ | ... |
| | ११ | इतर मोटार मोनापली वगैरे | १९९८ | १०२०६ | ८२६ | १५८७ |
| | | एकूण... | १०४८७ | १७१८३ | ४४२६ | ४३९६ |
| | | खातें नं. १ ते २६ ची एकूण | ९२४२१२ | ९२४९६८ | ९२६८२३ | १६९६८८ |
| २७ | | कर्ज खातें | | | | |
| | १ | तगाई | ३७८ | १४४१ | २०८४ | ११६ |
| | २ | स्टेट बँक, जमीन, सोनें गहाण, इतर | २२४६८ | २७७६५ | ६५०२५ | ४००० |
| | ३ | फि. डिपॉझिट | ४३९०४ | २३०८८५ | १२३२०१ | ६००० |
| | | शे. विकी | ... | ... | ३०६७१ | ... |
| | | एकूण... | ६६७५० | ४०१५४३ | २२०९८१ | १०११६ |
| २८ | | तसलमात कायम व हंगामी | १२७३३४ | १६४६२६ | ४९३२० | १०६८० |
| २९ | | अमानत खातें मुलकी–दिवाणी–जातवार स्वार–पोलीस ... ... | १५४९५० | १२४३०७ | ९२३२९ | ७६७१ |
| | | खातें नं. २७-२८-२९ ची एकूण... | ३४९०३४ | ६९०४७६ | ३६२६३० | २८४६७ |
| | | खातें नं. १ ते २९ अखेर | १२७३२४६ | १६१५४४४ | १२८९४५३ | १९८१५५ |
| | | शिलकेसह एकूण ... | १३२८१११ | १६४२३३२ | ... | ... |

| एकूण | तीन साल सरासरी | स. १९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७-८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १०० | ४६८ | १०० | ३६८ | ... | |
| ३५०० | ३२७६ | ३६०० | ... | ३२४ | |
| ६०५ | ३२५ | ३०० | २५ | ... | |
| २४१३ | ४८७२ | ४००० | ८७२ | ... | |
| ८८३२ | १२१९८ | १०१७६ | २३८२ | ३६० | |
| १०९६५११ | ११५३५९२ | ९५२९९८ | २१११४६ | १०५५२ | |
| २२०० | १३४० | २००० | ... | ६६० | |
| ६९०२५ | ३९७५३ | २५००० | १४७५३ | ... | |
| १२९२०१ | १३४६६३ | १२०००० | १४६६३ | ... | |
| ३०६७१ | ३०६७१ | ... | ३०६७१ | ... | |
| २३१०९७ | २०६४२७ | १४७००० | ६००८७ | ६६० | |
| ६०००० | ११७३२० | ६०००० | ५७३२० | ... | |
| १००००० | १२६४१९ | १००००० | २६४१९ | ... | |
| ३९१०९७ | ४५०१६६ | ३०७००० | १४३८२६ | ६६० | |
| १४८७६०८ | १६०३७५८ | १२५९९९८ | ३५४९७२ | ११२१२ | |
| १५२१५०६ | ... | १२९७८०७ | ... | ... | |

## जमखंडी स्टेटचें खर्चाकडील बजेट

| बाब नंबर: मुख्य | बाब नंबर: पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे: १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४०: ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९–४०: जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| १ | | **खारखंडणी ब्रिटिश सरकारास देणेची** | २०८४१ | २०८४१ | ... | २०८४१ |
| २ | | **खासगी खातें** | | | | |
| | १ | खाजगी खर्चाबद्दल | ८५२०० | ८१६०० | ६८००० | १३६०० |
| | २ | स्वारी खर्चाबद्दल | १२००० | १२००० | १०००० | २००० |
| | ३ | पागा खर्च | १२००० | १२००० | ... | १२००० |
| | ४ | मोटारखर्च व दिव्याचें एंजिन व० | १२००० | १२००० | ... | १२००० |
| | ५ | लायब्ररीस मदत | ३०० | ३०० | ... | ३०० |
| | ६ | लायब्रेरियनचा निमा पगार | ३०० | ३०० | ... | ३०० |
| | | एकूण... | १२१८०० | ११८२०० | ७८००० | ४०२०० |
| ३ | | **जमीन महसूल** | | | | |
| | १ | इनाम जमिनीचा जमाखर्च | ८०२६६ } | १२४७२२ | ... | १२४७२२ |
| | २ | देवस्थान जमिनीचा जमाखर्च | ४११९०८ } | २०४ | ... | ... |
| | ३ | परगण्याचे वतनदार | १२०४७ | १०४२४ | १०४२३ | ... |
| | ४ | सनदी नोकर | ४३७ | ४२० | ३४८ | ८४ |
| | ५ | गांवनोकर, गांवकामगार स्केल व नेमणूक गांव | २३५८५ | २१३७६ | ७५७९ | १०४२१ |
| | ६ | सर्व्हे बांध दगडाबद्दल | ... | ... | ... | ... |
| | ७ | पाटील कुळकर्णी लोकांस बक्षीस | ९८ | ७१ | १८ | ८२ |
| | ८ | रेव्हिन्यू रिफंड व जप्ती जमिनीचें उत्पन्न परत देणें | ३५५३३ | ५१०८८ | ९८५६ | १३९९४ |
| | ९ | सूट खर्च | ... | ... | ... | १९२६०० |
| | १० | सरकारतर्फे लिलांवांत जमीन घेणेबद्दल ( जमिनीची किंमत ) | ... | ... | ... | ... |

## सन १९४०-४१ इ. सालाबद्दल

| एकूण | तीन साल सरासरी | स.१९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७-८ यांतील फरक कमी | जास्ती | शेरा विशेष कमी-जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| २०८४१ | २०८४१ | २०८४१ | ... | ... | |
| ८१६०० | ८२८०० | ८१६०० | १२०० | ... | |
| १२००० | .१२००० | १२००० | .. | ... | |
| १२००० | १२००० | १२००० | ... | ... | |
| १२००० | १२००० | १२००० | ... | ... | + ६२७६०८ जमखंडी |
| ३०० | ३०० | ३०० | ... | ... | ४०४८ कुंदगोळ |
| ३०० | ३०० | ३०० | ... | ... | १३०८८ वाठार |
| | | | | | ४५ पाठखळ |
| ११८२०० | ११९४०० | ११८२०० | १२०० | ... | १०५०० |
| १२४७२२ | १२३९४० | १२४७२२ | ... | ७८२ | × २७२ जमखंडी |
| ... | ... | ... | ... | ... | १६८ पाठखळ |
| १०४२३ | १०९६५ | +१०५०० | ४६५ | ... | ४४० |
| ४३२ | ४३० | ×४४० | ... | १० | *१०४१६-०-० जमखंडी |
| १८००० | २०९८७ | *१८००० | २९८७ | ... | ६५६८-०-० कुंदगोळ |
| | | | | | ४१३-०-० वाठार |
| ... | ... | ... | ... | ... | ४८८-०-० पाठखळ |
| १०० | ९० | १०० | ... | १० | ३५-०-० ढवळपुरी |
| | | | | | १८००० -०-० |
| २३८५० | ३३८२४ | †३५००० | १८२४ | ... | |
| १९२६०० | १९२६०० | ११२६०० | ८०००० | ... | †३०८००-०-० जमखंडी |
| | | | | | ४०००-०-० कुंदगोळ |
| | | | | | २००-०-० वाठार |
| ... | ... | ५० | ... | ५० | ३५०००-०-० |

| बजेट हेड मुख्य | बजेट हेड पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७-३८ | १९३८-३९ | १९३९-४० ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९-४० जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | ११ | सर्व्हे ऑफ इंडियास कॉंट्रिब्यूशन | ... | ... | २१५० | ... |
| | | एकूण... | १९३८७४ | २०८३०५ | ३०३७४ | ३४१९०३ |
| ४ | | **लोकल फंड खातें** | | | | |
| | १ | लोकल फंड वसुलीवर स्केल | ... | ९ | ... | १२०० |
| | २ | कोंडवाड्याची चौथाई | ३८४ | ३८२ | १२६ | १८६ |
| | ३ | टोलफंड हिश्शाची रकम परत देणें | १५०३ | १३३६ | ... | ... |
| | ४ | लोकल फंड प. वर्क्स खातें | | | | |
| | | १ जमखंडी मेस्त्री ऑफीस | | | | |
| | | पगार | ४५६ | १९२ | ३०९ | ७८ |
| | | सादील | १२ | ९ | ७ | २ |
| | | २ सावळगी मेस्त्री ऑफीस | | | | |
| | | पगार | ३८४ | ३८८ | ३४० | ६८ |
| | | सादील | १२ | ९ | ७ | २ |
| | | ३ कुंदगोळ मेस्त्री ऑफीस | | | | |
| | | पगार | ६१४ | ६२४ | ५२० | १०४ |
| | | सादील | १२ | ९ | ७ | २ |
| | | खातें नं. ४ पो. खा. नं. ४ ची एकूण... | १४९० | १२३१ | ११९० | २५६ |
| | ५ | कारखान्याकडील खर्च नवीन व जुन्या इमारतीसुद्धां नांवेंसुद्धां | २२४९५ | १७०८३ | ९४५३ | ८५४७ |
| | ६ | प्राथमिक शाळेकडे लोकल-फंड पैकीं ⅓ रकम देणेची तीं | ४२९८६ | ९००० | ... | ९००० |
| | | खा. नं. ४ पो. नं. ५।६ ची एकूण... | ६५४८१ | २६०८३ | ९४५३ | १७५४७ |

| एकूण | तीन साल सरासरी | स.१९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| २१५० | २१५० | २१५० | ... | ... | |
| ३७२२७७ | ३८७९८६ | ३०३५६२ | ८५२७६ | ८५२ | |
| १२०० | ६०४ | १२०० | ... | ५९६ | |
| ३१२ | ३६० | ३१२ | ४८ | ... | |
| ... | १४१९ | ४००० | ... | २५८१ | |
| ३८७ | ३४५ | ४६८ | ... | १२३ | |
| ९ | १० | ९ | १ | ... | |
| ४०८ | ३९३ | ४०८ | ... | १५ | |
| ९ | १० | ९ | १ | ... | |
| ६२४ | ६२१ | ६२४ | ... | ३ | |
| ९ | १० | ९ | १ | ... | |
| १४४६ | १३८९ | १५२७ | ३ | १४१ | |
| १८००० | १९१९२ | १८००० | ११९२ | ... | |
| ९००० | २०३२९ | ९००० | ११३२९ | ... | |
| २७००० | ३९५२१ | २७००० | १२५२१ | ... | |

| बजेट हेड मुख्य | बजेट हेड पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९–४० जुलई १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | ७ | सूट खर्च | ... | ... | ... | ९००० |
| | | खा. नं. ४ ची एकूण... | ६८८५८ | २९४१ | १०७६९ | २८१८९ |
| ५ | | **अबकारी खातें** | | | | |
| | | इनामदारांस परत देण्याची रकम | ३२२९ | ४७३७ | १६९१ | १५३८ |
| ६ | | **जनरल डिपार्टमेंट** | | | | |
| | | श्री. राजासाहेब यांचें हुजूर ऑफिस | | | | |
| | | पगार | ७०८० | ९५६८ | ६२८५ | ३४८३ |
| | | सादील | १५० | १३५ | ११२ | २३ |
| | | भत्ता व इतर खर्च | १६३७ | ११०६ | ८०१ | १४९ |
| | | चेंबर व दिल्ली स्वारीचे खर्चासाठीं | २७०४ | ४४९८ | ... | २५०० |
| | | एकूण... | ११५७१ | १५३०४ | ७१९८ | ६१५५ |
| ७ | | **जमखंडी संस्थान-प्रातिनिधिक कायदेमंडळ** | १०४९ | १४३२ | १७२० | २८० |
| ८ | | **डिस्ट्रिक्ट ॲडमिनिस्ट्रेशन** | | | | |
| | १ | दिवाण ऑफिस | | | | |
| | | पगार | १००५२ | १०१७३ | ८८१३ | १७७४ |
| | | सादील | २४६ | २४० | २०० | ७३ |
| | | भत्ता व इतर खर्च | २००० | १४८६ | २४२३ | १४१ |
| | | बँकेकडील अलावन्स | ६० | ६० | ५० | १० |
| | | एकूण... | १२३५८ | ११९५९ | ११४८६ | १९९८ |
| | २ | हुजूर ट्रेझरी ऑफिस | | | | |
| | | पगार | १३२७ | १३३० | १३९५ | २८८ |

| | तीन साल सरासरी | स.१९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक | | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्ती | |
| एकूण | | | | | |
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ९००० | ९००० | ९००० | ... | .. | |
| ३८९५८ | ५२२९३ | ४३०३९ | १२५७२ | ३३१८ | |
| ३२२९ | ३७४२ | ३२२९* | ५१३ | — | *१५२–१२–१ कुरगोड इनामदार<br>१७४–१५–१० कुंद्गोळ देसाई<br>१७४–१५–१० ,, देशपांडे<br>८२०—७–६ ,, नाडगीर<br>९५२–१३–१० लक्ष्मणगौडा डुगणगौडा नाडगीर<br>४७६–६–११ चिदंबरगौडा नाडगीर<br>१५८–१२–११ दत्तात्रय महादेव नाडगीर<br>१५८–१२–११ कृष्णगौडा नाडगीर<br>१५८–१२–११ वेंकणगौडा नाडगीर<br>+ १–३<br>३२२९ |
| ९७६८ | ८८०५ | ८००० | ८०५ | ... | |
| १३५ | १४० | १३५ | ५ | ... | |
| ९५० | १२३० | ४५० | ७८० | ... | |
| २५०० | ३२३४ | ३००० | २३४ | ... | |
| १३३५३ | १३४०९ | ११५८५ | १८२४ | ... | |
| २००० | १४९१ | ३००० | ... | १५०९ | |
| १०५८७ | १०२७१ | १०७१७ | ... | ४४६ | |
| २७३ | २५३ | २७३* | ... | २० | *२१५ दिवाण ऑफिस<br>२५ अकाउंट ऑफिस<br>३० कुंद्गोळ बँक<br>१ वाठार बँक<br>२ पाटसळ बँक<br>२७३ |
| २५६४ | २०१७ | १५०० | ५१७ | ... | |
| ६० | ६० | ६० | ... | ... | |
| १३४८४ | १२६०१ | १२५५० | ५१७ | ४६६ | |
| १६८३ | १४४७ | १७१९ | ... | ३१२ | |

| बजेट हेड, मुख्य | बजेट हेड, पोट | तपशील | गेल्या तीन सालचे नक्की आंकडे १९३७–३८ | १९३८–३९ | १९३९–४० ऑगस्ट १९३९ ते जून १९४० | १९३९–४० जुलै १९४० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | | सादील | ... | ... | ... | ... |
| | | भत्ता व इतर खर्च | ... | ... | ... | ... |
| | | खजिना नेणेआणणेबद्दल | ... | | | |
| | | एकूण... | १३२७ | १३३० | १३९५ | २८८ |
| | ३ | इनकमटॅक्स ऑफिस | | | | |
| | | पगार | २८४१ | २७५८ | १४२७ | २४८ |
| | | सादील | १२० | १०८ | ९० | १८ |
| | | भत्ता व इतर खर्च | ४१६ | ३९५ | २११ | १८९ |
| | | एकूण... | ३३७७ | ३२६१ | १७२८ | ४५५ |
| | ४ | तालुक्याचे मामलेदार व ठाण्यांचे वहिवाटदार | | | | |
| | | १ जमखंडी मामलेदार | | | | |
| | | पगार | ६६१० | ५०९७ | ४२२८ | ८३८ |
| | | सादील | २४० | २१६ | १८० | ३६ |
| | | भत्ता व इतर खर्च | ४०० | ४६४ | २०३ | ६७ |
| | | एकूण... | ७२५० | ५७७७ | ४६११ | ९४१ |
| | | २ कुंदगोळ मामलेदार | | | | |
| | | पगार | ३९९० | ४७१८ | ४०४४ | ७९६ |
| | | सादील | २४० | २०३ | १६९ | ३४ |
| | | भत्ता व इतर खर्च | ११६५ | २७६ | १८२ | ४३ |
| | | एकूण... | ५३९५ | ५१९७ | ४३९५ | ८७३ |
| | | ३ वाठार वहिवाटदार | | | | |
| | | पगार | १४०९ | १४७८ | १०२५ | २०० |
| | | सादील | ५१ | ४४ | ३७ | ७ |

| एकूण | तीन साल सरासरी | स. १९४०-४१ सालचें अंदाजी बजेट | को. नं. ७–८ यांतील फरक कमी | को. नं. ७–८ यांतील फरक जास्ती | शेरा विशेष कमी–जास्तीचीं कारणें |
|---|---|---|---|---|---|
| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ... | ... | ... | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | ... | |
| १६८३ | १४४७ | १७५९ | ... | ३१२ | |
| १६७५ | २४२५ | १५१२ | ९१३ | ... | |
| १०८ | १२५ | १०८ | १७ | ... | |
| ४०० | ४०४ | ३८० | २४ | . | |
| २१८३ | २९५४ | २००० | ९५४ | ... | |
| ५०६६ | ५५९१ | ५०८८ | ५०३ | ... | |
| २१६ | २२४ | २१६ | ८ | ... | |
| २७० | ३७८ | ५७० | ... | १९२ | |
| ५५५२ | ६१९३ | ५८७४ | ५११ | १९२ | |
| ४८४० | ४५१६ | ४८८४ | ... | ३६८ | |
